# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवर तारीख ४ माहे आक्टोबर सन १८८० इसवी. अंक ३९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ८४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केले जाईल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढे दर ओळीस | ८१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ८१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ८३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ८२ |

## NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co-operation of all European and Native gentemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## सुबोधसार.

भाग पहिला.

यांत राजनीति वगैरे अनेक ग्रंथांतून नीतिपर, बोधक, मनोरंजक, दृष्टांतिक, व अनुभवसिद्ध असे उत्तम निवडक श्लोक प्राकृत अर्थासह घेतले आहेत. अशा ग्रंथाच्या अवलोकनानें बहुतेक व्यवहारज्ञांस विशेषेंकरून नीतिशास्त्र वगैरे विषयांची चंगली माहिती होऊन सामान्य पुरुषासही व्यहारांत समयविशेषीं कसें बोलवें व वागावें वगैरे अनेक प्रकारचें ज्ञान होण्यासारखे आहे हा ग्रंथ जाड कागदावर खिळेछापानें छापून विक्रीस तयार आहे. किंमत ८१० आणे टपाल खर्च ८८६ आह्माकडे पाठविल्यास पुस्तक ताबडतोब रवाना केलें जाईल. कळावें ता. २६ आक्टोबर सन १८७९ इ.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

## गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचें औषधाच्या डब्या विकावयास आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांनां आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ८६ आणे.

हें औषध गजकरण शिवाय करून खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

या गजकरणाच्या औषधाच्या डब्या २ वर्षांपूर्वी आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यांपासून पुष्कळांस गुणही आला. परंतु अलिकडे सदहू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिलक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेलीं गिऱ्हाइकें परत गेलीं ह्मणून आह्मी त्या औषधाच्या डब्या मुद्दाम आणिल्या आहेत.

## कृष्णाकुमारी.

शाळांकडील ६ व्या पुस्तकांतील कृष्णाकुमारी नांवाच्या मनोवेधक गोष्टीवर सातारचे वे० शा० सं० रा० रा० भाऊ दीक्षित यांनीं उत्तम कविता केलेली वऱ्हाडसमाचार छापखान्यांत आह्मी छापिली आहे. किंमत दर प्रतीस ८६ सहा आणे. बाहेर गावीं मागविणारास एक आणा अधिक पडेल.

खंडेराव बाळाजी फडके.

## हुन्नरसंग्रह.

( मासिक पुस्तक. )

चालू आगष्ट महिन्यापासून आह्मी सदहू पुस्तक काढण्याची सुरवात केली आहे. त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व कलाकौशल्यें यांसंबंधीं अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत जाईल.

त्यांत बागाईत व शेती, सुगंधी व आतारी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र, कुंभारकाम, कांचकाम, धातुकाम, दारूकाम इत्यादि कामांसंबंधीं अनेक प्रकारचें उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थावरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति, उपद्रवकारक प्राण्यांचा नाश करण्याचे उपाय, लवकर नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे ठेवण्याच्या युक्ति; कोणत्याही पदार्थावर पाहिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फुटलेले पदार्थ सांधण्याकरितां लुकणें, सुगंधी व औषधोपयोगी तेलें व अर्क अनेक प्रकारच्या साध्या व रंगीत शाई, आगकाड्या, साबू, मेणबत्त्या, लाख, सरबतें, वार्निशें, टूथपावडर्स, मिल्क-रोझिस, कोल्डक्रीम्स, प्यामेटम्स, फ्रेंचपालिश, टिंक्चर्स, एशन्स आसिड, कोल्डवाटर्स इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, आणि सांकेतिकभाषा, कूटगणित, कूटकविता, कूटप्रश्न आणि अंकचमत्कार यांचा संग्रह होत जाईल.

याची किंमत आगाऊ एक वर्षाची २ रुपये व ट. ख. ६ आणे; किंमत पाठविणेंती मनीआर्डर करून पुस्तककर्त्याकडे पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री २० पृष्ठांचा निघतो. अगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं. ता. ८ आगष्ट सन १८८० इसवी.

गोविंद मोरोबा कार्लेकर,
हुन्नरसंग्रहकर्ते.

पत्ता -- नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

## मित्रचंद्र.

ह्या नांवाची एक नवीन कल्पित कादंबरी मी तयार केली आहे, व तीस वऱ्हाड व पुणें एथील दोन्ही प्राइस कमिटींनीं पसंत करून चांगलें बक्षीस दिलें आहे. या गोष्टीवरून व तसेंच या पुस्तकाचें आरंभीं कांहीं विद्वान् लोकांचे अभिप्राय दिले आहेत त्यांवरून या पुस्तकाचें स्वरूप सहज लक्षांत येईल. तरी सर्व लोक त्यास उदार आश्रय देऊन ग्रंथकारास उत्तेजन देतील अशी आशा आहे. ह्या पुस्तकाच्या प्रति अकोले एथें रा. रा. सदाशिवराव विष्णु भागवत लों कलफंड ऑव्हरसियर यांचेपाशीं दर प्रतीस रु० १८४ प्रमाणें पाठविल्यास मिळतील. बाहेरचे लोकांस टपालखर्चाबद्दल तीन आणे अधिक पडतील. कळावें. मुक्काम बाळापुर तारीख २६ माहे जुलै सन १८८० इसवी.

पांडुरंग गोविंद पारखी
हेड मास्तर स० शाळा बाळापुर.

## न्यायसार.

( नवीन मासिक पुस्तक. )

हें उमरावतीस प्रमोदसिंधू छापखान्यांत छापत असतें. यांत इंडियन ला रिपोर्टांतील दिवाणी, फौजदारी, धर्मशास्त्र, शरा, प्रमाणशास्त्र, करारशास्त्र व स्टांप, नोंदणी, मुदत वगैरे प्रकरणावरील निवाड्यांचें सार दिलेलें असतें. व वऱ्हाडांतील सर्क्युलरें वगैरे ठराव छापत असतात. याची सालीना किंमत डाक हशिलासह ४८६ आहे. फुटकळ अंकास आठ आणे.

अंताजी गोविंद वकील.

## जाहिरात.

सर्व लोकांस खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं, बळवंत शेषराव चांदुरकर हा कांहीं दिवसांपूर्वी आमचेकडून मुखत्यार होता तेव्हां त्यानें आमचे खानगी कामांत पुष्कळ घोटाळा केल्यामुळें बरेच दिवसांपूर्वी त्याला आह्मीं कामावरून दूर करून त्याजपाशीं आमचे नावचें असलेलें मुखत्यारपत्रही रद्द केलें आहे या कारणासाठीं त्याजबरोबर तो आमचा मुखत्यार अगर नोकर या नात्यानें कोणीं वागणूक करू नये केली असतां रद्द समजली जाईल कळावें. तारीख २१ माहे सप्तंबर सन १० वसवी. ८८

( सही ) बळवंत रामचंद्र देशपांडे
प्र० इलिचपुर- खोलापुर
दस्तुर खुद.

वऱ्हाडसमाचार.

मिति भाद्रपद कृष्ण ३० शके १८०२

## जयपुरचे राजाचा मृत्यू.

राजपूत संस्थानांतील जयपुरचे नामांकित राजे श्रीमंत महाराज रामशिंगजी हे तारीख ८ सप्तंबर रोजीं मरण पावले हें वर्तमान मागें लिहिलेंच आहे आज त्याविषयीं थोडी माहिती लिहितो. हे महाराज चांगले विद्वान, लोकप्रिय, धर्मात्मे व आपल्या प्रजेसी अयंत ममताळू असून ब्रिटिश राज्याविषयीं यांची स्वामीभक्ति फार उत्तम होती. शिवाय हे सुधारणाप्रिय होते. यांनीं आपले राजधानी शहराची सुधारणा फारच उत्तम केलेली आहे. हे चांगले धर्मात्मे होते. दररोज सहा तास देवदेवतार्चनात घालवीत असत. यांस शिकारीचा शोक असे, उत्तम फोटोग्राफ हे घेत असत. यांनीं आपल्या राज्यांत महाराज कालेज, संस्कृत पाटशाळा, राजपूत स्कूल, पुस्तकालय, कौशल्य शाळा. धर्मार्थ दवाखाने व छापखाने ठेविले होते व जयपुर ग्याझेटनावाचें सरकारी वर्तमानपत्रही यांचे राजधानींत निघत असे.

यांचा जन्म सन १८३१ त झाला, व मरणसमयीं यांचें वय ४७ वर्षांचें होतें. जन्मल्यापासून १७ च महिन्यांनीं यांचे तीर्थरूप मरण पावले व यांस राज्याधिकार प्राप्त झाला. हे सन १८६९ पासून सन १८७५ पर्यंत ६ वर्षे हिंदुस्थान सरकारचे कायदे कौन्सलांत मेंबर होते. व बडोद्याचे श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांच्या चौकशीसाठीं जे कमिशन नेमिलें होतें त्यांतही सरकारानें यांची नेमणूक केली होती येणेंकरून इकडेही हे विख्यात आहेत. यांनां ७ बायका आहेत परंतु पुत्रसंतान नाहीं पण मरणापूर्वी त्यानीं दत्तक घेण्याची तजवीज केलेली आहे.

जयपुर संस्थान फार जुनें आहे. एथील राजे सूर्यवंशज आहेत. असें लिहिलेलें आहे कीं दशरथ पुत्र रामराजा याचा ३४ वा पुरुष जो धवल राय राजा तो जयपुरच्या गादीचा स्थापक होय. त्यानें इसवी सन ९६ त या राज्याची स्थापना केली. याचे वंशांत दुसरा जयशिंग ह्मणून राजा झाला तोही मोठा विख्यात होता. तो ज्योतिष शास्त्रांत मोठा निष्णात होता. त्यानें ग्रहास चालन दिल्ली व काशी, दिल्ली, जयपुर वगैरे ठिकाणीं वेधशाळा स्थापिल्या होत्या. अंबर येथें पहिली राजधानीची जागा होती ती त्यानें जयपुरास नेली. व शहराची रचना शिल्पशास्त्र प्रमाणें इतकी उत्कृष्ठ केली कीं साऱ्या हिंदुस्थानांत तें शहर पाहण्याजोगें झालेलें आहे. शहरांत मुख्य दोन रस्ते ते प्रत्येकी ???

फुटांचें आहेत. त्यांस आडवे येऊन मिळणारें रस्ते ५५॥ फुटांचे, गल्या २७॥ फुटांच्या. दुकानें कमानदार, मधून मधून चौक साधलेले व नळाचें पाणी. आणिलेलें अशी फार छानदार रचना राजा जयशिंग यानें केलेली आहे. याचे पाठीमागें हल्लीं मरण पावलेले महाराज रामशिंगजी हे मात्र तसे रिझवातें शाल्क होते. यानीं त्या तशा उत्तम रचनेच्या शहरास आपले चातुर्यानें, प्रयत्नानें, व खर्चानें अधिक शोभविलें. यानीं जयपुरास गाडीचे दिवे केले आहेत व ग्यास एरंडेल ते आपणातून केलेला आहे सन ८६८ सालीं दुष्काळ पडला होता तेव्हां या महाराजानीं फार खर्च व प्रयत्न करून लोकांस जगविलें. याविषयीं इंग्लिश सरकारानें यांना १९ तोफांचा मान होता - तो २१ तोफांचा मान दिला. हे सर्वांच्या व विशेष साहेब लोकांच्या आगतस्वागताविषयीं फार काळजी घेत असत. व युवराज प्रिन्स आफ वेल्स यांची स्वारी इकडे आली होती त्यावेळीं त्यांनीं या महाराजाचें विशेष तारिफ केली.

जयपुर संस्थानाचें क्षेत्रफळ १५००० चौरस मैल आहे व त्यांत २० लक्ष लोक आहेत. व वसूल ४० लाखांचा आहे. हे महाराज पुत्राप्रमाणे प्रजेचें पालन करित असत. व त्यांच्या नीतीविषयीं दक्षता ठेवित असत. त्यामुळें तेथें बाजारांत रस्त्यावर कोणाच्या तोंडांतून अपशब्द निघत नाहीं असे ह्मणतात. या गोष्टीचा सर्वांनीं कित्ता घेण्याजोगा आहे. असे उत्तम रीतीनें प्रजेचें पालन करणारे राजे मरण पावल्याबद्दल पुन्हा आह्मी दुःख प्रदर्शित करितों.

---

अकोला शहरच्या छावणीकडील बाजूच्या मोकळ्या जागेवरील गवतचारणीच्या संबधानें अलिकडे मोठा बोभाट झाला आहे. दरसाल या व इतर सर्व मोकळ्या जागेवरील गवताची म्युनिसिप्यालिटी विक्री करीत असे व कोणी गवळी लोक तो हक्क विकत घेत असत व ते आपली जनावरें तेथें चारीत व लोकांकडून पैसे घेऊन त्यांचीं जनावरें चरूं देत असत. सालमजकुरीं ती वहिवाट म्युनिसिप्यालिटीनें बंद केली. कारण असें गवताची जमीनीचे मोकळे तुकडे थोडे व त्यांपासून रकम येणारी थोडी असून लोकांच्या जनावरांस विनाकारण त्रास होई सबब म्युनिसिप्यालिटीनें गवताची विक्री न करितां सालमजकुरीं सार्वजनिक उपयोगासाठीं या सर्व जागा खुल्या ठेविल्या. तथापि छावणीकडील बाजूस सर्व लोकांचीं गुरें आल्यानें युरोपियन लोकांस त्रास होईल व त्यांच्या बागास आणि झाडाझुडपांस नुकसान येईल ह्मणून नदीच्या पूर्व भागाकडे कोणी गुरें न चारितां पश्चिमेकडे बंदोबस्तानें चारावीं असा ठराव केला. व त्याप्रमाणें वहिवाट सुरू आहे. तथापि म्युनिसिप्यालिटीनें ही गोष्ट जाहिरातीनें सर्व लोकांस कळविली नाहीं यामुळें व दुसरे एके कारणामुळें बहुत लोकांचीं गुरें नित्य धरिलीं जाऊन त्यांनां वारंवार त्याबद्दल नुकसान सोसावें लागत आहे. पण या आठवड्यांत तशा बाबदींत एक खटला होऊन त्याचा निकाल झाला त्यामुळे चालू वहिवाटींत कांहीं बदल होऊन लोकांस सुखावह अशी स्थिती होईल अशीं आह्मांस उमेद आहे.

सदरीं दुसरे एके कारणावरून लोकांचीं गुरें धरिलीं जात ह्मणून लिहिलें आहे तें कारण आमचे ऐकण्यांत असें आलें कीं हल्लीं चे डिपुटी कमिशनर मे० फिटझरलड साहेब यांनीं कांहीं लोक मोकाट गुरें धरण्याच्या कामाकरितां नेमिले आहेत. त्यांनीं गुरें धरून आणलीं ह्मणजे दर गुरामागें एक आणा प्रमाणें त्या धरणाराची मजुरीही गुरांच्या मालकाकडून घेत असत. त्या लोकांस पगार काय तो हाच ह्मणून तो अधिक मिळावा या आशेनें ते त्या कामांत अधिकप्रसंगहीं करून रस्त्यावरचीं, घरानजीकचीं, आगळीकें न सापडलेलीं अशीहीं गुरें कधीं कधीं धरून नेईत असें ह्मणतात परंतु; गोरगरीबांस त्याविषयीं आपली दाद लावितां आली नाहीं. पण सदरीं सूचित केलेल्या खटल्याच्या योगानें त्या कामांत अन्याय होत होता अशी कल्पना करण्यास आतां जागा झाली आहे. तो खटला असाः —

डाक्टर लिटल साहेब स्यानिटरी कमिशनर. यांचीं कांहीं जनावरें त्यांचा मनुष्य रस्त्यावरून घेऊन जात असतां डिपुटी साहेबांनीं जनावरें धरण्यासाठीं नेमिलेल्या लोकांनीं तीं पाहिलीं व लागलीच धरून कोंडवाड्यांत पोचविलीं. पुढें डाक्टर साहेबांनीं कोंडवाड्याचीं खर्च वगैरे देऊन तीं जनावरें सोडवून नेलीं. व विनाकारण आपलीं जनावरें धरल्याबद्दल मि० हेर साहेब असिस्टंट कमिशनर यांजकडे फिर्याद केली. त्यांनीं त्या गोष्टीची चौकशी करून ठरविलें कीं जनावरें धरणारांनीं गैरशिस्तपणानें तीं धरिलीं सबब ते अपराधी आहेत. व त्यानीं आठ आठ आणे दंड द्यावा. कोंडवाड्यकडे स्यानिटरी कमिशनर साहेबानीं भरलेला पैसा त्यांचा त्यांनां परत मिळावा. व कांपेनसेशन ह्मणून आणखी १० रुपये फिर्यादीस मिळावे व ते रुपये डिपुटी कमिशनर साहेबानीं द्यावे; कारण जनावरें धरणारांनीं जें कृत्य केलें तें त्यांच्या हुकमतींच्या तांबेदारींत केलें. आणखी असेंही ठरविलें कीं अशा प्रकारचे नोकर ठेवून त्याच्या पोटगीचा एकेक आणा दर जनावराबद्दल त्याच्या मालकापासून घेणें ही गोष्ट अगदी अन्यायाची आहे.

या गोष्टीची अंमलबारी कशी काय झाली ती आह्मांस समजली नाहीं पण फौजदारी कोर्टाचा अशा अर्थाचा ठराव झालेला आह्मी आपल्या वाचकांस कळविला आहे. आतां आमचें असेंच केवळ ह्मणणें नाहीं कीं गैरशिस्तपणानेंही गुरें धरावींत अशी त्या लोकांस डिपुटी कमिशनर साहेबांची फूस होती. ते लोक अधिकप्रसंगी असून आपले फायद्यासाठीं न धरण्याजोगीही गुरें ते धरीत असतील. पण आमच्या गरीब रयतेस त्या गोष्टीची दाद लावतां आली नाहीं. ती स्यानिटरी कमिशनर साहेबानीं लाविली याबद्दल लोकांनीं त्यांचे आभार मानिले. मागें जुडिशियल कमिशनर कर्नल बेल साहेब यांचीही जनावरें अशीं धरलीं गेलीं होतीं व त्यांनीं बोभाटा केल्यावरून त्यांचे पैसे परत मिळाले होते. पण असा फौजदारींत निकाल झाला नव्हता. दुसऱ्या कोणा मोच्या गृहस्थांचीं जनावरें अशींच धरिलीं होतीं व त्यानीं निमूटपणें त्याजबद्दल पैसे दिले असे आह्मांस समजलें आहे. अस्तु. सदर्हू गुरें धरणारे लोकस अजून फाटा दिला किंवा नाहीं ते आह्मांस समजलें नाहीं. आमची इच्छा आहे कीं मे० डिपुटी कमिशनर साहेब व म्युनिसिप्यालिटी लोकांचें गाऱ्हाणें व त्यांस आजवर झालेला ताप मनांत आणून दयाळूपणानें कांहीं योग्य तजवीज करील व ती सर्वांस प्रसिद्ध रीतीनें कळवील.

---

## काबूल कंदाहार.

अयूबखान रशिया देशांत जाऊन अबदूल रहमानसारखा आपला लगा लावून रहाणार असें वर्तमान आहे— याची फौज गिझनीस गेली तेव्हां तेथील गवर्नरानें तांतील गिलझाई लोकांस कांढून आपआपल्या घरीं जाण्यास सांगितलें व काबूली आणि कोहिस्तानी लोकांस काबुलाकडे पाठवून दिलें. आणखी असें वर्तमान आहे कीं अयूबखान फारा शहराचे आसपास कोठें आहे. कारण अफजुलखानाचा मुलगा अबदुल्ला यानें हिरात शहरांत आपलें स्तोम माजवानें व अयूबखानाची डाळ शिजूं देऊं नये असा प्रकार चालविला आहे. यावरून त्यांचा कदाचित गोळाबार होण्याचा संभव आहे. कंदाहारकडे व्यापार वगैरे सुरळींत चालू झाला. तिकडील फौजा परत येऊं लागल्या आहेत. काबुलाकडे अजून व्यापाराची सुरळीत व्यवस्था झाली नाहीं तरी अमीर अबदूल रहमान यानीं राज्यकारभारावर बरेंच चित्त पुरविलें आहे असें खालील एका गोष्टीवरून दिसतें ती गोष्ट अशीः-

एका मुसलमान सौदागरानें एका हिंदू सोनाराचा खून केला असें अमीरास कळल्याबरोबर त्यानें त्या सौदागरास तोफेचे तोंडीं उडविलें. हें करण्यांत त्याचा इरादा असा कीं धर्मवेड्या मुसलमानानीं विनाकारण गरीब हिंदू लोकांचा छळ करण्यास यापुढें त्यास धास्ती रहावी. हें त्यानीं फार चांगलें केलें.

---

# गांवसफाईचें बुकसर्क्युलर

नंबर १६ सन १८८०

( मागील अंकावरून पुढें चालू. )

भाग २. सुखवस्तु लोकानीं पाळण्याचे नियम

१. घराच्या हद्दींत कोणत्याही प्रकारची खांच व पेवांचा पायखाना कोणत्याही कारणाकरितां राहूं देऊं नये. यांच्या योगानें रोग उत्पन्न होतात. यापासून जें घाणेडें पाणी येतें त्याच्या योगानें सभोंवतालची जमीन खराब होते आणि तें आसपासच्या विहिरींत जातें, आणि या खराब झालेल्या विहिरींचें जें पाणी पितात त्या लोकांत हटकून रोग उत्पन्न होतात.

२ स्नानाचें किंवा दुसरे कोणत्याही प्रकारचें पाणी जाण्याकरितां घरांत एखादि खांच असेल तर त्या ठिकाणीं मातीचा डेरा किंवा रांजण पुरावा आणि त्यांतलें पाणी दररोज सभोंवतालच्या जमीनीवर शिंपडावें, किंवा ज्या खांचेंत हें पाणी जातें तींत निंबुळीं, केळी, अंजीर, किंवा दुसरीं लहान व लवकर वाढणारीं अशीं एक दोन झाडें लावावीं ह्मणजे त्यांच्या योगानें पाणी खपलें जाईल. हा दुसरा मार्ग पहिल्यापेक्षां बरा आहे.

३ आवारांत विहीर असेल तर दर वर्षास पावसाळ्याच्या आरंभीं तींतील गाळ काढित जावा आणि विहिरीच्या भोंवतालीं जमीनीपासून कांहीं उंच अशी भिंत बांधावी ह्मणजे स्नानाचें पाणी आंत जाणार नाहीं. विहिरींतून बाहेर आलेलें पाणी तिच्या जवळ खोलगट जाग्यांत वगैरे सांचूं देऊं नये.

४ ओल्या जमीनीवर निजलें तर हटकून रोग उत्पन्न होतो आणि निजणाऱ्यांस सर्पदंशाची भीति असते. याकरितां तुह्मी व तुमचे कुटुंबांतील माणसांनीं चारपाईवर किंवा उंच बांधलेल्या मातीच्या चबुत्र्यावर निजावें आणि कांबळा किंवा जें पांघरूण अंगावर घेतलेलें असतें तेंच तोंडावर घेऊं नये.

५ निजायाच्या जाग्यांत गुरें बांधूं नये आणि गोठ्यांत वस्ती करूं नये. कोणी जर इतका गरीब असेल कीं निजण्याकरितां निराळी खोली करण्याची त्याला ऐपत नाहीं तर त्यानें गोठा दररोज स्वच्छ करण्याच्या कामाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे.

६ घरांतील, अवारांतील आणि गोठ्यांतील केरकचरा व शेण वगैरे यांचा उपयोग वेळच्या वेळेस गोवऱ्या वगैरे करण्याचे कामांत न झाल्यास तें सर्व प्रत्येक घरधन्यानें दररोज आपल्या शेतांत खताकरितां पाठवून द्यावें, किंवा सार्वजानिक कचऱ्याच्या ढिगाकरितां पाटलानें नेमलेल्या जाग्यावर टाकून द्यावें.

७ ज्यांच्या घरीं पायखाने असतात त्यांनीं पाटलानें नेमलेल्या जाग्यावर किंवा त्यानें ठरविलेल्या हद्दीच्या बाहेर मैल दररोज टाकविण्याची तजवीज केली पाहिजे. हा मैल कोणत्याही रस्त्याच्या बाजूला किंवा विहिरीच्या अथवा नाल्याच्या नजीक टाकूं नये.

८ पूर्वी ( सामान्य सूचनांच्या १ ल्या कलमांत ) सांगितलेंच आहे कीं जर एखाद्या गांवीं महामारी येईल तर पुष्कळ लोक एकत्र जमले असतील तेथें आणि ज्या ठिकाणीं या रोगाची सात आली असेल त्या ठिकाणीं अगदीं न जाणें व शरीरास श्रम न होऊं देणें इत्यादि गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावें. घरांत महामारीचा उपद्रव झाला असल्यास सर्व ठिकाणीं स्वच्छता ठेवण्या विषयीं विशेष काळजी घ्यावी, आणि या करितां वस्त्रें व बिछाने मोकळ्या हवेंत ठेवावे, भिंती स्वच्छ कराव्यां, जी जमीन आजारी झालेल्या मनुष्याच्या हातून खराब झाली असेल तींतील माती खणून काढून बाहेर टाकून द्यावी आणि अशींच प्रकारचे दुसरे उपाय करावे.

९ महामारीचें कारण कांहींही असो, परंतु तें जाग्याला लागून असतें यांत संशय नाहीं; याकरितां ज्या ठिकाणीं हा आजार कोणास झाला असेल तें ठिकाण, होऊं शकेल तर, कांहीं दिवस पर्यंत सोडून देणें हा मार्ग सर्वांत फार उत्तम आहे महामारीचा उपद्रव एखाद्या घरांत झाला असला तर ज्या खोलींत तो झाला असेल ती, होऊं शकेल तर, दहा दिवस रिकामी ठेवावी. थोड्या दिवसांनीं त्याच घरांत दुसऱ्या मनुष्यास हा आजार झाला तर तें सर्व घर दहा दिवस पर्यंत सोडून द्यावें अगदीं थोड्या अंतरावर जाऊन राहण्यानें देखील पुष्कळ वेळां कार्य होतें. कांहीं लोकांच्या हातून कदाचित् या सूचनेप्रमाणें वागणें होणार नाहीं. कांहीं कांस असें वाटेल कीं यापासून व्यर्थ त्रास मात्र होणार आहे. परंतु अनुभवानें असें

सिद्ध झालें आहे कीं कांहीं दिवस घं. सो-डून जाणें हा मार्ग फार उत्तम आ. त्या पासून जरी पुष्कळ गैरसोय झाली व नि-वाऱ्याची जागा राहण्यास न मिळाल्यामुळें त्रास झाला तरी चिंता नाहीं.

१० दुसऱ्या भागांतील पाचव्या व आ-ठव्या कलमाप्रमाणें पाटील जी मदत माग-तील ती साधारण लोकांनीं दिली पाहिजे.

( पुढें चालू.

---

हैदराबाद — अलीशान रेसिडेंट साहेबां ची स्वारी १० वे तारखेस सिमल्याकडे गे-ली. यांना पोचवावयास स्टेशनावर सर सालरजंग साहिब उभयतां चिरंजिवासह व शमसुल उमराव साहेब आपले उभयतां चिरंजिवासह गेले होते. या शिवाय कर्नल फ्रेजर साहेब, मे. विलसन साहेब, डाक्टर ल्या साहेब, कर्नल क्यांबेल साहेब, मे. सयद नुरुद्दिन साहेब ही मंडळी व सिकंदराबादची ही मंडळी स्टेशनावर रेसिडेंट साहेबास पों-चवावयास गेली होती. त्यानीं सर्वांचे आभार मानिले. सहा आठवड्यानीं स्वारी परत येईल.

मि० ट्रेव्हर साहेब कांहीं जरूरीचे कामा करितां ४ दिवस मुंबईस गेले आहेत.

रसिडेन्सी बाजारांत तारीख २९ रोजीं रात्रीं ४ शिदी लोकांनीं दंगा केला. त्यांत ३ मनुष्य जखमी झालीं आहेत चौकशी चालू आहे.

इकडे पर्जन्य चांगला झाला. कांहीं का-ळजी राहिली नाहीं.

---

## वऱ्हाड

---

शर्यती— या महिन्याच्या शेवटल्या आठ वड्यांत एथें घोड्याच्या शर्यती वगैरे खेळ होणार आहेत. मागील वर्षी फक्त युरोपियन लोकांनीं आपल्यामध्यें वर्गणी जमवून हे खे-ळ केले होते या वर्षी त्यांचा विचार युरोपि यन व नेटिव खेळही एकत्र करावे असा आ हे. नेटिव लोकांच्या शर्यतीकरितां तारीख २६. ता. २८ व ता. ३० हे तीन दिवस नेमिले आहेत. व त्याकरितां बक्षिसें ठरविलीं आहेत. त्यांची जाहिरात दुसरीकडे छापिली आहे ती वाचकांच्या पहाण्यांत येईल. या दिवसांच्या मधले दिवस युरोपियन लोकांच्या शर्यतीकरितां असताल. नेटिव गृहस्थांनीही याकामास वर्गणी दिली असतां ती संतोषानें ग्रहण केली जाईल असें त्या कामाचे सेक्रेट री डा० ह्यूम साहेब यांनीं लोकांस कळवि ण्याविषयीं आह्मांस शिफारस केली आहे आणि त्यांची अशीही इच्छा आहे कीं, अ-धिक वर्गणीदार जमले व त्यांनीं कांहीं शर्ती कळविल्या तर त्यांबरहुकूमही तजवीज क-रितां येईल. हीही गोष्ट आह्मी आपले वा चकांस कळवितों.

---

रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर यांस खानेसुमारीचे कामाकरितां अकोला ? हरचे सुपरइंटेंडेंट नेमिले.

त आं

उपयुक्त

.ण सांकेतिक.

मे. दस्तूर बहिमनजी साहेब मी. आप. यांनीं सुरू केलेल्या धर्मशाळेचें काम पुरें झालें. ती धर्मशाळा सर्व लोकांच्या उपयोगा करितां खुली करण्याचा समारंभ विजया दश मीचे मुहूर्तानें होणार आहे असें समजतें. मे. कमिशनर साहेब यांनीं आपल्या हातानें धर्मशाळा उघडून द्यावी अशी दस्तुर बहिमन जी साहेब यांनीं त्यांस विनंती केली आहे व गावोगावचे बहुत लोकांस विनंतीपत्रें पाठ-विणार आहेत त्यावरून समारंभ मोठ्या था टाचा होईल यांत संशय नाहीं.

ले. कर्नल टवुइडी साहेब हैदराबादस अ सिस्टंट रेसिडेंट असून काबुलाकडे लढाईवर गेले होते. तें काम संपून तें परत यावयास निघाले. त्यांस आतां पश्चिम राजपुत संस्था नावर ऑफिशियेटींग एजंट नेमिलें आहे. व एरिणपुरा येथील ईरेग्युलर फौजेचे कम्यां डंटही त्यांस नेमिलें.

---

कर्नल बुशबी साहेब जुडिशियल कमिश नर उमरावतीस गेले आहेत. शुक्रवारीं व श-निवारीं तेथें सेशन होते. दोन अपराध्यांस फाशीची शिक्षा झाली.

---

सरकारी कामदारांच्या हायर व लोअर स्य्यांडर्डच्या परिक्षा या महिन्याचे २९ वे तारखेस अकोल्यास सुरू होतील असें सम-जलें आहे.

---

कर्नल बेल साहेब कमिशनर यांची स्वारी उमरावतीस गेली आहे.

---

अगरवें त्रिंबक राव देशमुख यांस व यां-चे घराण्यांतील कोणास देशमुखी मिळूं नये असा ठराव झाला.

---

मेजर बुलक साहेब पुढील महिन्यांत वि-लायतेहून इकडे येतील. इतक्यांत येणार होते पण त्यांनीं सहा आठवड्यांची रजा तिकडे अधिक घेतली.

---

मेजर लेन साहेब इन्स्पेक्टर जनरल वि-लायतेस रजेवर आहेत तेही पुढील महिन्यांत परत येतील

---

डाक्टर आवट साहेब स्यानिटरी कमि-शनर विलायतेहून परत न येतां तिकडेच पेनशन घेणार.

---

वऱ्हाडी लोकांशिवाय दुसरे लोकांस सर-कारी नोकरीवर लावूं नये याविषयीं जो मागें रेसिडेंट साहेबांचा ठराव झाला आहे त्याप्रमा णें चालण्यास विद्याखात्यांत अडचण पडते याविषयीं राव बहादूर डायरेक्टर साहेबांनीं रेसिडेंट साहेबांस कळविल्यावरून ठराव झा-ला कीं वऱ्हाडांत विद्याखात्यास पाहिजेत तसे तयार लोक मिळूं लागतपर्यंत वऱ्हाडी लोकां विषयींचें सर्क्युलर विद्याखात्यास लागू नाहीं असें समजावें.

यांत प्रकरणीं आमचा व आमचे प्रिय बंधू उर्दुअखबारकर्ते यांचा इंग्लिशमध्यें वा-द मागें चालला होता व आमचें मत सदरी ल मुद्यावरच होतें हें आमचे वाचकांस आठ वत असेल

---

इलिचपुरास वऱ्हाडमित्र नावाचें वर्तमान पत्र निघत होतें त्याचे कर्ते रा. रा. एकनाथ सखाराम काटस्थाने हे आजारी होऊन नग रास आपले घरीं गेले होते व तिकडे ते मर ण पावले हें ऐकून आह्मांस दुःख वाटतें. एकनाथपंत स्वभावानें गरीब असून सर्वांशी मिळून होते. त्यामुळें त्यांची स्थिति आल्यावे ळेपेक्षां चांगली सुधारली होती पण त्यांस अ कालिक मृत्यूनें गाठलें त्यास इलाज नाहीं. त्यांचें वर्तमानपत्रही बंद झालें. पण आह्मांस कळावेण्यास संतोष वाटतो कीं तेथें सूर्यकांत नावाचें नवीन एक वर्तमानपत्र रा. रा. वाम न नारायण राजे या नावाच्या गृहस्थानीं सु रू केलें आहे त्याचा पहिला अंक आह्मांस पोचला. तें सुरळीत व दीर्घकाल चालो असें आह्मी इच्छितों.

---

वाशिम जिल्ह्यांत किन्ही एथें ८ वे तार-खेस वीज पडून २ माणसें मेलीं व १४ ज खमी झालीं.

---

वाशिम जिल्ह्यांत ता० ११ पासून १८ पर्यंत २० इंच पर्जन्य पडला. तारीख ११ सप्तंबरपर्यंतचे पर्जन्याचा हिशेब येणें प्रमाणे आहे.

अकोला १० इंच १९ सेंट, बुलढाणा १९–९२, वाशिम १६–३६, उमरावती ७–१९, इलिचपुर १२-१२ व यवतमाळास १८–६८. उमरावती जिल्ह्यांत एकंदरीत प र्जन्य कमी आहे असें दिसतें.

---

नेमाड जिल्ह्यांत सिंगाजीची जत्रा या म-हिन्याचे १५वे तारखेपासून २३वे तारखेपर्यं त आहे. व तेथें जनावरांचें प्रदर्शन होऊन २०० रुपयेपर्यंत बक्षिसें देणार आहेत. अ-सें प्रसिद्ध करण्याविषयीं डिपुटी कमिशनर साहेबांकडून आह्मास फर्मास आली आहे.

---

मि० लायल साहेब हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी जे वऱ्हाडांत मागें कमिशनर होते ते कंदाहाराकडे जाण्यास निघालेले असून आजारी पडून लाहोरास राहिले आहेत.

---

इचलकरंजीकरांचें नाटकाची गवर्नर साहेबांचे मेजवानीचे प्रसंगीं फार प्रशंसा झा-ली. श्राकृत चमत्कार हें नाटक त्या प्रसंगीं त्यांनीं केलें होतें. हा खेळ व तारा नाटकाचा खेळ हें त्या मंडळीस मोठें मोलाचें भांडवल आमच्या वऱ्हाडांतून मिळालेलें आहे. त्यावर ठिकठिकाणीं तें हजारों रुपये मिळवितांहेत. पुन्हा त्यांनीं आणखी वऱ्हाडांत खेप केली असतां त्यांचें भांडवल अधिक वाढल. हेंही खरें आहे कीं, ते व्यवसाय करणारे शहाणे आहेत; नाहींपेक्षां कित्येक भांडवलही बुडवून फजिती करून घेतात. उदाहरण- नानाभाई गणपतराव धैर्यवान !

---

उमरावतीच्या एका व्यापाऱ्यानें पाऊस पडण्यापूर्वीं पुष्कळ धान्य खरेदी केलें व धा रण उतरल्यानें त्यास एक लक्ष रुपये तोटा झाला सबब त्यानें विष खाऊन जीव दिला अ सें टाइम्स पत्रास कोणी कळविलें आहे.

---

## जाहिरात.

---

अकोलें येथें ज्या घोड्याच्या शर्यती हो-णार आहेत. त्यांत खालीं लिहिलेल्या शर्यती नेटिव ( यांदेशचे. ) लोकांकरितां मुद्दाम राखून ठेवल्या जातील– त्यांच्या तारखा व शर्ती पुढें लिहिल्या प्रमाणें.

पहिला दिवस– रोज मंगळवार तारीख २६ माहे आक्टोबर सन १८८०

१ बक्षिस रुपये ५० या शर्यतींत ने-टिव सभ्य गृहस्थांचे घोडे सोडले जातील. मात्र घोड्यांची उंची मुठी १४ ह्मणजे ५६ इंचाहून ज्यास्त नसावी– टप्पा अर्धमैल– प्रत्येक घोड्यास १ रुपये फी पडेल.

२ बक्षिस रुपये २५ साडेबारा मुठी ह्मणजे ५० इंच उंचीचे, नेटीव लोकांचे, बट- अंतर पाव मैल- फी माफ.

दुसरा दिवस- रोज गुरुवार तारीख २८ माहे आक्टोबर सन १८८०

१ बक्षिस रुपये ३०- नेटीव लोकांचीं तेरा मुठी ह्मणजे ५२ इंच उंचीचीं तट्टें या शर्यतींत सोडलीं जातील. अंतर ६६० वार फी माफ.

२ बक्षिस रुपये २५- नेटीव लोकाचे साडेतेरा मुठी ह्मणजे ५४ इंच उंचीचे या-बू- अंतर ६६० वार- फी माफ

तिसरा दिवस- शनिवार तारीख ३० मा-हे आक्टोबर सन १८८०

१ बक्षिस रुपये ७५- नेटीव सभ्य गृह-स्थांचे घोडे- यांत उंची बद्दल कांहीं इयत्ता नाहीं. अंतर ११०० वार- फी दर घोड्या-स ५ रुपये पडेल.

टीपः- घोड्यांची उंची मोजतांना जमी नीपासून घोड्याचे खांद्याचा जो सर्वांहून उंच भाग तो उभा मापावा. ह्मणजे तीस घोड्याची उंची समजावी.

प्रत्येक दिवसीं घोड्याची शर्यत सुटण्या-पूर्वीं एक तास त्या दिवसीं सुटणारे घोड्या ची उंची मापली जाईल. परंतु जर कोणी आपले घोडे कोणतेही दिवशीं सकाळचे ८ पासून १० वाजण्याचे दर्म्यान मेहेरबान डा-क्टर ह्यूम साहेब किंवा मेहेरबान हेअर साहेब यांजकडेस पाठविल्यास ते मोठ्या खुशीनें त्यांस मापून उंचीचे सर्टिफिकेट देतील व हें सर्टिफिकेट असलें ह्मणजे पुन्हा घोड्याचा उंची मोजावी लागणार नाहीं.

स्वाराचें वजन कितीही असलें तरी चा-लेल परंतु स्वार नेटिवच असावेत.

तारीख माहे सन १८८० इसवी.

## वर्तमानसार.

---

गेल्या आठवड्यांत भागीरथीला फार मो ठाले पूर आले. हरिद्वार एथें १००० मजूर कालव्याचे कामावर होते त सर्व वाहून गेले अशी बातमी आहे.

एका मोळीविक्यास पोलिसचा शिपाई काबुलास पाठविण्यासाठीं पकडूं लागला. त्यानें मी येत नाहीं असें साफ सांगितलें. पो लिसचा शिपाई तें ऐकेना तेव्हां तो ह्मणाला, लढाईत जाऊन मरावयाचेंच तर मग तूं आणि मी एथेंच लढूं. मग शिपाई निमूटप

णे गेला. येऊन जाऊन गरीबाच्या पाठी ब्रह्मराक्षस.

मुंबई एथील हायकोर्टांतील फार जुने त्रान्सलेटर रा. रा. बाळभास्कर शिंत्रे यांस गेल्या रविवारीं देवाज्ञा झाली.

लाहोर एथें एका बाईस नुक्तीच चार मुलें झालीं. त्यांपैकीं दोन मेलेलीं उपजलीं. तिसरें उपजल्यावर मेलें व त्याच्यामागून आई मरण पावली ४थें मूल जीवंत आहे असें बां. ग्या.-वरून समजतें.

इटली देशांतील एक व्यापारी रेल्वेनें प्रवास करीत असतां एके दिवशीं खाना खाते वेळेस खाण्याचा पदार्थ चाकूच्या टोंकास अडकवून तोंडांत घालूं लागला. त्याच वेळेस गाडीला धक्का बसल्यामुळें त्याचें तोंड चाकूवर खूप जोरानें आपटून फाटलें. सबब त्यानें नुकसानीबद्दल कंपनीवर फिर्याद केली. कंपनीनें तक्रार केली कीं सदहू इस' यानें असभ्य रीतीचें अनुकरण करून आपणच करून घेतलें. कारण कोणीही सभ्य मनुष्य चाकू किंवा दुसऱ्या कोणत्याही शस्त्रानें पदार्थ तोंडांत टाकीत नाहीं; सबब झालें तें ठीक झालें !

दुष्ट-आई—एका बाईनें आपलें सात दिवसांचें मूल जिवंत असतांच एका पेटींत घालून शेजारच्या खेड्यांत नेऊन पुरून टाकिलें असें सिमन पत्रावरून समजतें. सरकारी वकिलानें तिजवर फिर्याद केली आहे परंतु ती बाई कोठें नाहींशी झाली आहे.

चहा पत्राचा ( टी ग्याझेट ) एक बातमीदार असाम प्रांतांतून लिहितो कीं, मि. सी. इर्विंग नावाच्या एका गोऱ्यानें एक ट्रामवेची नवी गाडी केली असून ती लांकडी एकेरी रस्त्यावर मजुरांकरवीं चालवितां येते आणि दर तासास ९ मैल चालते. एक मैल रस्त्यास खर्च सुमारें एक हजार रुपये लागता. ने० ओ०

युरोपियन मोहतर— रूस देशच्या बादशहानें आपल्या ताब्यांत असणाऱ्या एका बाईशीं लग्न केलें त्या लग्नास 'मोर्गनाटिक म्यारेज' ह्मणतात, ह्मणजे अशा लग्नांत असा करार असतो कीं त्या स्त्रीला जीं मुलें होतील त्यांचा बापाच्या मिळकतीवर कांहीं वारसा चालणार नाहीं! चमत्कारिक लग्न! हे युरोपांतील 'मोहतर ह्मटलें पाहिजे. न्या. सिं.

नेक नामदार सर जेम्स फर्ग्युसन गवरनर साहेब हे पुण्यास गणेश खिंडींतील सरकारी बंगल्यांत युरोपियन व कांहीं नेटिव गृहस्थांस ईव्हिनिंग पार्टी देणार असून त्यांसमयीं इचलकरंजीकर नाटककार मंडळींचें नाटक करणार आहेत ह्मणून कळतें.

पार्शी लोकांची संख्या—एका इंग्रजी वर्तमानपत्रांत असें छापलें आहे कीं, इराण जो पार्शी लोकांचा ह्मणजे जरतुस्ती धर्मानुयायी लोकांचा मुळचा देश त्यांत हल्लीं ८,१९८ गेबेर ( पार्शी ) लोक आहेत. त्यांपैकीं ६,४८३ लोक येज्द येथें, १,४९८ किरमान येथें, १५० तेहेरान येथें, ३० शिराज येथें, १९ काशाव येथें, आणि १२ आबुशहर येथें आहेत. त्यांस विद्येचा कांहीं संस्कार झालेला नाहीं. त्यावर तेथील मुसलमान लोक फार जुलूम करितात, तरी ते त्या मोंगल लोकांपेक्षां फार प्रामाणिक व नीतिमान आहेत त्यांच्या पैकीं एक पार्शी गृहस्थ फार श्रीमंत आहे. त्या विषयीं तेथील सरकारानें असा ठराव केला आहे कीं, त्यांच्या मुलांपैकीं जो कोणी महंमदी धर्माचा स्वीकार करील त्यालाच त्याची संपत्ति मिळेल. हा केवढा जुलूम! ह्या लोकांची संख्या आतां वाढत आहे किंवा कमी होत चालली आहे हें समजत नाहीं. त्यांवर तेथील सरकारानें सालीना ३,६०० रुपये कर बसविला आहे तो हिंदुस्थानांतील त्यांचे धर्मबांधव भरीत असतात. पश्चिम हिंदुस्थानांत १,३२,००० पार्शी लोक होते, त्यांपैकीं ४४,००० मुंबईंत होते, असें सदरील पत्रांत सांगितलें आहे. परंतु इकडील गेल्या खानेसुमारीवरून असें दिसतें कीं, सर्व हिंदुस्थानांत त्यांची एकंदर संख्या ७०,०४३ असून तीपैकीं मुंबई इलाख्यांत ६७,११९ आहे. मुंबईंत ५०,००० हून कमी आहे असें वाटतें. ज्ञा. प्र.

## आरोग्यशास्त्र.

साखर— बाजारांत साखर पुष्कळ जातीची आढळते- ही उसाच्या रसापासून करतात. तींत हलकी व उंच असे दोन प्रकार असतात. कित्येक तांबूस रंगाची साखर पसंत करतात कारण त्यांत गोडी ज्यास्त असते. परंतु ती स्वच्छ नसते ह्मणून पुष्कळांस जाचते. लहान मुलांचें पोट ह्या साखरेनें नेहमीं बिघडतें व कोठ्याला वायु धरून जुलाब होतात. गरीबगुरीब लोक गूळ, काकवी, बतासे, इत्यादि साखरेच्या पदार्थांवर सणसुद्दी काढतात. परंतु श्रीमान व थोडेबहुत सुखवस्तु लोकांस चाहा, काफी व दुधांत घालण्यास साखरेची जरूरी नेहमी लागते तर नेहमी गूळ, काकवीसारखे अशुद्ध पदार्थ सेवन करून त्यांचें चालणार नाहीं. त्यापासून कृमी रोगादि उपद्रव नेहमी होतील. साखर घेणें ती जितकी सफेत मिळेल तितकी पाहून घ्यावी. ती ओलसर नसावी व पाण्यांत टाकली असतां तळास लेश मुळींच राहू नये. दुधापासून व फळांच्या रसापासून साखर काढतात परंतु ती औषधांखेरीज फारशी प्रचारांत येत नाहीं. साखर उघडी कधीं ठेवूं नये. ठेवली असतां मुंग्या, माशा इत्यादि अनेक कीटक तिच्या गोडीला लुब्ध होऊन आपलीं अंडीं व अनेक प्रकारची घाण तींत आणून टाकतात. व ती तशी मनुष्यांच्या पोटांत गेली ह्मणजे कृमी इत्यादि जठरांतराचे रोग उत्पन्न होतात.

आरारूट, टापिओका, सागुदाणे— हे पदार्थ अलिकडेस बहुतेक प्रचारांत आले आहेत. ह्यांत फारसा दगा नसतो व यांची पेज सकाळ दुपार; निदान दिवसांतून एकदां तरी दुधाबरोबर आपण घेतली किंवा लहान मुलांस दिली तर बरीच पुष्टिकारक होते.

मसाले— या नांवाचे अनेक प्रकार होतात परंतु त्या सर्वांचा खरा उपयोग ह्मटला तर तोंडाला रुचि येऊन पचन करणारे जितके शरीरांतील अवयव त्यांस उत्तेजन यावें व अन्नावर रसक्रिया यथायोग्य व्हावी इतकाच आहे. उत्तेजन आणण्याच्या कामांत कित्येक पदार्थ इतरांपेक्षां जास्त असून पुष्टिकारकही आहेत व साखरही ह्याच वर्गांतील होय. हे पदार्थ नुसते सेवन केले तरी चालतात. परंतु कित्येक पदार्थांबरोबर मिश्र करून घेतले तर त्यांची रुचि व स्वाद वाढवितात. मसाल्याचे वर्ग पाडले तर- खारट, आंबट, तेलकट, गुळचट, तिखट व सुवासिक असे होतील. ह्यांपासून तोंड व जठर यांतील पिंडांस उत्तेजन येऊन रसोत्पत्ती वाढते. चिंच किंवा एखादा गोड पदार्थ दृष्टीस पडला ह्मणजे लागलेच तोंडाला पाणी कसें सुटतें हें सर्वांस माहित आहेच मसाल्याची जरूरी थंड प्रदेशांतील लोकांस फारशी लागत नाहीं. परंतु दाक्षिण हिंदुस्थाना सारख्या उष्ण प्रदेशांत त्याची अवश्यकता फार आहे. कारण उष्णतेच्या झपाट्यानें जसे आह्मी नेहमी कमजोर राहतों त्याच प्रमाणें आमची अन्न पचन करणारीं इंद्रियेंही निस्तेज असतात. ह्मणून नेहमीं निरनिराळ्या मसाल्यांनीं त्यांस उत्तेजन आणल्याखेरीज रसोत्पत्ती बरोबर होत नाहीं. दुसरें कारण असें आहे कीं, आह्मी नेहमीचे धान्यावर राहाणारे व धान्यांत पाहूं गेलें तर उत्तेजक अंश कांहींच नाहीं; सर्वच पळमळीत तर ताटभर भात किंवा भाकरी बरोबर कढी, तिखट किंवा कांहीं तरी कोरड्यास असल्या शिवाय जठरानें तें पचवावें तरीं कसें? ह्मणूनच आमच्या लोकांस मिरच्या, काळे मिरीं, धणे, हळद, आलें, लसूण, कांदे तसेंच वेलची, लवंगा व इतर सुवासिक मसाले लागतात. घांटावरील लोकांचा तिखटाचा गोळा पाहिला ह्मणजे तें न खाणाऱ्याच्या डोळ्यांतून पाणी येतें. जे लोक थोड्या व अतिशय पुष्टिकारक आहारावर रहातात त्यांस इतक्या तिखट पदार्थांचा मुळींच जरूरी नसते. एक चूक आपल्या लोकांत नेहमी आढळते ती ही कीं एकाद्या पदार्थाला स्वाभाविक आंगची रुचि व स्वाद असतांही आमचे लोक त्यांत अतिशय मसाला घालून शुद्ध अमृताचें विष करतात ह्मटलें तरी हरकत नाहीं. कित्येक श्रीमंत लोक केशर, कस्तुरी व सोन्याचा वर्ख ज्यांत त्यांत घालतात परंतु ह्या श्रीमंताईनें शरीरास इजा कितपत होते हें त्यांस मुळींच ठाऊक नसते. वाजवीपेक्षां जास्त तिखट किंवा मसालेदार पदार्थ सेवन केल्यानें क्षुधा मंद होते, जठराचा व अंतराचा दाह होतो, वांति, आतिसार आमांश मोडशी व यकृताचे ( लिव्हर ) रोग उत्पन्न होतात ह्मणून ज्या पदार्थांत आंगचाच जास्त वास किंवा रुचि असेल त्यांत मसाले मुळींच घालूं नयेत व ज्यांत असेल चांगले गुण नाहींत त्यांत ते साधारण रीतीनें घालावे. कित्येक त्या शिवाय नुसते शिजवले तरी पुरे आहेत.

मसाले घेणें ते जुने न घेववतील तितके बरे. ते भर वासाचे असून त्यांस कीड लागलेलीं छिद्रें मुळींच असूं नयेत ते उघड्यावर न ठेवितां हवा न लागेल अशा गच्च तोंडाच्या भांड्यांत नेहमी सुक्या जागीं ठेवले तर पुष्कळ दिवस टिकतात.

फळें-- फळफळावळ खाण्याचा प्रचार नेहमी आपल्या शक्तीप्रमाणें जितका ठेववेल तितका ठेवावा. आपल्या देशांत त्यांची कमताई नसल्यामुळें तसा प्रचार ठेवण्यास फारशी हरकत नाहीं. ज्यांत उंची फळें विकत घेण्याची शक्ति नसेल त्यांनीं आंबटीं लिंबें तरी घ्यावीं. चिंचेचा आमच्या लोकांत बराच खप आहे. परंतु ती कोकमसोला इतकी गुणकारक नाहींत. फळें खाल्यापासून नेहमी रक्तशुद्धि साफ होते. सु० प०

## सापकराची रोजनिशी.

सन १८८१ इसवी सालाकरितां.

सन १८८१ सालाकरितां जें रोजनिशीचें पुस्तक आह्मीं तयार करीत आहों त्याच्या नमुन्याचा साच्या वें पूर्वीपेक्षां उपयुक्त विषयांची बरीच ज्यास्त सुधारणा करणार आहों. हें पुस्तक येत्या नोवेंबर २९ वे तारखेचे आंत छापून तयार होईल. त्यांत सरसालचे दिनचर्ये संबंधी मराठी, तिथि, वार, महिने, सूर्योदयास्त. विशेष उपवास ग्रहणें सण व त्या संबंधे सरकारी अफिसांस व दिवाणी कोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजी, विवाहाचे मुहूर्त, त्याचप्रमाणे इंग्रजी व मुसलमानी वार तारखा, महिने, सण इत्यादिकांचा समावेश केला जाई... तसेंच रेल्वे तारायंत्र स्टांप, मनिआर्डर्स, पोस्ट, मुंबई ठ्यांकेच्या रुढी वगैरे नेहमी अरूर लागणाऱ्या विषय संबंधानें अवश्य तितकी बरीच माहिती दिली जाईल. शिवाय सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलिस गाइड डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि अनेक नेहमी जरूर लागणारे कायद्यासंबंधी उपयुक्त अशी अवश्य तितकी माहिती दिली जाईल. कापीव तुळया, तक्ते वगैरे लांकडांचे घनफूट कसें मोजावे या विषयींची माहिती दिली जाईल. ही माहिती कंत्राटदार व लांकड खरेदि करणारे लोकांस विशेष फायद्याची होईल. आजमासें २० रुपये दरमहा पगाराचा रोजमेरा कसा चुकता करावा यात विषयींच्या माहितीचें कोष्टक दिलें जाईल पुस्तकाच्या अखेरीस कोरीं पृष्ठें व जमाखर्चाच्या सदराचेही कागद जोडले जातील. एकंदरींत हरएक प्रकारची होईल तितकी ज्यास्त सुधारणा करण्यांत येईल.

रोजनिशीची आगाऊ किंमत.

रोजनिशी प्रत १ ब्लॉटिंग पेपर सहित जाड पुठ्यानें बांधलेली किंमत ११ आणे. टपाल हाशील २ आणे पडेल.

रोजानिशी प्रत नंबर २ साधी जाड पुठ्यानें बांधलेली किंमत ७ आणे, टपाल हंशील दीड आणा पडेल.

रोजनिशी प्रत नंबर ३ साधी बिलायती कापडानें बांधलेली किंमत ६ आणे टपाल हंशील दीड आणा पडेल.

किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पाठविली असतां विशेष सोयीचें होईल. चार आण्यांच्या पुढें व दाहा रुपयांचे आंत मनीआरडर करण्यास दोन आणे पडतात.

वर लिहिल्याअन्वयें जी किंमत आक्टोबर अखेर आह्मांकडे येईल त्या नंबरची रोजनिशी तयार झाल्याबरोबर रवाना करण्यांत येईल घेणारानीं त्वरा करावी.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचे मालक.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मेशनरी बाळाजी फडके यांनीं. छापून प्रसि... ह्मण...
त्यांत असतील

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १८ अकोला, सोमवार तारीख ११ माहे आक्टोबर सन १८८० सर्व अंक ४०

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## NOTICE TO CONTRIBUTORS.

*We invite the co operation of all European and Native gentemen in maintaining the status of this journal and to this end solicit contributions in the shape of News letters stray notes &c. Contributors may rest fully assured that the confidence they place in us by sending communications will not be violated.*

## हुन्नरसंग्रह.

( मासिक पुस्तक. )

चालू आगष्ट महिन्यापासून आह्मी सदर पुस्तक काढण्याची सुरवात केली आहे. त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व कलाकौशल्यें यांसंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत जाईल.

त्यांत बागाईत व शेती, सुगंधी व आतारी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र, कुंभारकाम, कांचकाम, धातुकाम, दारूकाम इत्यादि कामांसंबंधी अनेक प्रकारचे उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थावरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति, उपद्रवकारक प्राण्यांचा नाश करण्याचे उपाय, लवकर नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे ठेवण्याच्या युक्ति; कोणत्याही पदार्थावर पाहिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फुटलेले पदार्थ सांधण्याकरितां लुकणें, सुगंधीं व औषधोपयोगी तेलें व अर्क अनेक प्रकारच्या साध्या व रंगीत शाई, आगकाड्या, साबू, मेणबत्त्या, लाख, सरबतें, वार्निशें, टूथपावडर्स, मिल्क-रोझिस, कोल्डक्रीम्स, प्यामेटम्स, फ्रेंचपालिश, टिंक्चर्स, एशन्स आसिड, कोल्डवाटर्स इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, आणि सांकेतिकभाषा, कूटगणितं, कूटकविता, कूटप्रश्न आणि अंकचमत्कार यांचा संग्रह होत जाईल.

याची किंमत आगाऊ एक वर्षाची २ रुपये व ट. ख. ६ आणे; किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पुस्तककर्त्याकडे पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री २० पृष्ठांचा निघतो. अगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं. ता. २० आगष्ट सन १८८० इसवी.

गोविंद मोरोबा कार्लेकर,
हुन्नरसंग्रहकर्ते.

पत्ता — नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

## इंद्रजालिक सर्प.

अवश्य वाचा.

अद्भुत चमत्कार.

(अवश्य पहा. अवश्य पहा.)

हा चमत्कारिक सर्प प्रत्येकानें अवश्य करून पहावा. रसायन क्रियेनें तयार केलेल्या कांड्या पासून हा सर्प उत्पन्न होतो. एक इंच लांब कांडीचा सुमारें ३ हात लांब सर्प होतो, आणि त्याचा रंग व आकृती वगैरे खऱ्या सर्पाप्रमाणें होते. एका डबीची किंमत २ रुपये व बंगी खर्च प्रत्येक डबीस ४ आणे मिळून २। रुपये मनीआर्डर करून खालीं सही करणाराकडे पाठविल्यास रवाना करण्यांत येईल प्रत्येक डबींत एक इंच लांबीच्या २० कांड्या आहेत सर्प करण्याच्या कृती विषयीं एकंदर माहितीचा कागद डबीबरोबर पाठविला जाईल.

गोविंद मोरोबा कार्लेकर
पत्ता —नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली घर नंबर २६ मुंबई

## गारुडी विद्या.

अथवा.

गौडबंगाली जादूचे मनोरंजक खेळ.

कित्येक धूर्त व ठक लोक कांहीं युक्तीच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस ठकवितांत याकरितां अशा लोकांच्या कृतीचें व कसबाचें ज्ञान सर्व लोकांस व्हावें या हेतूनें आह्मी वरील नांवाचें पुस्तक तयार केलें आहे त्यांत युरोपियन तमासगीर व एतद्देशीय जादूगारि, मांत्रिक, देवऋषि, पंचाक्षरी, इलमी, सय्यद, भानामती, गारुडी, भुत्ये, इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेले धूर्त, ठक व ढोंगी लोक, आह्मी जादू, भूत, प्रेत, पऱ्या, जीन, वेताळ, वीर, ह्यांच्या साह्यानें पाहिजे तें करूं शकतों असें सांगून गूढ युक्ति, हातचलाखी, लोहचुंबकशक्ति, विद्युत्प्रयोग, रसायनप्रयोग आणि वनस्पतीचे चमत्कारिक गुण इत्यादिकांच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस कसकसे ठकवितात याचे कृतींसह रीतीनें दिग्दर्शन केलें आहे. ह्याचीं ए- - . लागणारीं चित्रें व आकृतीही जागजागीं घातल्या आहेत. याची किंमत सप्टेंबर अखेर देणारांस फक्त १ रुपया व मागाहून १॥ रुपया पडेल. आगाऊ वर्गणी देणारांची नांवें पुस्तकांत छापली जातील. किंमतीबद्दल पैसा पाठविणें तो पुस्तककर्त्याकडें खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावा. पुस्तकें नोवेंबर महिन्यांत छापून तयार होतील. बाहेर गांवचे लोकांस ट. ख. बद्दल २ आणे जास्त पडतील.— ता. २० आगष्ट १८८० इ.

गोविंद मोरोबा कार्लेकर.

पत्ता — नळावर पंचमुखी मारुतीची, गल्ली घर नंबर २६ मुंबई.

---

वऱ्हाडसमाचार.

मिति भाद्रपद कृष्ण ३० शके १८०२

## जुडिशियल रिपोर्ट.

थोडे आठवड्यांपूर्वी आह्मी या रिपोर्टांतील माहिती प्रसिद्ध केली आहे. आतां थोडक्यांत त्यावरील रेसिडेंट साहेबांचें मत व स्वाभिप्राय कळवितों.

रेसिडेंट साहेबानीं या रिपोर्टावर आपले विचाराचीं ३० कलमें प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांतील पाहिले कलमांत जुडिशियल कमिशनर साहेबांनीं जिल्ह्यांतून रिपोर्ट चांगले व लवकर येत नाहींत ह्मणून लिहिलें आहे त्याजबद्दल रेसिडेंट साहेबासही फार वाईट वाटून त्यांनी दुःख प्रदर्शित केलें आहे. ते ह्मणतात कीं त्या रिपोर्टांचे कामीं उशीराचा दोष असून त्यांत विचारही करावे तसे विस्तृत केलेले नसतात. रिपोर्टांतील बाबींचे गुण, दोष, त्यांचीं कार्यकरणें, सुधारण्याचे उपाय वगैरेवर बरेंच लिहिलें पाहिजे. तसे ते न लिहितां केवळ सदरबारीचे आकडे भरून पाठवावे त्याप्रमाणें हलगरजीचे रिपोर्ट असतात हें फार वाईट आहे. इलिचपुरचे रिपोर्टाविषयीं तर त्यांनीं लिहिलें आहे कीं तो जसा वऱ्हाडाबाहेर मुंबईंत लिहावा तसा लिहिला आहे त्यांत आकड्यावाचून कांहीं नाहीं; असें असणें चांगलें नाहीं.

आह्मास या गोष्टीबद्दल चमत्कार वाटतो! वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं हुकूम द्यावे व जिल्ह्याचे अधिकाऱ्यांनीं त्याप्रमाणें वागू नये व ती कांगाळी प्रांताचे मुख्याधिकाऱ्यास कळविली असतांही त्यानीं नुसतें दुःख प्रदर्शित करावें. असें कां? डिपुटी कमिशनरांनीं तहशिलदारांस असें कांहीं हुकूम दिले व त्यांनीं त्यांची अंमलबारी केली नाहीं, तर तें नुसतें दुःख प्रदर्शित करून बसतील काय? किंवा मास्तरच्या हयगयीबद्दल डायरेक्टर साहेब निरुपाय ह्मणून खेद करून स्वस्थ बसतील असें आह्मांस वाटत नाहीं. आह्मांस इतकेंच वाटतें कीं डिपुटी कमिशनर मोठे कामदार आहेत आणि त्यांनां इतर बरींच कामें आहेत या सबबीवर हा कानाडोळा होत असेल.

रेसिडेंट साहेबाकडे या सालांत १७ फौजदारी अपिलें झालीं त्यांतून १३ नामंजूर होऊन ४ फाईल झालीं. त्यांतून एकांत शिक्षा कमी झाली, एकांत शिक्षा फिरविली, व दोहोंत कायम केली. दिवाणी स्पेशियल अपिलें २९ झालीं त्यांतून २१ नामंजूर झालीं व सहा फाईल झाली. त्यांत दोहोंमध्यें अवल ठराव कायम ठेविले. दोहोंमध्यें फिरविले, एक ( माडिफाय ) कमती केला, व एक परत चौकशीस पाठविला.

फौजदारी शाखेकडील जिल्ह्याचे रिपोर्टांतून कांहीं टिपणे रेसिडेंट साहेबांनीं घेतलीं आहेत त्यांत लिहिलें आहे कीं मि. मारुती कडताजी पाटील शिगावचे स्पेशियल माजिस्त्रेट यांनीं २२३ मुकदम्याचे निकाल केले त्यांतून फक्त एकावर अपील झालें. मारुतीरावाच्या या कामाच्या शैलीबद्दल आह्मास संतोष वाटतो. वाशीम जिल्ह्यांतील स्पेशियल माजिस्त्रेटांविषयीं डिपुटी कमिशनर साहेबाचें, मत चांगलें नाहीं. गावचे गावांत ते असल्यानें व त्यांचे आप्तसंबंधी तेथें असल्यानें व अधिकारी आपला खाजगी स्नेह किंवा शत्रुत्व मनांत ठेवून कामें करीत गेल्यानें चांगला परिणाम होत नाहीं. निर्मळ अंतःकरणाचे व प्रामाणिक असे आनररी माजिस्त्रेट या प्रांतांत मिळणें अवघड आहे असें ते ह्मणतात. आह्मास ही या फुकट काम करणाऱ्या जमीदार लोकांच्या या वर्तनाबद्दल हें उद्गार ऐकून फार वाईट वाटतें. तरी आमचें मत आहे कीं ही निवड करण्याची चूक आहे. चांगली कसोटी पाहिल्याशिवाय उगीच घर बसल्या लोकांचे हातांत असें महत्वाचे अधिकार व लोकांचीं सुखदुःखें देणें चांगलें नाहीं.

अकोला, बुलढाणा, इलिचपुर, आणि वणी एथील रिपोर्टांतील दिवाणी भागांतून विशेष सांगण्यासारखें रेसिडेंट साहेबांस कांहीं आढळलें नाहीं वाशिमचे रिपोर्टांत मि॰ फौलर साहेब एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर व मंगरूळचे तहशिलदार मि॰ लक्ष्मण बाळाराम यांच्या दिवाणी कामाविषयीं डिपुटी कमिशनर साहेबांचा लेख अनुकूळ दिसत नाहीं असें रेसिडेंट साहेब ह्मणतात व त्यांनीं मि॰ फौलर साहेबास तेथून बदलून उमरावतीस खजिन्यावर नेमिलें असल्याचें लिहिलें आहे. उमरावतीचे रिपोर्टांत धेड लोक हक्काबद्दल त्रासकारक फिर्यादी करीत असल्याबद्दल व असिस्टंट कमिशनर वगैरे यांस कामें फार असल्याबद्दल लिहिलें आहे व हाताखालच्या आफिसर लोकांनीं केलेलें जुडिशियल काम त्यांच्या मोठेंसें पसंतीस आलें असें दिसत नाहीं. तरी रेसिडेंट साहेबांस अस्याची लोकांच्या कामांत व त्यांतून रा. रा. भीमरावजी याच्या कामांत सुधारणा दिसून आली. रेसिडेंट साहेबांनीं जु. क. साहेबांस शिफारस केली आहे कीं, त्यांणीं जिल्ह्याचे रिपोर्ट कमिशनर साहेबाचे अवलोकनार्थ पाठवित जावे ह्मणजे व्यक्ती संबंधानें ज्या सूचना त्यांत असतील त्या ते पहात जातील.

अकोल्याचे स्मालकाज जडजांनीं अज्ञान कर्जदाराचा सावकार लोक कशा नाश करितात या विषयीं लिहिलें आहे, तसेंच उमरावतीचे स्मालकाज जडजांनीं सिव्हिल प्रोसिजर १२८ कलमाविषयीं लिहिलें आहे, त्या दोहोविषयीं तसेंच जुडिशियल खात्याच्या सुव्यवस्थेविषयीं व स्मालकाज कोर्टाविषयीं रिपोर्टांत ज्या गोष्टी आल्या आहेत त्याजबद्दल जुडिशियल कमिशनर साहेबांनीं रेसिडेंट साहेबाकडे स्वतंत्र पत्रव्यव्हार चालवावा असें रेसिडेंट साहेबांनीं लिहिलें आहे. व एकंदर रिपोर्टांत जुडिशियल कमिशनर साहेबाची तारीफ केली आहे.

या प्रमाणें दिवाणी फौजदारी काम या वर्षांत जें झालें व प्रत्येक अमलदारानें जें केलें त्याजविषयीं जरूरीची माहिती रिपोर्टांत लिहून एकंदरींत उभयतां अधिकाऱ्यांनीं समाधान प्रदर्शित केलें आहे. त्याचप्रमाणें आह्मीही ह्मणतो कीं दिवसेंदिवस या खात्याची सुधारणा होत चालली आहे व पूर्ण माहितगार कर्नल बेल साहेब आणि मोठे मुत्सद्दी सर रिचर्ड मीड साहेब यांच्या कारकीर्दींत आणखीही कियेक गोष्टी या खात्याच्या संबंधानें या देशास पाहिजेत अशा घडून येतील अशी आह्मास आशा आहे.

या खात्याचे संबंधानें आह्मास बाहेर प्रांताचा जो अनुभव आहे त्याजवरून व हल्लीं या प्रांतांत आह्मी जें पहातों त्याजवरून आमच्यामतें दोन गोष्टी मोठ्या महत्वाच्या आहेत त्या ह्या:—

या खात्यांत जे अमलदार नेमावयाचे त्यांनां दुसरें कोणतेंही काम किंवा दुसरा कोणताही त्रास नसावा, ह्मणजे ते स्वतंत्र असावेत.

२ प्रांतास मुख्य न्याय मिळण्याची जी जागा ती अटोक्यांत असावी व लोकांनां सुलभ रितीनें दाद मागतां येईल अशी असावी.

यांतील पहिल्या प्रकाराविषयीं विचार चालू आहे व आज पावेतो त्याचें अनुकूळ फळही प्राप्त झालें असतें; परंतु रिपोर्टांत रेसिडेंट साहेब जें लिहितात त्यावरून असें कळतें कीं, त्या कामांत मुख्य कमिशनर साहेबाचे मतासाठीं तें प्रकर्ण गेलेलें त्यांच्याकडेच अजून आहे. असें महत्वाचें प्रकर्ण असे महिनेच्या महिने अशा जलद कामी अधिकाऱ्याकडे कां थंडें पडून राहिलें तें आह्मांस ठाऊक नाहीं. वास्तविक पाहिलें असतां न्याय खात्याचें उत्पन्न निराळें, मुख्य जुडिशियल कमिशनर निराळे, आणि हा विषय कमिशनर साहेबाच्या साहजीक आणि अलोटांतील विषयांहून निराळा, तेव्हां त्यांत कमिशनर साहेबाचे विचाराची गरज नसावी. तथापि आमचे कमिशनर मे. जोन्स साहेब यांनां सर्व गोष्टी चांगल्या अवगत आहेत. व रेसिडेंट साहेबाचा त्यांच्या ठिकाणीं पूर्ण भरवसा आहे ह्मणून त्यांनीं त्यांनां विचारिल्याबद्दल आमचें कांहीं ह्मणणें नाहीं; आमचें ह्मणणें इतकेंच आहे कीं ज्यांनां जें काम करावें लागतें त्यांनां त्यांतील सोयी गैरसोयींचा अनुभव जास्ती असतो तेव्हां त्यांचें ह्मणणें अधिक विचारणीय असलें पाहिजे. असो. जों पावेतों कमिशनर साहेबांनीं कोणतें एक प्रकारचें मत दिल्याचें आमचे कानावर येत नाहीं तों पावेतों या बाबदींत आह्मांस कांहीं लिहितां येत नाहीं. तरी वऱ्हाडांत न्याय खातें सर्वथैव पृथक होऊं देणें हें कमिशनर साहेबासही इष्टच वाटेल असें आमचें मत आहे, तेव्हां ते जुडिशियल कमिशनर साहेबांचे मतास बहुशा प्रतिकूल होणार नाहींत.

दुसरे बाबदीचा विचार केला तर तसा प्रश्न ह्मणण्यासारखा आज पावेतो कोणी काढिला नाहीं. आह्मी जरी कित्येक वेळां पर्यायानें तसे उद्गार काढिले आहेत तरी त्याविषयीं वाटाघाट व्हावी तशी झाली नाहीं. ह्मणून या वेळेस आह्मी हा विषय हातीं घेऊन त्या विषयींचें आपलें मत आज थोडक्यांत कळविण्यास आरंभ करितो. वऱ्हाडांत रिविन्यु व जुडि० वगैरे कामांत मुख्य न्यायाधिकारी रेसिडेंट साहेब आहेत. रेसिडेंट साहेब हैदराबादेस राहतात व त्यांची वास्तविक कामगारी ह्मटली ह्मणजे निजामसरकार व ब्रिटिश सरकार यांच्या मध्यस्थ पणाची आहे तेव्हां ती साधून वऱ्हाडांतील सदरील कामांत चित्त पुरविण्यास त्यांस वेळ थोडा मिळत असेल असें आमचें अनुमान आहे. आतां ते आपिलें मुख्य काम साधून वऱ्हाडांतून जात असलेले कामांतही लक्ष्य पुरवितात व कधीं कधीं त्यांचे न्यायाचे उत्तम विचार प्रसिद्धीसही येतात त्यावरून आह्मास आनंद वाटतो व आह्मी त्यांची तारीफ करितों; परंतु इंग्लिश सरकारच्या हिंदुस्थानांतील कोणतेही भागांत अशी राज्यव्यवस्था नाहीं. जें इलाख्याचें सरकार तेंच मुख्य न्यायाधिकारी व जे मुख्य न्यायाधिकारी तेच सरकारचें हित अनहित पहाणार व त्या धोरणानें प्रजेचें हित अनहित पहाणार प्रत्यक्ष अधिकारी असा प्रकार आमचे पहाण्यांत कोठें नाहीं. अशी कल्पना करा कीं, सरकारी कामगारानें केलेल्या एकाद्या कामाच्या संबंधानें त्यावर किंवा सरकारावर कोणास फिर्याद करावयाची ह्मणजे सरकार या नात्यानें रेसिडेंट साहेब त्या दाव्यांत पक्षकार होणार व ते सरकारचा पक्ष चालविणार आणि पुढें न्यायाचे कोर्टांत काम चालू झालें ह्मणजे अखेर न्यायाधिकारीही तेच बनणार. आणि असें होणें हें इंग्लिश राज्यांतील व्यवस्थेस अगदीं विपरीत आहे.

याशिवाय रेसिडेंट साहेब हैदराबादेस राहातात व जुडिशिअल कमिशनर यांनां फक्त जिल्हा जडजाचे व सेशन जडजाचे मात्र अधिकार असल्यानें बहुतेक महत्वाच्या दिवाणी फौजदारी खटल्यांत स्वाभाविक दुसरें अपील त्या कोर्टास व्हावयाचें तें करावयास लोकांनां द्रव्याच्या, श्रमाच्या व इतर अनेक अडचणी उत्पन्न होतात व त्यामुळेंच त्या कोर्टांत वर्षास दिवाणी फौजदारी अपिलें फार थोडीं होतात. अपिलें कमी होण्याचे प्रमाणावरून खालील कोर्टांत सर्व काल न्याय चांगला मिळतो व लोक त्या योगानें तृप्त असतात असें च केवळ समजावयाचें नाहीं. लोकांस फाजील द्रव्य खरचण्याची व श्रम सायास करण्याची सवड नसते यामुळेंही असा परिणाम होऊं शकतो ही स्थिति एकंदरींत चांगली नाहीं. वरिष्ठ कोर्टानें वेळोवेळीं मुकदम्याचे संबंधानें पाहिल्या वाचून खालील कोर्टांतील न्याय बरोबर होण्याची सर्वकाल आशा नसते.

जुडिशियल कामिशनर साहेबाचें कोर्ट हल्लीं या प्रांतांत आहे हेंच एथून काढून दुसरे ठिकाणीं ठेविलें तर हल्लीं होतात इतकीं अपिलें त्यांच्यांही कोर्टांत होणार नाहींत असा संभव आहे. सारांश मुख्य अधिकाराचें कोर्ट स्वतंत्र असून तें लोकांच्या अटोक्यांत पाहिजे आतां या संबंधानें आजेंच आज लिहून पुरें होणें नाहीं यास्तव स्वतंत्र रीतीनें आणखी कधीं लिहूं.

जुडिशियल कमिशनर साहेबानीं रिपोर्टांत ह्मटलें आहे कीं "फौजदारी गुन्ह्यांत शिक्षा होतात त्या बहुतेक भारी नसल्यामुळें अपराधी लोक अपिलें फारशी करीत नाहींत" परंतु इंडियन पिनल कोड साऱ्या हिंदुस्थानाला लागू आहे व बाहेर प्रांतींही शिक्षेंचे प्रमाण वऱ्हाडाहून भारी नाहीं तरी अपिलें अधिक होतात असें आह्मी नेहमी वाचतो व पाहतो तेव्हां फार अपिलें न होण्यावरून जुडिशियल कमिशनर साहेबानीं काढलेलें अनुमान ज्या प्रमाणें खरें होण्याचा संभव आहे त्याचप्रमाणें सदरीं आह्मी सांगितलेलें कोर्टाचें दूरत्व, व त्यामुळें लागणारा अधिक खर्च व अधिक श्रम यांच्या भीतीनेंही अपीलें कमी होण्याचा संभव आहे. एवढ्या मोठ्या प्रांतांतून ह्मणजे वऱ्हाडच्या सहाही जिल्ह्यांतून रेसिडेंट साहेबांकडे साऱ्या वर्षांत १७ अपिलें झालीं ह्मटलें ह्मणजे पुष्कळ लोकांस सोयी नसल्यामुळेंच उगे बसावें लागत असेल असें आमचें अनुमान आहे. कारण अपिलाचा इतका थोडा नंबर बाहेर प्रांतांतून कोठेंच आढळत नाहीं.

या बाबदींत रेसिडेंट साहेब सुचवितात कीं जिल्ह्याचे अधिकाऱ्यांनीं व दुसरे वरिष्ठ अमलदारांनीं ताब्यांतील कोर्टांचे मुकदमे आणवून बारकाईनें तपासणी करीत जावी हा विचार आह्मांसही मानवतो चुकीची दुरुस्ती करण्याचा हाही एक मार्ग आहे. परंतु लोकांस आपलें निर्दोषत्व दाखविण्यास यांत अपिला इतकी संधी मिळत नाहीं.

दिवाणी कामाचे गेल्या सालांत जे निकाल झाले त्या संबधानें विशेष सुचविण्याजोगें कांहीं दिसत नाहीं. स्माल काज कोर्टाच्या संबंधानें मागील सालीं जें आह्मीं आपलें मत दिलें होतें तेंच हल्लींही आहे. ह्मणजे या प्रांतास स्माल काज कोर्टांची गरज नाहीं. दोन स्माल काज कोर्टांकडून जितकें दिवाणी काम होतें त्याहून अधिक एका एकस्ट्रा असिस्टंट कमिशनराकडून होतें. याला उदाहरण अडगाव कोर्टांचे मागें सांगितलेंच आहे. खामगावचें स्माल काज कोर्ट तर सरकार पदरून तूट भरून चालवीत आहे. अधिकाऱ्याच्या थोडे दिवस गैरहजरीचें कारण रिपोर्टांत लिहिलें आहे तरी बाराही महिन्याच्या कामाचे सालोसालचे अनुभव आह्मांस ठाऊक आहेत त्यावरून व्हावें तितकें काम त्या कोर्टांतून कधीं होईल असें आह्मांस वाटत नाहीं. व खरोखर एकंदर वऱ्हाडास स्माल काज कोर्टांची जरूरी नाहीं. स्माल काज कोर्टांचा खर्च आहे त्यांत अनेक मनसफ कोर्टें होऊन लोकांस सोयी अधिक होतील, काम फार होईल आणि सरकारास उत्पन्न अधिक होईल.

वकील लोकांविषयींचा लीगल प्राक्टिशनर्स आक्ट नावाचा कायदा झालेला आहे तो वऱ्हाडास लागू करण्याच संबधानें आह्मी आपले विचार लवकरच कळवू असे जुडिशियल कमिशनर साहेबांनीं रिपोर्टांत लिहिलें आहे. व अलिकडेस तसें घाटत असल्याचेंही दिसंत. ते त्यांचे विचार काय आहेत ते अजून बाहेर पडले नाहींत तथापि वकील लोकांविरुध्द ते नसावेत अशी आह्मी कल्पना करितों हा कायदा आह्मी वाचून पाहिला यांत कित्येक ठराव अगदीं नवीन आहेत; तरी त्या संबंधानें आज आह्मास कांहीं बोलतां येत नाहीं. जेव्हां कायदा लागू होतो असें कळालें तेव्हां अर्थांत त्या संबंधानें लोकाचे विचार काय आहत ते कळविण्याची आह्मास संधी मिळेलच.

## गवरनर जनरल सा० चा प्रवास.

नामदार लार्ड रिपन साहेब हिंदुस्थानचे गवरनर जनरल आणि व्हाइसराय हे पंजाबाकडे जाऊन तिकडून मुंबईस येऊन कलकत्यास जाणार अशी बातमी होती त्या विषयीं रेसिडेन्सी आर्डरमध्यें हिंदुस्थान सरकारचे मिलिटरी सेक्रेटरीच्या सहीची जाहिरात प्रसिद्ध झाली आहे तिजवरून माहिती समजते ती अशी:—

नामदार साहेब अक्टोबरच्या २८वे तारखेस सिमल्याहून निघतील, ते निरा, सुरण, बानिटी, नाहन, माजरा, देहरा, मसुरी, शारणपुर, आणि अमृतसर या गावीं वाटेंत एकेक मुक्काम करून नोवेंबरचे १० वे तारखेस लाहोरास जातील. तेथें ११ वे तारखेस धुळभेट होईल व १५ वे तारखेस दरबार होईल आणि १६ वे तारखेस तेथून निघतील ते मुलतान, जेकोबाबाद सिबी एथें जाऊन २२ वे तारखेस करांचीस जातील व २१वे तारखेस जलमार्गानें तेथून निघून २७ वे तारखेस सकाळीं मुंबईस पोचतील व तेथें ७ मुक्काम होऊन डिसेंबरचे ४ थे तारखेस तिसरे प्रहरीं आगगाडीनें कलकत्यास जावयास निघतील आणि तारीख ६ सोमवार रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां कलकत्यास जाऊन दाखल होतील.

---

कंदाहार येथें तूर्त स्वस्थता आहे व ती अशीच राहील तर मार्च महिन्यांत तथील ठाणें उठन क्वेटा येथें आणावें असा विचार आहे पण तिकडील लोकांच्या खटपटीचा कांहीं नेम नाहीं व रशियाचा मध्यएशियावर डोळा आहे. त्यामुळें त्या भागावर चांगली पैरवी पाहिजे. अयूबखान हिरातेस जाऊन आपले अधिकारारूढ झाला, अशीही बातमी आली आहे व कदाचित ती खरी असेल तर काबुलाहून अबदूल रहिमान अमीर त्या विरुद्ध तजवीज करील व त्या दोघांचें युद्ध सुरू होईल असा अजमास आहे. हल्लीं कंदाहाराकडून आफिसर लोक परत येत आहेत व जनरल राबर्टस विलायतेस किताब घेण्याकरितां जाण्यास निघाले आहेत.

---

तुर्कस्थानची काय स्थिति होणार आहे तें कळत नाहीं. युरोपांतील ग्रेट पावर्स ह्मणजे प्रमुख राष्ट्रें यानीं तहाप्रमाणें वागणु-

क करावी अशी त्यास टुमणी लाविली आहे व तुर्कस्थान त्या गोष्टीविषयीं टाळाटाळ करित आहे. तेव्हां युद्धसंग्राम पुन्हां माजणार कीं काय समजत नाहीं. या आठवड्यांत लंडनच्या डेलिन्यूज पत्रांत एक आर्टिकल तुर्कस्थानच्या सुलतानास पदच्युत करावें अशा अर्थाचें आलें असल्याबद्दल तार आली आहे. तेव्हां कसें काय होतें पाहावें. चिन्ह नीट दिसत नाहीं.

## वऱ्हाड

… मेन साहेब सिकंदराबादचे क्यांटून माजिस्ट्रेट यांस क्रिमिनल प्रोसिजरचे ३६ वे कलमांतील अधिकार सन १८७९ सालापासून दिलेले आहेत असें पहिल्या तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

मि. ए टी. ड्रिस्डेल साहेब वऱ्हाडच्या जंगल खात्याचे डिपुटी कानसरवेटर यांस एप्रिल महिन्याचे पहिले तारखेपासून ४थे प्रतीचे कानसरवेटर केलें. रे. आ.

चक्रवर्तिनी साहेबांची कन्या प्रिन्सेस अलाइस मरण पावली तिच्या स्मारक कृत्याकरितां हिंदुस्थानांतून ३६००० रुपये वर्गणी गेली तिजबद्दल चक्रवर्तिनी साहेबानीं हिंदुस्थानच्या लोकांच्या औदार्याबद्दल आभार मानून संतोष प्रदर्शित केला आहे रे. आ.

सिकंदराबाद येथें राहणारे राजापेठचे जमिनदार रावबाहादूर राजा रामेश्वरराव यास हैदराबाद रेसिडेन्सी खालील दिवाणी कोर्टांत स्वतां हजर न राहण्याचा सन्मान दिला आहे.

पास झालेले मेडिकल प्युपिल महंमद शरीफ व कादर मोहिदीन यांस उमरावतीस व सयद सारवार व चिन्नया यांस अकोल्यास सिविल सर्जनकडे दिलें

अपाथिकरी डी काटागन यांस इलिचपुर छावणी व शहरचे डाक्टर नेमिलें.

मेजर विलियम जान बेल यांस लेफटिनेंट कर्नल केलें.

वाशिम जिल्ह्यांत मुळवे एथें बाजाराकरितां व उमरखेडचे रस्त्याकरितां तसेंच वणी जिल्ह्यांत खैरी आणि नेर एथें पोलिस स्टेशनाकरितां सरकारास जागा लागत होत्या त्या घेतल्याबद्दल रेसिडेन्सी आर्डरमध्यें जाहिरनामे प्रसिद्ध झाले आहेत.

फारेस्ट खात्याकडील आफिसर लोकांनी मराठी व हिंदुस्थानी भाषेच्या परिक्षा देत जाव्या या विषयीं ता. १ अक्टोबरचे रेसिडेन्सी आर्डरमध्यें नियम प्रसिद्ध झाले आहेत. सप्तंबरच्या आरंभी ही परिक्षा होत जाईल.

उमरावती रेलवेवरून आगष्ट महिन्यांत १८९ टन माल गेला व त्याचे १२०५ रुपये उत्पन्न झाले

उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटीनें कायदा … पेटनियमांत लेलीं लिहिलेलें कलम बाटालें. व त्यांस रेसिडंट साहिबांनीं मंजुरी दिली.

( ब ) सन १८८० चे आक्टोबर महिन्याचे पहिले तारखेपासून व त्यापुढें उमरावतीचे म्युनिसिप्यालिटीच्या हद्दींत कोठेंही छपराची दागदुजी करण्यास कोणास परवानगी नाहीं.

मि० डब्ल्यु. बी. जोन्स सी. बी. वऱ्हाडचे कमिशनर यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

या सालचे अखेरीस उमरावतीस प्रदर्शन होणार होतें परंतु प्रदर्शनकमिटीनें व कमिशनर साहेबांनीं या सालची पिका पाण्याची स्थिति अशा कामाला अनुकूळ नाहीं असें कळविल्यावरून तो बेत रेसिडेंट साहेबांनीं कांहीं कालमर्याद रहित केला.

मि. एच. एफ काटग्रेव पोलिस सुप्रिटेंडेंट यांस तारीख १ नोवेंबर पासून किंवा ते घेतील तेव्हां पासून हिंदुस्थानाबाहेर जण्यासाठी एक वर्षाची फर्लो रजा दिली आहे.

असिस्टंट, एकस्ट्रा असिस्टंट, आणि तहशिलदार यांची वार्षिक परीक्षा अकोल्यास जुडिशियल कमिशनर साहेबांचें कचेरींत तारीख २५ माहे आक्टोबर सन १८८० इसवी रोजीं ११ वाजतां सुरू होईल.

२ परिक्षक नेमिलें आहेत तेः— कमिशनर, जुडिशियल कमिशनर, पोलिस इन्स्पेक्टर जनरल, व बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर.

३ परीक्षेकरितां उमेदवार असतील त्यांचीं नांवें डिपुटी कमिशनरानीं तारीख १५ अक्टोबरचे आंत कळवावी. व ते लोअर किंवा हायर कोणती परीक्षा देणार तेंही लिहावें.

४ उमेदवारानें अलीकडील सहा महिन्यांत फैसल केले असतील त्यांपैकीं कोणते ही १२ दिवाणी व १२ फौजदारी मुकद्दमे परीक्षकांस पहाण्याकरितां एक आठवडापूर्वी डिपुटी कमिशनरांनीं जुडिशियल कमिशनर साहेबाकडे पाठवावे त्याचप्रमाणें १२ मुलकी प्रकरणें कमिशनर साहेबाकडे पाठवावी.

५ या परिक्षेविषयींचे नियम ठरलेलें आहेत. त्यांतील ६ वे कलमाप्रमाणें उमेदवारांचा उद्योगीपणा, नियमितपणा, चापल्य, उत्सुकता, आणि स्वभाव यांविषयींची माहिती डिपुटी कमिशनरानीं कमिटीस पाठवावी लागति त्या गोष्टीकडे लक्ष्य द्यावें.

एप्रिल, मे, जून या तीन महिन्यांत धारण १६ शेराहून कमी होती सबब महागाई भत्ता रीतीप्रमाणें आठ रुपयांचे व आठ रुपयाखालचे नोकरास मिळण्याविषयीं ठराव झाला आहे.

बुलढाण्याच्या डिपुटी कमिशनरची जागा तीन महिने रिकामी झाली आहे तिजवर तिकडे असलेले असिस्टंट कमिशनर मि. थामसन साहेब यांस न नेमतां खामगावचे मि. डनलप साहेब यांस नेमिलें मागील दोन प्रसंगीं थामसन साहेबांस नेमिलें. असून हल्लींच यांस न नेमितां त्यांच्याहून जुनियर डनलप साहेबांस नेमिलें याचें कारण समजत नाहीं. आपचे समजण्यांत आलें आहे कीं थामसन साहेबानीं विलायतेस जाण्याकरितां दोन वर्षांची रजा मागितली व मलकापुराहून ते बुलढाण्यास गेले.

मि० डनलप साहेब बुलढाण्यास गेल्यानें खामगावचे कोर्टाचें काम अजी बंद राहूं नये ह्मणून मि० दस्तुर बहिमनजी जामासजी साहेब सी. आय. ई. यांस एक आठवडा अकोल्यास व एक आठवडा खामगावास काम करित जाण्याविषयीं हुकूम झाला आहे. व पुढचें आठवड्यांत ते खामगावास जाणार आहेत

या आठवड्यांत एका मुकद्दम्यांत एथें शुक्रवारीं सेशन भरणार आहे

हस्त नक्षत्र संपून चित्रा लागल्या. दोन दिवसांमागें पाऊस पडेल असें चिन्ह दिसत होतें परंतु पडला नाहीं, एक दोन पावसांची इकडे जरूर आहे. काय होतें पहावें. थोड थोडी थंडी पडूं लागली आहे.

बारशीटाकळी येथें गेले आठवड्यांत मुसलमान लोकांत मोठी मारामारी झाली. मेजर गनथार्प साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट यांनीं ६२ असामी पकडले. व मि. त्रिंबकराव यशवंत एकट्रा आशिस्टंट कमिशनर यांनीं त्यांतून २३ जणांस दंडाच्या शिक्षा दिल्या. एकंदर दंड ३६५ रुपये झाला. आरोपींपासून पुढें तंटे न होण्याबद्दल जात मुचलके घेतले आहेत. सुमार १० वर्षांमागें या लोकांत असाच तंटा होऊन सरकारांत दंडाची रकम सुमार साडेसहाशें रुपये जमा झाली आहे असें कळतें.

दर्यापुरचे तहाशिलदार रा. रा. गोविंदराव यशवंतराव ६ दिवसांची रजा घेऊन येथें आले. व रा. रा. त्रिंबकरावजी यांनींही येथें ६ दिवसांची रजा घेतली आणि उभयतां वाशीम जिल्ह्यांत राजुऱ्यास दसऱ्याकरितां घरीं गेले.

मि. शहा महमदखान इलिचपूर जिल्ह्यांतील पोलीस इन्स्पेक्टर, पेशावराकडे रजेवर गेले होते ते तिकडे मरण पावले असें कळतें,

मे. फ्यारर साहेब असिस्टंट कमिशनर विलायतेस रजेवर आहेत ते या महिना अखेर परत येणार आहेत.

रा. रा. वामन गणेश परांजपे बुलढाण्याचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर मलकापूर तालुक्यांतून काल सुटीचे दिवशीं मित्रमंडळीस भेटण्याकरितां येथें आले होते व रात्रीं परत गेले.

पुणें. सातारा वगैरे ठिकाणीं शास्त्री मंडळीत वाटाघाट होऊन दसरा बुधवारचा ठरला आहे

पोस्टाकडे पुन्हां चोरीची गडबड सुरू झाली असें दिसतें. गुदस्तां आमची पैशाची किस्येक पत्रें चोरीस गेल्याचें आह्मी लिहिलें होतें त्यापुढें आजपर्यंत तसें झाल्याचें आमचे समजण्यांत आलें नाहीं. परंतु या आठवड्यांत आह्मांस समजलें आहे कीं, मलकापुराहून एका पत्रांत साडे पंध्रा आण्याचीं टिकिटें घालून एका गृहस्थानीं पाठविलेलें पत्र आह्मांस मिळालें नाहीं. व वाशिमाहून कांहीं नोटिसांचें एक पाकिट आमचे नावानें रवाना झालें असून आह्मांस मिळालें नाहीं. या गोष्टीची त्या त्या पोष्ट आफिसांत व इन्स्पेक्टर साहेबांकडून चौकशी झाली तर बरें होईल.

मि० मेकाई साहेब एथील डिपुटी कमिशनर साहेबाचे हेड क्लार्क आज रोजीं रजेवर जाणार आहेत. त्यांचे बदली कमिशनर आफिसांतून मि. मदिरा साहेब यांस नेमिलें आहे. मि. थामसन साहेब एथील सेकंड क्लार्क यांनांच एथल्या एथें ही बदलीची जागा दिली असती तर चांगलें झालें असतें. तें हुशार आहेत व आज ८।९ वर्षें सेकंड क्लार्कचें काम करीत आहेत किस्येक वेळां बढतीचे प्रसंग आले असतां त्याविषयीं दुर्लक्ष्यच झालें असें दिसतें. मदिरा सा० यांचे १६० रुपयांचे जागेवर जरी थामसन साहेबास पाठविलें असतें तरी बरें झालें असतें. पण तसें न करितां कमिशनर आफिसांतील ८० रुपयांचे क्लार्क यांस त्या जागेवर नेमिलें व १०० रुपयें पगाराचे या गृहस्थास कांहीं हक्क मिळूं दिला नाहीं हें आमच्या मतें चांगलें झालें नाहीं पुढें तरी प्रसंग येतांच त्यांस बढती मिळो असें आह्मी इच्छितों.

## वर्तमानसार.

अविवाहित विद्वान स्त्री पंडीत रमाबाई कलकत्याकडे आहे ती सिलहत येथील वकील बाबु बिपन बिहारीलाल एम ए यांच्या बरोबर १३ वे तारखेस लग्न लावणार आहे असें समजतें

मुनसफ व वकील होऊं इच्छिणाऱ्या उमेदवार लोकांची मुंबईस मार्चाच्या ७ व्या तारखेस परिक्षा होणार.

नरसी केशवजी मुंबईचे तुरुंगांत आजारी आहेत ह्मणून त्यांस आगबोटीवरून रत्नागिरीचे तुरुंगांत पाठविलें.

छोटा उदपुर एथील राजपुत्रानें आपले बायकोस ठार मारल्याच्या खटल्याची चौकशी पंच महालांत गोध्रा एथें मि. बर्डउड साहेब ठाण्याचे जडजयांस कमिशन नेमून सरकारानें सुरू केली आहे. व श्री. मल्हारराव गायकवाड यांच्या चौकशीप्रमाणें तेथें चौकशी चालू झाली आहे. सरकारतर्फे १०।१२ साक्षीदार झाले. त्यांतील आशये आह्मी लिहून तयार केला होता परंतु या आठवड्यांत तो दाखल करण्यास आह्मांस जागेची सवड मिळाली नाहीं. सबब पुढील आठवड्यांत या विषयीं सविस्तर लिहू.

पोलिसास काळें पाणी—खानदेश जिल्ह्यांतील एका खेड्यांतलि रामोशी जयशिंग भिल आणि त्याची बायको कुमी यांस चोरीच्या संशयावरून पोलिसानें पकडून कुमीकडून गुन्हा कबूल करविण्यासाठीं तिला तिच्या लहान बाळकासह गुरांच्या कोंडवाड्यांत कोंडून ठेविलें नंतर तिला नदीवर घेऊन जाऊन तिचे हाल केले आणि पुन्हा परत आणून पुनः कोंडवाड्यांत ठेविलें दुसरे दिवशीं ती बाई बेशुद्ध स्थितींत पडलेली आढळून तिला धुळ्याच्या सिव्हिल इस्पितळांत पाठविलें तेथें ती बाई मरण पावली, ह्मणून पुढें सदहू दोघा शिपायांवर फौजदारी होऊन त्यांस सेशन जज्जानें जन्म ठेप दिली. तिजवर त्यांनीं हायकोर्टांत अपील केलें होतें. त्याचा निकाल होऊन गेल्या आठवड्यांत ती शिक्षा हायकोर्टानें कायम केली.

इराणानें आयुबखानास मदत केली सबब त्यानें हिरात प्रांत इराणाकडे गहाण टाकला आहे असें समजतें. शिवाय आयुबखान इराणाजवळ पुनः मदत मागणार आहे असेंही समजतें.

लिहिण्यास दुःख वाटतें कीं, रामपूरचे नबाब मृत्यू पावले. हे पुष्कळ दिवस आजारी होते.

आपण विरुद्ध चालविलेली आरमाराची तयारी बंद होईतोंपर्यंत आपण डलसिग्नोप्रांत सोडून देत नाहीं असें तुर्कस्थानच्या बादशहानें अखेरचें ह्मणणें कळविलें. डलसिग्नोप्रांत सोडून न दिल्यास प्रमुख राष्ट्राच्या वकिलांच्या अटकेंत ठेविलें जाईल अशी अल्बेनियन लोकांनीं धमकी दिली आहे. इंग्लिशांचा वकील स्कुटारीहून निघून गेला.

सन १८८१ च्या जुलै महिन्याच्या पहिल्या तारखेपासून मुंबई इलाख्याच्या जिल्ह्यांतील मराठी शाळा कलेक्टर वगैरे सिव्हिलियन अमलदारांच्या ताब्यांत दिल्या जातील असा सरकारी ठराव प्रसिद्ध झाला आहे.

निराहार व्रत—जयपुरच्या राज्यांत एके बाईनें कार्तिक महिना निराहार राहण्याचें व्रत घेऊन त्याप्रमाणें शेवटास नेलें. ती रोज पतीचे पाय धुवून त्याचें तीर्थ मात्र घेत असे. अन्न ३१ दिवस अगदींच वर्ज केल्यामुळें ती इतकी शक्तिहीन झाली कीं, शेवटीं तिच्या पतीस तिला तोंड धुण्यास वगैरे उचलून न्यावें लागत असे. व्रत खलास होतांच तिला एकदम तिचा पूर्वीचा आहार न देतां मुगाचे थोडे दाणे पाण्यांत शिजवून देत असत आणि हळूहळू तिचा आहार पूर्वीच्या प्रमाणावर आणून ठेविला.

या सालीं निळीचें उत्पन्न एकंदर सुमारें १२५०० मण होईल असा अजमास केला आहे.

महार मांग वगैरे अति नीच लोकांस इतर जातीच्या लोकांच्या मुलांबरोबर शाळेंत बसवावें असें जान. बुल्हर यांनीं फर्माविलें तें काठेवाड प्रांतास लागू नाहीं असें कर्नल बार्टन यांनीं स्पष्ट प्रसिद्ध केलें आहे, कारण त्या प्रांतांतील शाळांकडे इंग्रज सरकारच्या तिजोरींतून एक कवडी देखील खर्च होत नसून त्यांस आश्रय सरकारचा आहे.

भरतपुरच्या महाराजांविषयीं दोन वर्तमानें अधिक उणी दुःखदायक प्रसिद्ध झालीं आहेत. कोणी असें ह्मणतात कीं, त्यांस एका स्वारानें ठार मारिलें, कोणी ह्मणतात जखमी केलें. याची हकीकत अशी आहे कीं, महाराजांनीं आपल्या स्वारांस एका खंदकावरून घोडे उडवावयास सांगितलें त्या प्रमाणें करीत असतां तीन आसामी खंदकांत पडून त्यांस इजा झाली तें पाहून एकानें आपला घोडा नवा व तरूण आहे. अशा सबबेनें उडविण्याचें नाकारिलें. तें पाहून महाराजांनीं त्यांस धिक्कारून मारिलें. त्यानें उलट संतापून महाराजास जागच्या जागीं कापून टाकिलें. ही गोष्ट खरी नाहीं असें हेरल्डकर्ते लिहितात.

डा. टानर हे ४० दिवसांच्या उपवासानें प्रसिद्धीस येऊन त्यांस जन्मपर्यंत यथेच्छ खाण्यास मिळण्याचा सुयोग आला आहे असें दिसतें. कारण अमेरिकेंतील दोघी फार श्रीमंत स्त्रियांनीं त्यांजशीं विवाह करण्याचा हेतु प्रदर्शित केला आहे असें ह्मणतात.

सुरतेत मि. होप यांनीं कांहीं कडूलिंबाचीं झाडें लावविलीं होतीं त्यांतून एकापासून ताडी उत्पन्न होते ती थोडी कडवट लागते. तो रस परीक्षेसाठीं अमलदारांकडे पाठविला आहे आणि तें झाड पाहण्यासाठीं लोकांची गर्दी होत असते असें एक बातमीदार एका गुजराथी पत्रास लिहितो. ने. ओ.

मद्रासचे प्रस्तुतचे गवर्नर ड्यूक आफ बकिंघम हे जाण्याचे पूर्वीं त्यांस तेथील सर्व मुसलमान लोक मानपत्र देण्याच्या विचारांत आहेत.

पाटणा येथील कोको सय्यद लतीफखान नांवाच्या मुसलमान गृहस्थांनीं आपल्या त्या ठिकाणच्या स्वज्ञातिबांधवांस कलाकौशल्यें शिकविण्याप्रीत्यर्थ एक लक्ष रुपये देण्याचें कबूल केलें आहे.

बाबु केशव चंद्रसेन यांच्या कन्येचें कुचबिहारच्या राजाशीं येत्या विमाव्या तारखेस लग्न व्हावयाचें ठरलें असें इं. डे. न्यूज पत्रकर्ते ह्मणतात.

मुंबईच्या एलफिन्स्टन कालेजचे प्रिन्सिपाल मि. वर्डस्वर्थ हे लौकरच मुंबईस परत येणार असून त्यांस चालू सालच्या युनिव्हर्सिटीचे परीक्षकही नेमण्यांत आल्याचें कळतें. इं. प्र.

कलकत्याच्या पोलिस कामिशनरच्या मनांतून ग्रामदेवतेपुढें वगैरे जीं बकरीं मारितात, तीं बंद करविण्याचें फार भरलें आहे असें ह्मणतात.

मि. आडम्स यांची मद्रासचे गव्हर्नरचे जागीं कायमची नेमणूक झाली असून ते चालू महिन्याच्या अखेरीस किंवा पुढील महिन्याच्या आरंभीं विलायतेहून या देशास यावयास निघतील.

छोटा नागपुर एथील द्वितीय राजपुत्र चंद्रसिग याजवर आपल्या पत्नीचा खून केल्याबद्दलचा आरोप आला आहे व त्याबद्दल चौकशी करण्याकरितां इंग्रज सरकाराकडून मि० बर्डवुड ठाण्याचे जज्ज यांची नेमणूक झाली आहे. गेल्या शुक्रवारापासून गोध्रा एथें चौकशीस आरंभ झाला आहे. राजपुत्राच्या तर्फेनें मि० ब्रान्सन साहेब बारिस्टर हे गेले आहेत असें ह्मणतात कीं, आपल्या बायकोच्या व्यभिचारी वर्तणुकेविषयीं या राजपुत्राची खातरी झाल्यामुळें त्यानें तिचे हाल हाल करून तिला ठार मारविली व नंतर तिला सर्पदंश होऊन ती मेली अशी बातमी बाहेर पाडून तिचें दहन केलें. परंतु ज्या एका बलोचिस्थानी मनुष्याजवळ तिणें व्यभिचार केला त्याणें तिच्या मरणासंबंधी खरी हकीकत तिच्या भावास कळविली व तपास होऊन पुष्कळ साक्षीपुरावा मिळाले राजाचें ह्मणणें आहे कीं, आपल्या पुत्रावरील आरोप सर्व खोटा आहे व त्याच्या शत्रूंनीं सर्व बनावट केला आहे. इंग्रज सरकारास या खटल्याबद्दल तपास करण्याचा अधिकार नाहीं आपणासच अधिकार आहे असेंही ते ह्मणतात. वर्डवुड साहेबांची चवकशी समाप्त झाल्यावर गुन्ह्याविषयीं शाबिती झाल्यास पुढें काय करावें याविषयीं सरकाराकडून विचार करण्यांत येईल.

पुण्यामध्यें गवर्नर साहेबांची गाडी जात असतां कोणी मिलिटरी आफिसराची गाडी मागून जोरानें येत होती तिच्या आवाजानें गवर्नर साहेबांचे घोडे बुजूं लागले. तेव्हां त्याणीं एक स्वार मागच्या गाडीकडेस हळू चालविण्याविषयीं निरोप सांगून पाठविला. आफिसरानें त्या स्वारास चाबकानें मारून आपली गाडी जोरानें हांकून तो पुढें निघून गेला. त्या आफिसरास पकडून त्याच्या दोषी वर्तणुकेबद्दल चवकशी चालली आहे. आफिसर चाबूक जाणून बुजून मारला नाहीं असें ह्मणतो. सु. प.

---

## आरोग्यशास्त्र.

मागील अंकांत निरनिराळ्या खाद्यांचें वर्णन, परीक्षा, व गुणदोष सांगितले. आतां निरनिराळ्या पिण्याच्या पदार्थांविषयींचा थोडा विचार करूं. हे पदार्थ अनेक आहेत. त्यांत शुद्ध पाण्यासारखा सर्व जगोपयोगी, अवश्य आणि सुलभसाध्य दुसरा कोणताच नाहीं. कोणताही प्राणी झाला तरी तहान लागली कीं तो ती पाण्यावर भागवतो. तृषा लागली तरच पाणी प्यावें, मध्यें पिऊं नये हाच उत्तम मार्ग समजावा. कित्येकांस तहान न लागतां उगाच येतां जातां पाणी पिण्याची संवई फार असते तसेंच साऱ्या दिवसांत पाणी पिण्याची जरूरी लागूं नये ह्मणून एकाच वेळीं चार साहा पंचपात्रें पिऊन ठेवतात. परंतु ह्या दोन्ही संवई फार वाईट आहेत. अतिशय श्रम केल्यावर किंवा उष्णता फार झाली तर नेहमीपेक्षां जास्त पाणी प्यावेसें वाटतें, व थोडें जास्त प्याल्यास मुळींच हरकत नाहीं. परंतु एकदम मात्र फार पिऊं नये. तसेंच भोजनाच्या पूर्वीं किंवा त्या बरोबर पाणी मुळींच पिऊं नये प्याल्यास क्षुधा मंद होते व पक्वाशयांतील रसांत तें मिळून त्याची पचनशक्ति कमी पडून अन्न न जिरल्यामुळें अजीर्ण होतें; जेवून उठल्यानंतर सुस्तपणा वाटतो व कांहीं वेळ पर्यंत चैन पडत नाहीं. ह्मणून भोजन आटपल्यानंतर पाव अर्धा तास गेल्यावर थोडें पाणी प्यावें.

पाणी जसें जीवनास अवश्य आहे त्याचप्रमाणें बाहेरील रोग शरीरांत आणून त्याची दुर्दशा किंबहुना नाश करण्यासही तें समर्थ आहे. ह्मणून प्रत्येकानें आपण पाणी पितों तें निरोगी आहे किंवा कसें याची पक्की खात्री करून घ्यावी. पाण्याच्या योग्यायोग्यतेची परीक्षा करून घेण्यास रसायनशास्त्राची बरीच माहिती लागते. तर अशी माहिती सर्वांस कुठून असणार? ह्मणून प्रवासांत, व रोगांची साथ उठली असतां घरीं सुद्धां पिण्याचें पाणी आधण येई पर्यंत कढवून गार होई तों पर्यंत तसेंच उतरून ठेवावें. नंतर एक मोठें मडकें घेऊन त्याच्या बुडास चार पांच बारीक छिद्रें पाडावीं व आंत जाड रेती व त्यावर कोळसे असे दोन थर घालून त्यांतून तें गाळून काढल्यावर बिनधास्त प्यावें. नुसत्या पाण्याखेरीज दुसरे अनेक पिण्याचे पदार्थ ज्यांनीं वर्ज केलेले असे कोठ्यावधि लोक फारच वृध्दापकाळपर्यंत चांगल्या आरोग्यदशेंत राहिलेले सांपडतील.

काफी— आलीकडेस लहान थोरांत काफीचा उपयोग फार होऊं लागला आहे. तींतील तत्वाचें नांव क्याफीन. हें शेकडा ७५ पर्यंत असतें. काफी भाजल्यानें हें फारसें कमती होत नाहीं तर उलटें भाजण्यानें काफी फुगून हलकी होते, आंतील साखरेंत कांहीं फेर होतो, वास सुटतो आणि कारबानिक आसिड, ऑक्साईड व नैट्रोजन सुटे होऊन उत्तम काफी बनते. तयार केलेल्या काफीच्या एका प्याल्यांत सुमारें दीड पासून दोन ग्रेन क्याफीन सांपडतें.

काफी थोडी प्याल्यानें मज्जामंडळांस उत्तेजन येऊन हुशारी वाटते, परंतु फार घेतल्यानें हातापायांस कांपरें सुटतें. माफक घेतल्यानें नाड्या जलद चालतात, अंगांतील आळस उडून जातो, लघवी जास्त सुटते व श्वासोच्छ्वासादि क्रिया जलद चालतत. हिंदुस्थानासारख्या उष्ण प्रदेशांत ही फारच गुणकारक आहे नेहमी काफी पिणारांस विषमज्वरा पासून फारशी बाधा होत नाहीं असें कित्येकांचें ह्मणणें आहे.

काफी सर्वत्रांत नीट भाजतां येत नाहीं ह्मणून बंद केलेल्या पत्र्याचे डब्यांत जी बाजारांत मिळते ती घ्यावी किंवा भांड्यांत घालून त्याचें तोंड अगदी बंद करून नंतर भाजावी. प्रत्येक मनुष्यानें दररोज दोन तोळ्यांपेक्षां अधिक घेऊं नये. काफी पाण्यांत घालून कढवली असतां तिचा वास निघून जातो ह्मणून अधणापेक्षां जरा कमी पाणी कढवून त्यांतील सुमारें एक प्यालाभर पाणी दोन तोळे काफीच्या भुकीवर ओतून तें पावतास पर्यंत झांकून ठेवावें. मग दोन चमचे दूध व आपल्या सामर्थ्यानुसार थोडी स्वच्छ साखर घालून प्यावी. काफीस या पेक्षांही जास्त सुवास पाहिजे असल्यास काफीचा गाळ प्यालाभर पाणी घालून उकळावा व तो काढा ताजा भुकीवर ओतून पहिल्याप्रमाणें झांकून ठेवून दूध व साखर घातलीं असतां उत्तम सुवासिक काफी बनते. याप्रमाणें एक वेळच्या गाळाचा दुसऱ्या वेळीं उपयोग करावा. काफीची परीक्षा ती भाजून प्याला बनवल्या शिवाय बरोबर समजत नाहीं चिकोरी शिवाय यांत बहुधा दुसरी भेळ कशाचीही नसते. भाजलेली चिकोरी पाण्यांत टाकली असतां बुडते. तशी काफी बुडत नाहीं. हिची खरी परीक्षा सूक्ष्मदर्शक यंत्राशिवाय होत नाहीं. सु. प.

---

☞ हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १८ माहे आक्टोबर सन १८८० इसवी अंक ४१

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०।४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १।८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार डाकेंत घेणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०।१ |
| इंग्रेजी लिपींत दर ओळीस | ०।३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०।२ |

## वसूल.

| | |
|---|---|
| रा. रा विष्णु कृष्ण श्रोत्री मास्तर | ६।१२ |
| ,, ,, गोविंदराव यशवंतराव तहशि० | १३ |
| ,, ,, जनार्दन जयकृष्ण सरव्हेअर | ११ |
| ,, ,, सेक्रेटरी पंढरकवडा लायब्ररी. | ३ |
| ,, ,, धोंडो त्रिंबक आपटे क्लार्क | १५ |
| ,, ,, बाळाजी कोंडेश्वर देशपांडे | ११।८ |
| मि. खिजंदरखा हबीबखा मक्तेदार | ६ |
| ,, नूरखान हिंदुस्थानी डि इन्स्पेक्टर | १२ |
| रा. रा श्रीराम भिकाजी जठार ड. इ० | ६ |
| ,, ,, मारुती हणमंतराव देशमुख | ६।१२ |
| मि. थापसन साहेब असि० कमिशनर | ६।८ |
| रा रा. भास्कर लक्ष्मण अभ्यंकर मास्तर | ५ |
| ,, ,, जलमसिंग जानसिंग जगात | ६।१० |
| ,, ,, अनाजी नारायण वेचलेकर मा | ६।८ |
| ,, ,, सेक्रेटरी हिंगणघाट कलायब्ररी वणी | ६।८ |
| ,, ,, तुकाराम जानजी देशमुख | ६।८ |
| ,, ,, शिवराम जयकृष्ण कुळकर्णी | ६।८ |
| मि. सुभानखा वल्लद खिजंदरखा मक्तेदार | ३ |
| रा. रा आत्माराम गुणाजी गारगोटी | ६।८ |
| ,, ,, दामोदर मल्हार व रामराव जागेश्वर | ६।८ |
| ,, ,, भैरवसिंग जनकसिंग फारेस्ट कारकून | ६।८ |
| मे. दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. | २० |
| ,, बईरामजी साहेब | १३ |
| ,, रतनजी साहेब सदर तालुकदार | २६ |
| मि. हिथ साहेब पोलिस सुपरिंटेंडंट | १५ |
| रा. रा. रामसेवक दीनदयाळ | ५ |
| ,, ,, यादवराव अनंत गु० कुळकर्णी | ६।८ |
| श्रीमती लक्ष्मीबाई देशमुखीण | १० |
| रा. रा. आकाजी बळवंत देशमुख | ६।८ |
| ,, ,, गनुसिंग जमादार आ. माजिस्त्रेट. | ६ |
| ,, ,, भगवान वल्लद पैकाजी मक्तेदार | ६ |
| ,, ,, आनंदराव जानराव देशमुख | ६ |
| ,, ,, भाऊसिंग विरू कानस्टेबल | १५ |
| ,, ,, भगवान चंद्रभान पाटील | ११।८ |

## नोटिस

अर्जुन वल्लद बहिराजी तेली गोधे वस्ती मौजे मनवें तालुके मुर्तिजापर जिल्हा उमरावती यास मनु वल्लद रामजी तेली चाटी. वस्ती करवे कुरणखेड तालुके व जिल्हे अकोलें यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझी बहीण भागीर्थी ही तुमची लग्नाची बायको आहे तुह्मारे अडीच वर्षे झालीं तुह्मी तिला नेत नाहीं. आह्मी पांच चार वेळां तुमचे एथे पंचासह आलो व तुह्मास अनेक प्रकारें मुलीस घेऊन जाण्याविषयीं ह्मटलें पण तुह्मी तें मान्य केलें नाहीं. आजवर ती अज्ञान होती पण हल्लीं वयांत आल्यामुळे पुढें आह्मी तिला वागवूं सकत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे. तर ही पावल्यापासून आठ दिवसांचे आंत गेले अडीच वर्षांत तिचे अन्नवस्त्राप्रीत्यर्थ खर्च झालेले रुपये २४० दोनशें चाळीस आणून द्यावे. व तुमचे कुटुंबास घेऊन जावें. याप्रमाणें न केल्यास तुमचा तिजवरील लग्नाचा हक्क कायद्याप्रमाणें रद्द करून सदरहू रुपये तुमचे पासून या नोटीशीच्या खर्चासुद्धां फिर्याद करून घेतले जातील. कळावें तारीख १५ माहे आक्टोबर सन १८८० इसवी.

(सही) मनु वल्लद रामजी चाटी तेली कुरणखेड याचे हातची निशाणी खुद.

## पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

वाकद ता० १२।१०।८०

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि. वि. मी फिरत फिरत वाकदास आलों. तेथें मागें एक दत्तविधान झाल्याबद्दल आपले पत्रांत प्रसिद्ध झालें होतें. त्याच बाईनें मागें दुसरा दत्तक घेतला होता. त्या पूर्वी दत्तक घेतलेल्या मुलानें कोर्टांत फिर्याद केली होती व त्याच्या पक्षाकडे वकील दिसली यावरून उभयतां पक्षकार आपसांत समजून फिर्यादीचा राजिनामा झाला असें समजतें. वाद सांगून विनाकारण पैशाची धुळधाण करणें असलीं बरोबर नाहीं. उभयतां पक्षकार वस्ताद्य होते तथापि समजलें यामुळें त्यांची तारीफ करावी यांत हरकत नाहीं. या गांवीं रावसाहेब देशपांडे मोठे सुखी व वजनदार मनुष्य आहेत. सरकारी दरबारांत यांचा मोठा वोज आहे. यांच्या पदरी जमीन पुष्कळ आहे धन्याचा संग्रहही बराच आहे. यांच्या घरीं हमेशा येणारा जाणारांचा राबता फार. शाळेचे कामीं यांचें चांगलें लक्ष आहे. सर्व प्रकारें शाळा यांच्या व रा. रा. गणपतराव पाटील यांच्या मदतीवर चालली आहे. पूर्वींचे मास्तर रा. रा. केशव दत्तात्रय हे रजेवर गेले आहेत. त्यांनीं नागपूर प्रांतांत जाऊन भंडारा जिल्ह्यांत फक्त हेड कान्स्टेबलची दरमहा रुपये १५ ची जागा मिळविली असें त्यांचें पत्र आल्यावरून कळतें. मास्तराच्या कामापेक्षां या कामांत यांची चांगली वाढती होईल यांत संशय नाहीं. कारण यांचा स्वभाव चौकस असून पोलिस खात्यास पाहिजे अशा प्रकारें शिक्षणार चांगले आहेत. आतां ते परत येणार नाहींत असें वाटतें असें झालें असतां ती जागा हल्लींचे मास्तर शामराव पातेंड यांस मिळेल असें वाटतें. कारण हे फार हुषार आहेत. हे आल्या पासून शाळेंत मुलांची संख्या वाढली व अभ्यासही बरा चालला आहे. हे मेहकरचे देशपांडे आहेत. यांचे या गांवीं सोयरे आहेत. सर्व यांस मदत करण्यास तयार असतात.

वाकद येथील जमीन चांगली, गहूं उत्तम प्रकारचे पिकतात. सालमजकुरीं पाऊस चांगला झाला हल्लीं रब्बीच्या पेरण्या सुरू होण्याची संधी आहे. एथून एकलासपुर या नांवाचा गांव जवळच आहे तेथें एका बाईनें आपली पाटीलकी विकली. या वेळीं पुष्कळ जमेदार लोक जमले होते त्यांस तिनें पागोटीं वगैरे बांधुन चांगलें गौरविलें. स्थावर मालमत्ता विकण्याचा हक्क स्त्रीस नाहीं असें असतां हे कसें झालें कोण जाणे; आपल्या सुंदर पत्री जागा द्याल अशी आशा आहे.

आपला बातमीदार
वाकदकर.

रिसवड तारीख ९।१०।८०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपल्या सुंदर पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे हल्लीं धान्य स्वस्त होत चाललें आहे. पाऊस चांगला पडला. मध्यें कांहीं दिवस नव्हता यामुळें साळीच्या शेताची खराबी झाली. मे. पोलिस इन्स्पेक्टर यांची स्वारी एथें वाशिमाहून आली होती. स्टेशनचे काम तपासून खुष झाली हल्लीं स्टेशन जुन्या गढींतून नवीन स्टेशनांत गेलें. हें नवीन स्टेशन पांच सात हजार रुपये लावून सरकारानें बांधलें आहे. हें गावाबाहेर वाशिमच्या रस्त्यावर आहे. जागा फारच चांगली झाली आहे. इमारत फार देखणी व भव्य आहे. अद्याप पर्यंत शिपाई लोकांस राहण्यास जागा झाली नाहीं यामुळें स्वयंपाक करण्यास गरीब बिच्याऱ्यास पंचाईत पडते. स्टेशनचे घराभोंवार अवार नाहीं यामुळें सर्व जागा भणभणीत दिसते आतां सभोंवतें साफ करण्याचें काम चाललें आहे व पुढें एथें बगीचाही लावणार असें ऐकतो. एथील चीफ आपल्या कामांत फार चांगले असून गुन्ह्याचा चांगला तपास लावितात. मोपच्या डाकयाच्या कामीं यांनीं अतिशय मेहनत घेतली याबद्दल सरकार यास बढती देईल अशी आशा आहे. एथें एका मोठ्या दुकानदाराचें दिवाळें निघालें असें ह्मणतात. आतां हुंड्या वगैरे चालण्याच्या बंद झाल्या. हैदराबादेहून मुनीम आले आहेत. ते सुधारणा करीत आहेत. पूर्वींचे मुनीम चांगले हुशार होते. त्यांनीं काम चांगलें चालविलें होतें तरी अशी दशा दुकानावर आली याबद्दल वाईट वाटतें. एथील पोस्टमास्तर व्यंकटेश बाळकृष्ण यांची बदली राजगावास झाली असून ते तिकडे अजून गेले नाहींत त्यांच्या जागीं आलेले इसम हुशार आहेत. मागील पोस्टमास्तरांनीं पोस्टाची फारच खराबी केली होती त्यांस काम करितां येत नव्हतें सबब कमी दर्ज्याच्या पोहद्यावर गेले. साल मजकुरी दसऱ्याबद्दल मतभेद झाला. कित्येक लोकांनीं मंगळवारी व कित्येकांनीं बुधवारी करण्याचा निश्चय केला. एथील शाळेंत तंटा सुरू झाल्याचें कळतें. कारण समजलें नाहीं मागेंही असा प्रकार एथें चालला होता तेव्हां शाळा नासली. आतां फार चांगली आहे. तंटा लवकर न मिटेल तर पुन्हा मागीलप्रमाणें कदाचित झाल्यास आह्मा गरिब लोकांची विद्या शिकण्याची सोय नाहींशी होईल. कळावें लोभ करावा ही विनंती.

आपला सेवक स.

वऱ्हाडसमाचार.

मिति आश्विन शुद्ध १५ शके १८०२

## धर्मशाळा उघडण्याचा समारंभ.

मे० दस्तुर बहिमनजी जामासजी सी. आय. ई. यांनीं सुमार दीड वर्ष नवीन धर्मशाळा बांधण्याचा सक्त प्रयत्न चालविला होता. तें काम त्यांच्या मनाप्रमाणें पुरें होऊन ती इमारत विजयादशमीचे मुहूर्तानें गेले बुधवारीं सर्व लोकांचे उपयोगार्थ खुली करण्याचा समारंभ मोठ्या थाटाचा केला. निशाणें, आंब्याचे डाहळे वगैरेनीं धर्मशाळा सुशोभित केली होती व तिचे पुढील भागास शामियाना दिला होता व त्यांत खुर्च्यांची बैठक केली होती. धर्मशाळेचे सर्व दरवाजे लावून घेऊन मुख्य दरवाजास रुप्याच्या मुलाम्याचा कडी कोयंडा व कुलूप लावून तो बंद केला होता. पायऱ्यावरून फुलझाडांच्या कुंड्या ठेविल्या होत्या. पुढील भागास पोलिसचे पुष्कळ लोक हारीनें उभे केले होते व एकंदर व्यवस्था फार चांगली ठेविली होती. सहा वाजल्या पासून लोक जमूं लागले ते ७ वाजत पर्यंत सर्व जमले. युरोपियन आफिसर व त्यांच्या स्त्रिया बहुतेक सर्व आल्या होत्या, त्याचप्रमाणे गावांतील बहुतेक सर्व प्रतिष्ठित गृहस्थ आले होते, तसेच बाहेर गावाहून कित्येक गृहस्थ या समारंभाकरितां पु-

दान आले होते. त्यावरून बहिमनजी साहेबास फार संतोष वाटला. कर्नल बेलसाहेब कमिशनर यांस अध्यक्षस्थान स्विकारण्याविषयीं विनंती झाल्यावरून त्यांनीं तें स्वीकारिलें. नंतर बहिमनजी साहेबानीं आपण आजारी असल्यामुळें धर्मशाळेच्या हकीकतीचा मजकूर मि० लक्ष्मीपती नायडु बारिस्टर यांस वाचून दाखविण्याविषयीं विनंती केली. त्याप्रमाणें त्यानीं उठून इंग्लिश भाषेमध्यें ती हाकीकत फार उत्तम रीतीनें वाचली. व तिचेच भाषांतर बाकीचे लोकांस कळावयाकरितां तयार केलें होतें तें त्यांनीं खंडेराव बाळाजी फडके यांजकडून वाचविलें. नंतर मि० लक्ष्मीपती यांनीं या प्रसंगास उचित असें संभाषण लिहून आणिलें होतें तें वाचिलें. त्याची रचना फार सरस व चित्तवेधक होती. हे लेख आम्हांस मिळाले आहेत ते आम्ही पुढील अंकीं वाचकांस सादर करूं. बहिमनजी साहेबांनीं आपले हाकिकतींत म्युनिसिप्यालिटीस अशी विनंती केली होती कीं "ही धर्मशाळा तिनें आपले ताब्यांत घ्यावी व प्रवासी लोक तेथें उतरतील त्यापासून कांहीं कर घेऊ नये." ती गोष्ट मे० फिटझरलडसाहेब म्युनिसिप्यालिटीचे प्रेसिडेंट व डिपुटीकमिशनर यानीं उभें राहुन भाषण केलें त्यांत मान्य केली व बहिमनजी साहेबाचे आभार मानिले. नंतर कर्नल बेलसाहेब कमिशनर यानीं उठून थोड्क्यांत सुरस भाषण केलें त्यांत बहिमनजी साहेबाच्या या कृत्याची फार वाखाणणी करून या इमारतीच्या योगानें अकोल्यास मोठी शोभा आली व येणेंकरून अकोल्यांतून बहिमनजी साहेबाची आठवण कधी नाहींशी होणार नाहीं असें सांगितलें. नंतर बहिमनजी साहेबांनीं चांदीच्या तबकांत चांदीच्या मुलाम्याची किल्ली आणून कमिशनर साहेबास दिली व त्यानीं दरवाजाशीं येऊन मोठे आनंदानें धर्मशाळेचा दरवाजा उघडला. व सर्व मंडळी आंत गेली. आंतले बाजूसही थाटमाट फार चांगला केला होता. मधील चौकांत मोठा शामियाना देऊन तेथें तीन च्यारशे खुर्च्या हारीनें मांडिल्या होत्या. जागोजाग केळीचे स्तंभ लाविले होते. पुष्पगुच्छ व आंब्याचे पानांच्या माळा सर्वत्र लाविल्या होत्या तेथें पुन्हा येऊन सर्व मंडळी विराजमान झाली. नंतर बहिमनजी साहेबांनीं कांहीं पोशाग व बक्षीस देण्याकरितां आणिले. त्याबद्दल त्यांनीं असें सांगितलें कीं माझे हाताखालीं जा जा लोकांनीं देखरेखीचें काम केलें त्यांत ज्यांची मेहनत मला बक्षिसा योग्य दिसून आली त्यांनां देण्याकरितां हें मी आपल्या पदरच्या खर्चानें बक्षीस देण्याकरितां आणिलें आहे. धर्मशाळेला लागलेल्या रकमेंत माझी कांहीं वर्गणी नाहीं, मी आरंभापासून आजपर्यंत जी काय शारीर मेहनत केली तितकीच ह्मणून या बक्षिसाकडे मी हें अल्प द्रव्य लाविलें आहे. तर कमिशनर साहेबांनीं आपल्या हातानें हीं बक्षिसें द्यावीं. ती गोष्ट त्यांनीं मान्य करून बक्षिसें दिलीं. प्रथम मि० चार्लस म्युनिसिप्यालिटी कडील इन्स्पेक्टर यास एक घड्याळ दिलें. नंतर मि० दामोदर विठ्ठल म्युनिसिप्यालिटीचे हेड कारकून यांस पागोटें, धोतरजोडा, व अंगरख्याचें कापड असे तीन पोशाग दिले. दामोदरपंतानीं सतत श्रम करून आपणास मनापासून चांगली मदत दिली त्याकरितां व दुसरे लोकांस, चांगल्या मेहनतीचा चांगला गौरव होतो असें समजावें याकरितां, आपण बक्षीस देत आहो असें बहिमनजी साहेबांनीं सांगितलें. नंतर कमिटीचे दुसरे कारकून मि० सिताराम सैंखाराम, व कांहीं मेस्त्री, कंट्राक्टर, माळी वगैरे लोकांस पोशाग दिले. याच पोशागांत बंगी नावाच्या एका ज्ञात्याच्या स्त्रीस चोळी लुगडें बक्षीस दिलें तें घेण्याकरितां ती सभेंत आली तेव्हां सर्वांस विलक्षण वाटून युरोपियन स्त्रिया पुरुषांत मोठा हशा पिकला. व कमिशनर साहेबांनीं हसत हसत तिलांही बक्षीस दिलें. नंतर पान सुपारी, अत्तर, गुलाब, हार तुरे सर्वांस वाटिले व अध्यक्षांचे आभार मानिले आणि सर्व लोक बहिमनजी साहेबाची वाखाणणी करीत करीत आपआपले घरीं गेले. याप्रमाणें हा समारंभ सांग सिद्धीस गेला याबद्दल आह्मांस संतोष वाटतो.

### हकीकत.

सुमारे ४० वर्षांपूर्वीं ह्मणजे या प्रांतांचा कारभार आपले सरकारचे हातीं येण्यापूर्वीं सरासरी एकुणतीस वर्षांचे सुमारास ह्या प्रांताचा कारभार हैदराबाद सरकारचे तर्फे स्वर्गवासी मेहेरवान विकाजी पेस्तमजी मेहेरजी ह्मणून दोघे बंधू पारशी गृहस्थ होते त्यांजकडेस होता त्यांचे कारकीर्दींत लोकोपयोगी कृत्यें जीं होऊन गेलीं त्यांपैकीं वाशीम, उमरखेड वाडेगाव, लाखणवाडे, व बाळापूर वगैरे असल्या मोठ मोठाल्या ठिकाणीं त्यांनीं आपले खर्चानें बांधलेल्या धर्मशाळा आज आपले दृष्टीस पडतात त्यांपैकींच एक धर्मशाळा आपले अकोलें शहरचे दक्षणेस अक्कलकोटाचे नजीक होती ही सर्वांनीं पाहिली असेलच ही धर्मशाळा त्यावेळीं जे मोठे दोन रहादारीचे रस्ते होते ह्मणजे एक वाशिमाकडेस व एक बाळापुराकडेस जाणारा त्याचे मध्यावर होती परंतु तो ओघ बदलला आणि आगगाडीचा रस्ता सुरू झाल्यापासून तिकडील रहादारी मोडली त्यामुळें धर्मशाळा एकीकडेस आडमार्गावर असल्यासारखी होऊन तिचा उपयोग होईनासा झाला प्रवासी लोकांस रहादारीचे रस्त्यावर धर्मशाळा नसल्यामुळें ज्या अडचणी पडूं लागल्या त्या मनांत आणून त्यांची कांहीं एक प्रकारानें आपले हातून सोय होईल तर करावी अशा हेतूनें आह्मी धर्मशाळेचे कामीं हात घातला. प्रथमतः मेहेरबान विकाजी पेस्तमजी शेट यांच्या जुन्या धर्मशाळेची दुरुस्ती करावी कीं काय हा विचार मनात आणिला परंतु तसें करून फारसा उपयोग होणार नाहीं असें पुष्कळांचे अनुमतानें ठरलें यास्तव ही नवीन इमारत बांधण्याचे मनांत आणून ह्या जागेची योजना केली. ही योजना करण्यांत आमचे तीन हेतु होते. पहिला हा कीं एथें मोठा खड्डा असून नेहमी फार गलिच्छ रहात असे व जाणारा येणारास त्रास वाटण्याजोगा तो होता ती जागा सुशोभित करावी. दुसरें, इतका मोठा खड्डा भरून काढण्यास म्युनिसिप्यालिटीस जो खर्च लागणार होता तो वाचावा व तिसरें स्यानिटरी कमिशनर साहेबांकडून ही घाणेची जागा बुजवावी ह्मणून ज्या नेहमी सूचना येत असत त्या मान्य करून सार्वजनिक आरोग्यास मदत व्हावी हे सर्व हेतु म्युनिसिप्यालिटीस कांहीं खर्च न होतां सिद्धीस गेले ह्मणून आह्मास आनंद वाटतो व तसें करण्यास अक्कलकोटाकडील जुन्या धर्मशाळेचा मालमसाला घेऊन थोडीसी वर्गणी जमा करून नवीन धर्मशाळा बांधण्यास सुरू करावी असें आह्मांस वाटलें.

स्वर्गवासी मेहेरबान विकाजी पेस्तमजी यांचे कुटुंबांतील मनुष्यांसी परिचय असल्यावरून त्यांसी पत्रव्यवहार सुरू करून वरील हेतु त्यांस कळविला आणि नवी धर्मशाळा बांधून ती मेहेरबान विकाजीसेट यांचे नावानें च चालेल असें कळविलें त्यावरून त्यांच्या वारसास फार आनंद होऊन त्यांनीं आह्मास जुन्या धर्मशाळेचें सामान घेण्याविषयीं परवानगी देऊन बाळापुरास त्यांची दुसरी इमारत होती ती हा या कामास घेण्याकरिता दिली.

या प्रमाणे सर्व तयारी होऊन गुदस्तसालचे मे महिन्याचे १२ वे तारखेस रावबहादुर नारायणभाइ दांडेकर डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांचे हातून या नव्या इमारतीच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ झाला.

प्रथमारंभी ही इमारत इतक्या खर्चाची होईल अशी अगदी कल्पना नव्हती परंतु लोकांनीं या कामास उदार अंतःकर्णानें चांगला आश्रय दिला तेव्हा वर्गणीची मदत झाल्यामुळें काम करण्यास आह्मास उमेद आली. या शहरांतील लोकांनीं पुष्कळ वर्गणी देऊन चांगली मदत ठेविली तशीच या जिल्ह्यांतील पुष्कळ लोकांकडूनही उत्तम वर्गणी मिळाली. आमचे हातीं जी रकम आली तिचा खर्च योग्य रीतीनें व काट कसरीनें होईल तितका करण्याविषयीं आह्मी प्रयत्न केले. हें काम आरंभिल्यास सुमारे १८ महिने झाले इतक्या काळांत आह्मी दोन महिने रजेवर होतो तितका वेळ खेरीज करून आमचा सर्व खानगी वेळ या कामाकडेस खर्च झाला. दोन महिने आह्मी बाहेर गेलों होतों त्यावेळीं आमचे दयाळू डिपुटी कमिशनर मेहेरबान फिटजरल्डसाहेब बाहादुर यांणीं हें काम बंद पडूं न देतां स्वतः देखरेख ठेऊन फार मोठी मदत केली व त्यामुळेंच हें काम इतके लवकर तडीस गेले असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं तसेच वेळोवेळी त्यांनीं आह्मास या कामांत फार चांगल्या रीतीच्या सूचना केल्या ह्या सर्व कृत्याकरितां ह्या प्रसंगीं आह्मीं त्यांचे फार फार आभार मानितों.

कामदार लोकांवर आह्मी नेहेमी फार सक्त नजर ठेवून फार बारकाईनें काम करित गेलों यामुळें लागणारा खर्च बराच कमी झाला असें आह्मास वाटतें. आणखी यातूनही खर्च कमी झाला असता परंतु या ठिकाणीं फार मोठा खड्डा होता त्यामुळे ११ फुटावर पाया भरून काढण्यास आणी सभोवतालची जागा तीनही रस्त्याच्या बरोबर करण्यास फार खर्च लागला.

या कामाकरितां जो पैसा मिळाला व खर्च झाला तो येणे प्रमाणें.

वर्गणीची रकम ५६९३८८३, मेहरबान विकाजी पेस्तमजी शेट यांच्या जुन्या धर्मशाळेच्या सामानाची किंमत १८२५१२४७ एकूण बेरीज ७५१९४१० व आजतारखेपर्यंत झालेला खर्च ७५१८८९

हें काम चालू असतांना या ठिकाणीं प्रवासी लोकांच्या सोईकरितां विहीर होईल तर फार चांगलें अशाविषयीं सूचना झाली आणि ती फार योग्य आहे असें आह्मास वाटलें कारण परकीय लोक एथें रात्रीचे उतरण्यास आले असतांनां नदीवर जाऊन पाणी आणणें ह्मणजे मोठे संकटाचें काम वाटलें असतें. ही अडचण दूर करण्याकरितां एथील वकील लोकांनीं सर्व खर्च देण्याचे कबूल केलें होतें हे कळविण्यास आह्माला फार संतोष होतो. या विहिरीचें काम बहुतेक तयार होत आलें आहे व तिला वकीलांची विहीर असे नाव देण्यास आह्मी योजिलें आहे.

एथें अद्याप दोन तीन दुसरीं कामें झालीं पाहिजेत आणि तीं कांहीं वेळानें होऊन जातील अशी आह्मी उमेद बाळगतों. एथें प्रवासी लोकांस स्वयंपाक करण्याकरितां एक निराळी जागा तयार केली पाहिजे व अतिशूद्रास उतरण्याकरितांही निराळी जागा झाली पाहिजे कारण या जागेंत त्यांस उतरूं देणें हें आमच्या बहुतेक वर्गणीदारांच्या इच्छे विरुद्ध होईल इतकेंच नाहीं परंतु तेणें करून धर्मशाळेचा एकंदरींत लोक कमी उपयोग करूं लागतील. या धर्मशाळेस आजपर्यंत जो खर्च झाला त्यांपैकीं मोठी रकम लोकांच्या वर्गणीनें मिळाली तथापि या कृत्यांस आरंभ झाला तो मुख्यत्वें मे. विकाजी शेट यांच्या जुन्या धर्मशाळेचे सामान मिळाल्यामुळें होय. व त्यांचे वारसास ही धर्मशाळा त्यांचे नावानें चालेल असें वचन गेलें आहे या कारणास्तव या धर्मशाळेस मिस्तर विकाजी पेस्तमजी मेहरजी यांचें नाव देऊं. या हकीकतीचा दगड कोरून आणून बसविण्याचा इरादा आहे.

एथें अकोलें म्युनिसिपाल कमीटींतील सर्व गृहस्थ बसले आहेतच त्यांस आह्मी अशी विनंती करितों कीं त्यानीं कृपा करून ही धर्मशाळा आपले ताब्यांत घ्यावी आणि इच्छा सर्व लोकांस ज्या रीतीनें चांगला उपयोग होईल त्या रीतींत ही राखावी. ही धर्मशाळा त्यांचे हातीं देतांना आमच्या दोन शर्ती आहेत त्या ते कबूल करतील अशी आह्मी उमेद बाळगतो. पहिली उतारू लोकांजवळून कोणताही प्रकारचा कर घेऊं नये. दुसरी चार कोपऱ्यावर चार खोल्या आहेत त्या हिंदु, मुसलमान, पार्शी व ख्रिस्ती जातीचे संभावित लोकांकरितां मात्र राखुन ठेवाव्या.

ह्या इमारतीच्या दक्षिणेस दोन खोल्या बांधण्याचें काम चालू आहे तेथें वाण्याचीं दुकानें असावीं ह्मणजे प्रवासी लोकांस लागणारा सरंजाम एथल्या एथें अडचण न पडतां मिळण्याची सोय होईल. या दुकानाचा खरोखर चांगला उपयोग होईल अशाविषयीं म्युनिसिपल कमिटी पैरवी ठेवील अशी आह्मी उमेद बाळगून आहों.

दोन्ही दुकानें बांधण्याचा खर्च वाणी लोकांनीं आपले अंगावर घेतला आहे,

आतां या सत्कृत्यास ज्या ज्या लोकांनीं आह्मांस पैशानें किंवा इतर रीतीनें मदत करून हें काम सिद्धीस नेवविलें त्यांचे आह्मास उपकार मानणें आहे. मि० कृष्णाजी दिनकर सुपरवायझर यांणीं आरंभापासून मनःपूर्वक मदत केली आणि हें काम चालू असतां त्यांचें साह्य पुष्कळ तऱ्हेनें आह्मास उपयोगाचें झालें. मि० सदाशिव विष्णु भागवत ओव्हरसियर यांणीही आह्मास त्या कामांत फार मोठी मदत दिली. मि० खंडेराव बाळाजी यांणीं या कामांत फार आस्था व उत्साह

दर्शविला. त्याच[illegible] गों म्युनिसिपल कमिटीती ल इतर मेंबरांनीं [illegible] केलें त्या सर्वांचा मी आभारी आहे.

आतां शेवटीं रे० कर्नल बेल साहेब बहादूर कमिशनर यांनीं आजचे समारंभाचें अधिपत्य स्वीकारिलें ह्मणून त्यांचे मोठ्या विनयानें आभार मानून सर्व ग्रहस्थानी आजच्या दिवशीं येण्याची तसदी घेतली ह्मणून त्यांचे ही फार उपकारें मानितों.

दस्तुर बहिमनजी जामासजी.

---

On the morning of the 13th October at 7 A. M. a large gathering was convened to celebrate the opening ceremony for the Rest House constructed at Akola under the supervision of the well known and famous Dustoor Bymonji Jamasji C. I. E. This gentleman invited all the European ladies and gentlemen of the station as well as all the respectable native gentlmen to witness the ceremony. A spacious canopy tastefully erected before the Rest House decorated with festoons and flags was reserved for the opening ceremony. Colonel Bell the Commissioner of these Provinces kindly took the chair. Dustoor Bymonji with a brief prologue introduced Luxmiputti Naidu as the reader of an address detailing the origin and finale connected with the building of the Rest House mentioning that nearly Rs. 6000 were collected & spent on the building, the main part of the contributions coming from the pleaders of Akola, and conveying thanks to Major FitzGerald the Deputy Commissioner of Akola for the lively interest he had taken while the building was under construction.

An appeal in the address was to effect a boon on the public by not collecting any local tax from travellers using the rest house, and the institution to be considered perfectly free to all. The address was read by Mr. Luxmiputti with fluency and elocutionary taste. The address rendered in Marathi was also read out, by Mr. Khanderao Balaji. Mr. Luxmiputti then read an address of his own motion which was a panegyric of the excellent sterling qualities of Dustoor Bymonji Jamasji C. I. E. ending with a request to the President of the Municipal Committee Major FitzGerald to permit the names of Rao Bahadoor Narayen Bhai Dandekar and Dustoor Bymonji Jamasji C. I. E. being added to the inscription under contemplation to the memory of Vikaji Pestonji Meherji the gentleman whose name the Rest House bears and in whose honour it has been constructed. Major FitzGerald readily acquiesced to the proposal as well as to permit the institution being exempt from any local cess.

Colonel Bell then rose and gave a short but pithy speech thanking Mr. Bymonji for the philanthropic spirit he had displayed. A richly ornamented silver salver was then brought by Dustoor Bymonji Jamasji C. I. E. to Colonel Bell on which was placed the key of the Rest House lock. Colonel Bell opend the lock of the Rest House and entered the building, all the ladies and gentlemen European as well natives following; a circuit was made of the whole Rest House No sooner was the door opend than the interior of the Rest House was visible to the eye with greater taste than canopy outside, decorated with plantain leaves and festoons and hangings, the flooring elegantly carpeted, & cushioned & other chairs neatly arranged In fact the whole arrangement reflected very great credit as well as revealed the exquisite good state for decorations of Dustoor Bymonji Jamasji. A state chair was apportioned to Colonel Bell. All the ladies and gentlemen present occupying seats in the pit [or Hall] of the Rest House, while the verandah or inner portion of the building was crowded with natives of all ranks, the men of the 4th Infantry and a guard of the Akola Police. Dustoor Bymonji produced a parcel containig prizes for various individuals. for service done in building the Rest House, and asked Colonel Bell to distribute them, stating at the same same time that as he ( Dustoor Bymonji ) had not contributed with any monetary consideration towards the building of the Rest House further than devoting his leisure hours to the supervision of the building he deemed it incumbent on him to award the deserving men prizes. Mr. Charles the Municipal Inspector was called and Colonel Bell deliverd him a silver watch. then each of the other members Viz. two Karkuns, a carpenter maistree &c. down to a "Bhangee" received other prizes. The last named personage was called three or four times ere an appearance was put, and to the evident surprise of all a middle aged woman advanced half way and stood, bewildered, mute with astonishment mingled with embarrassment, which produced an agreeable hilarity and amusement among the assembly. She was told to advance forward and colnee nell with great good humour, adding a humorous remark delivered a prize to her. A pleasant smile lit up every countenance in the hall; and for the moment, this humble personage became the cynosure of the morning's attractions. A pleasant termination to the morning's ceremony! Flowers and pan and attar were then Distributed and after a vote of thanks to the chairman Colonel Bell, three hearty cheers were vociferated which like a flying contagion even spread to the outside of the Rest House. the assembly broke up and dispersed to their home's carrying away with them pleasant reminiscences of the mornings entertainment.

The following *Scrap* we publish from the *Bombay Samachar*, a widely circulated Guzerathee daily, sent to us by the Berar Correspondent of that Journal:—

"The very timely fall of rain lately has improved the prosoects of the crops considerably, and a full Kharif outturn is anticipated Cotton is also doing well.

"The officers of Berar, it is delightful to see, are getting up outdoor sports; and it is very grateful to observe that they are growing, every year, generous to admit Parsis and other natives in their society. Parsis are looked to akin to Europeans, and they have already been admitted in the Volunteer Corps

"There will shortly be a Horse Race in which natives will be admitted. After the races, a Public Ball will be given, and it is understood that a few Pasis have also been invited to it, but what they will do there, it is difficult to comprehend; of course they cannot dance, and will merely have to sit there like staues, looking at the dancers!

"The Akola Volunteers are now almost every week at practice at the Target. Messrs MacMarquis, Thompson, Murray, Hall and Rechturn are superior shots. Captain Little of the Akola Company has expressed a desire to reward the best shot with a prize; and it is hoped that Corporal Thompson, at present, the best shot in the Company will obtain it.

"Amongst the Officers, Captain Little and Lieut Davies are crack shots."

---

## वऱ्हाड

हवा स्वच्छ असून थंडी पडूं लागली आहे. तरी दोन प्रहरानंतर ऊष्मा मनस्वी होतो. काल दिवसरात्र अभ्राच्छादित आकाश होतें एकादा पर्जन्य इतक्यांत पडता तर फार चांगलें होतें.

मे० दस्तुर बहिमनजीसाहेब सी. आय. खामगावच्या स्माल्काजकोर्टाचें काम एक आठवडा चालविण्याकरितां काल तिकडे गेले. शनिवारीं परत येतील.

बाशीमचे रजेवर असलेले तहाशिलदार मि० शाबासखान यांस पुन्हा आपल्या कामावर रुजू होण्याचा हुकूम झाला हें ऐकून आह्मांस संतोष होतो. तेथें अकाटिंग काम करित असलेले रा. रा. गणेश गोविंद हे इलिचपुरास आपले डिपुटी क्लार्क आफ कोर्टचे जागेवर परत गेले.

यवतमाळचे क्लार्क आफ कोर्ट मि० महमद इस्मायल रजा घेऊन एथें आले आहेत आतां परीक्षा झाल्यावर परत जातील.

रा. रा विष्णु मोरेश्वर महाजनी एम ए. उमरावती हायस्कूलचे हेडमास्तर मित्रमंडळीस भेटण्याकरितां काल रविवारचे सुटींत एथें येऊन रात्रीचे गाडीनें परत गेले

नदी जवळील धर्मशाळा सुरू करण्याचा समारंभ विजया दशमीचे मुहूर्तावर मोठ्या थाटाचा झाला. त्याविषयींची हकीकत दुसरीकडे दिली आहे. एथें तीन वर्षे प्राति दसऱ्याला एकेक चांगले कामाची सुरवात झाली आहे. तिसऱ्यां मुलींची शाळा दसऱ्याला सुरू झाली, गुदस्तां मित्रसमाज सुरू झाला. व या वर्षी ही धर्मशाळा सरू झाली. या सर्वांची स्थिति चांगली आहे व ती तशीच निरंतर चांगली राहो असें आह्मी इच्छितों.

मुलींची शाळा व लायब्ररी यांच्या इमारतीकरितां साडे बाराशे रुपये जमून तितकीच मदत सरकारांतून मिळावी ह्मणून सरकारास अर्ज झाला होता त्या कामीं सरकारांतून मुलींच्या शाळेच्या कमिटीस असें विचारण्यांत आलें कीं मुलींच्या शाळेची निर्मा वर्गणी देऊन निदान पांच वर्षे शाळा चालविण्याची जबाबदारी आपण घेता किंवा नाहीं? तें कळवावें. त्यावरून एथील मंडळीनीं सर्वानुमतें कशीही अडचण आली तरी ती न जुमानतां पांच वर्षे शाळा आह्मी चालवू असें सरकारास कळविण्याचे ठरविलें याजबद्दल आह्मांस संतोष वाटतो.

अडगावच्या शिरस्तेदारीची जागा ५० रुपयांची करणार असें वर्तमान आहे.

कर्नल बेल साहेब कमिशनर प्रांतांत फिरावयास निघाले आहेत. जलमचा मुक्काम आहे. ४ दिवशीं परत येतील.

अकोटचे मि० एदलजी बहिरामजी, उमरावतीचे रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर, मलकापुरचे मि० शापुर बिरजी यांनीं परीक्षेकरितां रजा घेतल्या आहेत व ते एथें आले आहेत.

२२ वे तारखेस एक सेशनचा मुकदमा एथें चालणार आहे.

२२ वे तारखेस सकाळीं म्युनिसिपालिटीची स्पेशियल जनरल सभा भरणार आहे. गुरें धरण्याच्या संबंधानें जो गवगवा झाला आहे त्यावरून सिव्हिल स्टेशनचे हद्दींत म्युनिसिप्यालिटीला अधिकार आहेत किंवा नाहींत असा प्रश्न उत्पन्न झाला आहे त्याचा निकाल या सभेंत होणार आहे.

हैदराबाद— ता. १०।१०।८०— निजाम सरकारचे अकौंटंट पटावी रामराव यांस ८ तासांची कैद व ५०० रुपये दंड झालेल्या सेशन कोर्टानें मंजूर केला होता यावर लोकल गवर्मेंट नात्यानें रेसिडेंट साहेबाकडे अपील झाल्यांत त्यांनीं कैदेची शिक्षा रद्द केली व दंड बहाल ठेविला.

रेसिडेंट साहेबाचे चिरंजीव ले० मीड साहेब यांस इंदुराहून तार आल्यावरून ते तिकडे गेले व त्यांनां बढतीची जागा मिळाली इकडे त्यांचे जागेवर मे० टेंपल साहेब येणार. हे मुंबईच्या माजि गवरनर साहेबाचे चिरंजीव आहेत असें ह्मणतात.

हवा दिवसां उष्ण व रात्रीं थंड असून सर्वत्र हिवतापाची सांथ आहे.

कल्बुर्गा प्रकरणाचा अजून निकाल झाला नाहीं. बरीच मंडळी कामिशन मुकर होऊन गेली आहे. रेसिडेंट साहेब गेले त्या दिवशीं सर्व मंडळींनीं स्टेशनावर त्यांची भेट घेऊन अर्ज दिला व त्यांनीं तेथील अधिकाऱ्यास इनसाफ करण्याबद्दल समज दिली. प्रकरण अखेरपर्यंत मांडून चालेल असें ह्मणतात.

वर्तमानसार.

दहा लक्ष रुपये खर्चून सिमला एथें गवर्नर जनरल यांजकरितां राजवाडा बांधण्याचा विचार आहे त्या संबंधानें इंडियन हेरल्ड कर्ते लिहितात कीं हिंदुस्थान देश सर्व प्रकारें निर्धन होऊन त्यास भिक्षा मागण्याची, कर्ज काढण्याची, चोरी करण्याची, कित्येक खातीं कमी करण्याची आणि कित्येकांचा खर्च कमी करण्याची वेळ आली असतां तशा वेळेस रयतेच्या पैशानें राजवाडे बांधणें या सारखी विचित्र आणि दुष्ट उधळपट्टी दुसरी कोणची ?

मद्रास इलाख्यांत मुरुवल्लीरम जिल्ह्यांत एक मोठी चोरी झाली; तींत समारें सव्वा लक्ष रुपये किमतीचा माल चोरीस गेला. ह्या चोरीचा पत्ता लावीत असतां मद्रास पोलिसानें पुणें पोलिसास कळविल्यावरून त्यांनीं तेथें तीन इसमास वहिमावरून पकडलें आहे. ह्या तिघांजवळ मिळून २००० रुपये किमतीच्या नोटी सांपडल्या. ने. ओ.

लंडन येथें मुसलमान रहिवाशांची संख्या वाढत असल्यामुळें ते एक मशीद बांधण्याच्या विचारांत आहेत.

काबुलांत आतां चांगली स्वस्थता असून जमाबंदीच्या वसुलाचें काम विना हरकत होत आहे आणि लोक शांतपणें वागत आहेत असें अबदुल रहिमान यांजकडून सिमल्यास पत्र आलें त्यावरून समजतें.

आयुबखान—कंदाहाराहून ता ५ अक्टोबरची तार आली तिजवरून असें समजतें कीं आयुबखान हिरातेस पोंचला. आपला पराभव नावल्यामुळें झाला असें याचें ह्मणणें आहे. आतां त्यास हिरातीलोकांनीं मदत करण्याचें कबूल केलें असून त्यांनीं त्यास १९ तोफा दिल्या, यावरून अयुबखान पुनः स्वारी करील असें वाटतें

डाक्टर व्यानर हे उपास करीत होते इतक्या दिवसांत त्यांस पाहाण्यात आलेल्या लोकापासून फी व देणगी वगैरे मिळून २,७५,००० रुपये जमले. सु. प.

केम एथील वतनीम वाजी नारायणराव तर्केस व एकनाथ आपाजी कुळकर्णी यांनीं वृत्तिसंबंधानें मूठभर भाजीच्या हक्ककरितां आपल्या भाऊपणापैकींच सावळाराम जिवाजी कुळकर्णी यास मारलें व त्यामुळें तो मेला. अशा आरोपावरून सदर त्रिवर्गांवर हल्लीं मे. ओइयान रा. ब. यांजपुढें सोलापुरास खटला चालू आहे. क. त.

नगरच्या सिटीस्कूलचे हेडमास्तर वे. शा. सं. कृष्णशास्त्री दातार व सिटीस्कूलचे फ अ. मा रा रा. विनायक कोंडदेव ओक यांचा वर्ग मुंबईएथील जगन्नाथ शंकरशेटचे स्कुलांत अनुक्रमें हेडमास्तर व फर्स्ट असि० मास्तरचे जागीं झाला त्या सि

पाल्होलें एथील एका गुजराथी वाण्याच्या मुलानें आपल्या बापावर २ लक्षांची फिर्याद केल्याचें कळतें.

मि. ऑर्डिनर जमशेटजी यांची नेमणूक मे बापूजी पुरुषोत्तम डिस्ट्रिक्ट डे. कलेक्टर खानदेश यांचे जागेवर झाली व बापूजी पुरुषोत्तम यांची बदली जमखंडी संस्थानांत झाली.

रशियन सावरणांतून अशी कळविण्यांत आलें आहे कीं, पुढल हिवाळ्यापर्यंत कोणत्याही प्रकारची गडबड होणार नाहीं. ज० कफमन हे ताश्केंद एथें परत आले.

माळव्यांत पाऊस उत्तम प्रकारें पडला असून खसखस, ऊंस व रब्बीची वगैरे पिकें उत्तम स्थितींत आहेत, व धान्य स्वस्त असून जर बाहेरून ओढ न बसली तर असेच दर कायम रहातील असा अजमास आहे.

श्रीमंत लोक सोन्याचे दागिने घालतात परंतु गरीब लोक ज्यांना ते मिळत नाहींत ते कधीं कधीं कांचेचे सोन्यासारखे दिसणारे मणि मुलांच्या अंगावर घालतात. सदर्हू मण्यास चकचकीत करण्याकरितां सोमलाचा अंश लावित असल्यामुळें मुलें ते मणी चोखून मरतात अशी तीन उदाहरणें अमदाबादेस घडून आली.

टर्कीचे सुल्तान यांचें असें ह्मणणें आहे कीं मी राज्याचा राजीनामा देईन पण मोठालीं राष्ट्रें ह्मणतात त्याप्रमाणें निमुटपणें ऐकून घेणार नाहीं.

इचलकरंजीकर नाटककारमंडळीनें गणेश खिंडीतील सरकारी बंगल्यांत "कामेडी आफ एरर्स" चा प्रयोग करून दाखविला. त्याविषीं नामदार गव्हर्नर साहेबांनीं खुष होऊन नाटकमंडळीस १०० रुपये बिदागी व शिवाय त्यांच्या चातुर्यपणाबद्दल एक सर्टिफिकिट दिलें असें समजतें.

पतियाळ्या संस्थानचा राज्यकारभार चालविणाऱ्या मंडळीनें १००००० रुपये मिलिटरीलिलिफ फंडास देण्याचें ठरविलें आहे.

तुर्कस्थानच्या लगत्यास जो या राष्ट्रास दबकावणी घालण्याकरितां मोठाल्या राष्ट्रांनीं आरमाराचा समुदाय जमविला आहे तो तेथून निघून गेल्यावर मग काय तोडजोड करणें ती करूं असें तुर्कस्थानच्या सुलतानांनीं दिलेलें उत्तर लंडनमधील वर्तमानपत्रांस न आवडून ते ह्मणतात कीं हा सर्व युरोपांतील राष्ट्राचा अपमान झाला आहे, वर लिहिलेलें आरमार काठेरा एथें असून ते बासफरस एथें शिरण्याच्या विचारांत आहे. इं. प्र

आमच्या लोकांतील पहिल्या वर्गातील, दुसऱ्या वर्गातील, व तिसऱ्या वर्गातील सरदार, पदव्या मिळविलेले लोक व बडे बडे कामदार यांच्या योग्यता कशाकशा आहेत या बद्दलचा एक तक्ता गेल्या सरकारी ग्याझिटांत छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील तात्पर्य पुढील प्रमाणें:—स्माल्कॉझ कोर्टाचे जज्ज, असिस्टंट जज्ज, सेटलमेंट आफसर, विद्याखात्यांतील इन्स्पेक्टर, कालेजचे किंवा युनिव्हर्सिटींत काम करीत असलेले प्रिन्सिपाल, पोलिस सुपरिंटेन्डेन्ट हे कामदार पहिल्या वर्गांतील सरदारांच्या थेडे खालोखाल समजावयाचे. रावबहादूर व खानबहादूर या पदव्या मिळालेले लोक. ज्यांस डाक्टर ही पदवी मिळाली आहे ते, इंग्रजी युनिव्हर्सिटींतील फेलो, ज्यांस एम० ई० पदवी मिळाली आहे ते. सबार्डिनेट जज्ज पहिला वर्ग डेपुटी कलेक्टर. व माजिस्ट्रेट, दफ्तरदार, असिस्टन्ट, सेटलमेन्ट आफिसर, कालेजचे प्रोफेसर, एल्फिन्स्टन हायस्कूलचे प्रिन्सिपाल व असिस्टन्ट पोलिस सुपरिंटेंडेंट ही सर्व मंडळी दुसऱ्या वर्गांच्या सरदारांत गणली जावयाची फर्स्टग्रेड हायस्कूलांतील हेडमास्तर. पहिला वर्ग माजि० रावसाहेब व खानसाहेब पदव्या मिळालेले गृहस्थ, सर्व एम० ए० व बि० एल०, फर्स्ट ग्रेड दुसरा वर्ग सबजज्ज, ही मंडळी सरदाराच्या तिसऱ्या वर्गांत मोजली जाईल. मामलेदार, दुसरा किंवा तिसरा वर्ग आनररी माजिस्ट्रेट, सेकंड, थर्ड व फोर्थ ग्रेड स्पे० क्ला० सबजज्ज, कालेजचे किंवा हायस्कूलचे व्हाइस प्रिंन्सिपाल, कालेजचे असि० प्रोफेसर, सेकंडग्रेड हायस्कूलचे हेडमास्तर, रावसाहेब व रावब० नाहींत असे विद्याखात्याचे डेपुटी इन्स्पेक्टर, बि० ५० बी० एस०, एल० एम० आणि एस० एल० सी० ई० ह्या पदव्या मिळालेले गृहस्थ, पोलिस इन्स्पेक्टर मांव मुनसफ व कानिसिलेटर या सर्व लोकांची गणना तिसऱ्या वर्गाच्या सरदाराच्या थोडी खालोखाल करावयाची.

जर्मनींतील वर्तमानपत्रांनीं पूर्वेकडील व ह्या राष्ट्रांची थट्टा चालविल्याबद्दल पुष्कळ युरोपियन वर्तमान पत्रकर्त्यांस राग आला आहे.

विलायतेस पंच नांवाचें जें पत्र निघतें त्याचे एडिटर मि० बरनर्ड नांवाचे गृहस्थ असून त्यांस दरसाल सुमारें १५००० रुपये पगार द्यावा लागतो. आमच्या नेटिव पत्रांच्या एडिटरांस अति मोठा ह्मणजे ५० रुपये दरमहा पर्यंत पगार किंवा त्यांचा एकादा ग्रंथ फुकट काढून दिला ह्मणजे बस होतें.

लंडन एथें दारू पिण्याचें व्यसन फार वाढलें आहे. सन १८७९ सालीं, सर्व गुन्हेगारांची संख्या ८१,३८५ असून १९,४५४ ( यापैकीं ७,४६२ बायका होत्या ) इसमांवर दारू पिण्याबद्दल खटले झाले व १८,४३८ ( यापैकीं ८१५० स्त्रिया होत्या ) जगावर दारू पिऊन बेशुद्ध झाल्यामुळें अस्तव्यस्त पडल्याचा आरोप होता. व रील संख्येच्या मानानें पूर्ण सुधारलेल्या शहरीं मोठाच अनर्थ होत असून तेथील लोकांस हें एक मोठें लांच्छन आहे. सुधारणुकीचा परिणाम असाच होतो काय!

लंकेंत अलीकडे तंबाखूची लागवड होऊं लागली आहे.

चीन सरकारच्या बड्या दरबारांतील प्रधान लोक सरकारी कामें करण्यास फार उशीर लावितात. वास्तव त्यांस योग्य शासन काय करावें याविषयीं तेथील सरकारानें आपल्या पदाच्या मुख्य अधिकाऱ्यांस विचारलें आहे असें समजतें चिनी बादशहाचें हें वर्तन उदाहरण घेण्या जोगें नाहीं असें कोणाच्यानें ह्मणवेल बरें?

हिंदुस्थानचे स्टेट सेक्रटरी लार्ड हार्टिंगटन हे थोड्याच दिवसांत हिंदुस्थान देश पहाण्याकरितां येणार असून त्याप्रमाणें त्यांची तयारीही चालू आहे असें समजतें.

जीर्णोद्धार— आपल्या हिंदुधर्मातील प्राचीन व पुराण प्रसिद्ध प्राकृत व संस्कृत आणि कानडी ग्रंथांचे पुनरुज्जीवन करण्याकरितां कोल्हापुर एथील अधिकाऱ्यांनीं रा० रा० शिवराम बापूजी परांजपे राजाराम कालेजांतील संस्कृताचे प्रोफेसर यांस हुकूम दिल्याचें ऐकतों. व त्याप्रमाणें रा० रा० यांणीं तो क्रम सुरू केला आहे. त्यांपैकीं बरेच ग्रंथ तेथील लक्ष्मी सेन भट्टारक पट्टाचार्य जैन स्वामी यांच्या मठांत सदर्हू प्राचीन ग्रंथांचा संग्रह बराच असल्याचें समजल्यावरून त्या ग्रंथांचें भाषांतर करून घेण्याकरितां कांहीं लेखकांच्या योजना तिकडे झाल्या आहेत असें ऐकतों. पु. वै.

# सापकरांची रोजनिशी.

सन १८८१ इसवी सालाकरितां.

सन १८८१ सालाकरितां जें रोजनिशीचें पुस्तक आह्मी तयार करीत आहों त्याच्या नमुन्याचा साच्या व पूर्वीपेक्षां उपयुक्त विषयांची बरीच ज्यास्त सुधारणा करणार आहों. हें पुस्तक येत्या नोवेंबर २५ वे तारेखेचे आंत छापून तयार होईल. त्यांत सरसालचे दिनचर्ये संबंधी मराठी तिथि, वार, महिने, सूर्योदयास्त. विशेष उपवास ग्रहणें सण व त्या संबंधें सरकारी आफिसांस व दिवाणी कोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजी, विवहाचे मुहूर्त, त्याचप्रमाणें इंग्रजी व मुसलमानी वार तारखा, महिने, सण इत्यादिकांचा समावेश केला जाईल. तसेंच रेलवे तारायंत्र स्टांप, मनिआर्डर्स, पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या हुंडी वगैरे नेहमी जरूर लागणाऱ्या विषय संबंधानें अवश्य तितकी बरीच माहिती दिली जाईल. शिवाय सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा, विशेष न्यायाचा, दस्तऐवज नोंदण्याचा, जनरल स्टांप, कोर्ट फी, पोलिस गाइड डिस्ट्रिक्ट आणि गांवचे पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर इत्यादि अनेक नेहमी जरूर लागणार कायद्यासंबंधी उपयुक्त अशी अवश्य तितकी माहिती दिली जाईल कापीव तुळया, तक्ते वगैरे लांकडांचे घनफूट कसे मोजावे या विषयांची माहिती दिली जाईल ही माहिती कंत्राटदार व लांकडें खरेदि करणारे लोकास विशेष फायद्याची होईल. आजमासें २० रुपये दरमहा पगाराचा रोजमेरा कसा चुकता करावा याज विषयींच्या माहितीचें कोष्टक दिलें जाईल पुस्तकाच्या अखेरीस कोरीं पृष्ठें व जमाखर्चाच्या सदराचेंही कागद जोडले जातील. एकंदरींत हरएक प्रकारची होईल तितकी ज्यास्त सुधारणा करण्यांत येईल.

रोजनिशीची आगाऊ किंमत.

रोजनिशी प्रत १ ब्लॉटिंग पेपर सहित जाड पुठ्यानें बांधलेली किंमत ११ आणे. टपाल हाशील २ आणे पडेल.

रोजनिशी प्रत नंबर २ साधी जाड पुठ्यानें बांधलेली किंमत ७ आणे, टपाल हंशील दीड आणा पडेल.

रोजनिशी प्रत नंबर ३ साधी विलायती कापडानें बांधलेली किंमत ६ आणे टपाल हंशील दीड आणा पडेल.

किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पाठविली असतां विशेष सोयीचें होईल. चार आण्यांच्या पुढें व दाहा रुपयांचे आंत मनीआरडर करण्यास दोन आणे पडतात.

वर लिहिल्याअन्वयें जी किंमत आक्टोबर अखेर आह्माकडे येईल त्या नंबरची रोजनिशी तयार झाल्याबरोबर रवाना करण्यांत येईल. घेणारांनीं त्वरा करावी.

भाऊ गोविंद सापकर.

ज्ञानचक्षूचे मालक.

---

☞ हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवर तारीख २५ माहे आक्टोबर सन १८८० समंवी अंक ४२


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार अगाऊ वर्गणी देणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी आली म्हणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिसा बद्दल.

| | |
|---|---|
| मराठी १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिस

महाराजाधिराज राजराजेश्वर श्री महाराज श्री प्रतापसिंगजी जोतपुर नगर गड महादुर्ग यांचे सेवेसी आज्ञाधारक सुरजमल जात मेसरी भुतडा रहणार मौज राजलोतां पटी मेडतो हल्लीं रहाणार मौज नावली प्रगणे शिरपुर तालुके वाशिम जिल्हा वऱ्हाड याचा साष्टांग नमस्कार विनंती विशेष मी अर्ज करितो कीं माझे चुलते चौथमल रामकरण यांचें दुकान इकडे मादणी येथें होतें त्या दुकानावर मी चार पांच वर्षे त्यांचे मुखत्यारीनें काम पाहत होतो ते समयीं खूपचंद रामबक्ष तामसीकर यांचें कर्ज मादणीचे दुकानाकडे होते याजवर माझ्या चुलत्याचे तर्फे त्याचे नावानें त्या कर्जावर मी सही करून दिली नंतर अलीकडे चार वर्षे झालीं मला मादणीचे दुकानाहून मालकानें बरतर्फ केलें नंतर मी माझ्या दुसरे निराळे गावी राहिलो त्या दुकानावर हल्लीं रामकरण कायम आहे व तामसीकर यानें त्याजवर विद्यमान एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर साहेब बहादूर जिल्हा वाशिम यांचे कोर्टांत फिर्याद नंबर २१४ सन १८७८ इसवेची करून हुकूमनामा मिळविला त्या हुकूमनाम्याबद्दल मजवर कांहीं हक्क नाहीं परंतु मी मारवाड देशांत माझे मुलीचे लग्नाकरितां आलो तेव्हां तापसीकर याचा पुत्र नामे पुरणमल बिनानी गावठा परवडा ही इलाखे खालसा या गावाहून तुमचे हवालदार मार्फत येऊन त्यानें मजवर तगादा केला कीं तुमची हातची सही माझे वहीवर आहे व माझा हुकूमनामा तुमचेवर झाल्यामुळें त्या देशांतून इकडे पळून आला व हवलदार ह्मणू लागला कीं जोतपुरची तलब पाठवून रुपये घेऊं नंतर भलारी येथें कोटांत गेलों तेव्हां असें ठरलें कीं सुरजमल यास वाशिम जिल्ह्यांत पाठविले तर गेल्याबरोबर रुपये घेऊं तेव्हां तो ठराव झाल्यानंतर तेथून मी पुरणमल यांस टांगून इकडे आलो त्यास एथें येऊन तीन महिने झाले तर मजवर कोणी तगादा करीत नाहीं याचे मनीम व मुखत्यार दुकानावर आहेत परंतु इंग्रजी राज्यांत मजवर कांहीं हक्क चालत नाहीं तेथें मला विना कारण तकलीफ देतात करितां महाराजास विनंती केली आहे कीं तुमचे हवालदारास कळवावे कीं तो सुरजमल तेथें जाऊन तीन महिने झाले तर रुपये असतील तर घेतील असते व एथें रामकरण याजवर हुकूमनामा आहे परंतु मादणी दुकानचा वह्या घेऊन अटका लिल्या त्या वह्या अजमासे दहा हजार रुपयाच्या असाम्या मदती बाहेर गेल्या व पुरजा एक वेचून दिला याची रकम वजा घातली नाहीं करितां मादणीचे दुकानावर हक्क चालत नाहीं याजकरितां विनंती करितों कीं मी मुलीचे लग्नाकरितां तेथें येतो तेव्हां मला तकलीफ होऊ नये करितां विनंती केली आहे.

तात्पर्य-- पुरणमल याच्या देण्याचा जबाबदार मी नाहीं व मी तेथें आलो ह्मणजे तक्रार करतील याजकरितां माझे तर्फे मोतीलाल नावलीकर यास मुक्त्यारपत्र दिलें आहे तर मजवर हक्क चालत असेल तर मुक्त्यारावर बताफणी करून घ्यावी परंतु तेथें मला तकलीफ न व्हावी करितां विनंती लिहिली आहे. तारीख १९ अक्टोबर सन १८८० इसवी.

सही सुरजमल भुतडा याची मारवाडी सही आहे.

## पत्रव्यवहार.

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांसः— खालील मजकूरास आपल्या पत्रीं जागा मिळेल ही आशा आहे.

हवामान—उत्तरानीं तर केवळ सुका तावच दिला. हस्त नक्षत्र लागल्यावर दुसरे तिसरे दिवशीं सूर्योदयाचे पूर्वीच मेघ राजांनीं, आपले ढगरूप निशाण पुढें पाठवून राजे साहेबांचे स्वारीनें आर्त झालेल्या प्रजा जनास स्वस्थ करण्याकरितां तेच दिवशीं दिवसा आकाश मार्गे मंद गतीनें आगमन केलें. त्यांची स्वारी सतत दोन दिवस राहून तिसरे दिवशीं प्रयाण झालें. आतां बहुतकरून त्यांनीं गांशा गुंडाळला. हस्त नक्षत्रांत वेळेवर पाऊस पडल्याच्या योगानें खरीप, व रबी हीं दोन्ही पिकें चांगल्या स्थितींत आहेत. गांवांत रोगराई ह्मणण्यासारखी कांहीं नाहीं बाजार भावांत कांहीं कमतरता आहे. हल्लीं चित्रा लागल्यापासून थंडीबाई थोड्या मंद गतीनें आगमन करून दोन चार दिवसांत चमकू लागल्या आहेत.

ता० ८ आक्टोबर १८८० इ० रोजीं सुमारें ७॥ वाजतां मे० नूरखा साहेब वऱ्हाड प्रांताचे हिं० डे० ए० इ० यांनीं खोलापूर येथील हिंदुस्थानी शाळेची परीक्षा घेतली. नंतर दुसरे दिवशीं ता० ९ रोजीं येथील मराठी शाळेची परिक्षा घेऊन साहेब फार खुष झाले. त्यांचे आगमनाप्रीत्यर्थ येथील मराठी शाळेचे हेड मास्तरांनीं जागा फारच शोभायमान केली होती. फाटकाचे बाहेर रस्त्यापर्यंत सडक फार चांगली काढलेली आहे फाटकाचे आंत पाय ठेवतांच उजव्या बाजूस तालीमखान्यास जागा केलेली आहे. परंतु सामान चांगलें नाहीं, ही एक उणीव आहे. पुढें विहीर आहे व जवळच एक सुंदर सडका मधून मधून काढलेल्या असा बगीच्या दृष्टीस पडला. डाव्या हाताकडे पाहतों तों प्रत्येक क्लासात बाळबोध सुवाच्य अक्षरांनीं लिहिलेल्या रंगीत पाट्या टांगलेल्या दृष्टीस पडल्या. हेड मास्तरांच्या कोठडींत इन्स्पेक्टर साहेबांस बसण्यास जागा केली होती. दुतर्फा बांकें व मध्यें कांहीं खुर्च्या ठेविल्या होत्या टेबलाजवळच एका खिडकींत अत्तरदाणी गुलाबदाणी व पानसुपारीचें सामान ठेविलें होतें व एकंदरींत उत्तम शोभा आणिली होती. येथील हेड मास्तर रा. रा. पुरुषोत्तम माधव देशपांडे यांची नेमणूक येथें बदलीवर होऊन सुमारें आठ महिने झाले इतक्यांत ह्यांनीं आपल्याकडून होईल तितकी मेहनत चालविली आहे. हे असिस्टंट लोकां कडून कोणास दुःख न देतां काम फारच सुरक्षीत घेतात व सर्वांचे मर्जीचा कल समजून सर्वांस खूष ठेवून सरकारी काम वेळेवर घेणें हा गुण यांचे अंगीं अलौकीक वसत आहे. हे फार दिवसाचे नौकर असून अनुभवलेले आहेत. व गांवांत ही यांचे वजन चांगलें आहे. मुलांच्या संख्येच्या मानानें हें स्कूल लोअर क्लासांत बरेच मोठें दिसत आहे. या प्रमाणें जिल्ह्यांत शाळा क्वचित् असतील. हिं० डे० इ० हे अध्यक्ष स्थानीं बसल्या नंतर गावांतील सरकारी कामगार, स्कूल कमेटीचें मेंबर रा.रा विश्वासराव पो० पाटील, देवराव सबरजिस्टार, व्यंकटराव देशमुख, डाक्टर काजी वगैरे पुष्कळ लोक आपापले जागीं बसले. नंतर इ० साहेब यनीं १ ला, दुसरा, व शेवटलि क्लासपाहून ते खुष झाले. नंतर येथील फर्स्ट असिस्टंट रा. गोविंद रामकृष्ण यांनीं शाळेस अनुलक्षून शाळेची हाकीगत थोडक्यांत सांगून हिं० डे० ए० यांचे, कमिटीचे मेंबर व इतर संभावित गृहस्थांचें आभार मानून विद्येवर एक सुंदर निबंध वाचला नंतर इ० साहेब यांनीं आनंद प्रदर्शीत केला. पुढें हेड मास्तरांनीं सर्व असिस्टंट प्रस्तुत चांगले असून महनती आहेत असें साहेब मजकूरांस सुचविलें नंतर पानसुपारी अत्तर गुलाब वगैरे होऊन सभा विसर्जन झाली पत्रकर्ते महाराज लोभ असावा ही विनंती.

ता० १४ आक्टोबर सन १८८० — एक खोलापूरवासी.


वऱ्हाडसमाचार.

मिति आश्विन वद्य ७ शके १८०२


## छोटे उदेपुरच्या राजपुत्रावरील खटला.

छोटे उदेपुर या नावानें रेवाकाठ्यांत एक संस्थान आहे त्याचे क्षेत्रफळ ८२० चौरस मैल, लोकसंख्या ६२९१३ वसूली वेरीज अडीच लक्ष रुपयांची आहे. एथील राजा बडोद्याच्या गायकवाडांचा मांडलिक असून सालीना ८७७० रुपये गायकवाडास करभार देत असतो. तेथील राजाचें नाव जितशिंग त्याला इंग्लिश सरकारांतून ९ तोफांचा मान आहे व त्याला ३ पुत्र आहेत. त्यांतील दुसऱ्या पुत्राचें नाव चंद्रशिंग त्याला दोन बायका त्यांतील धाकटी राजकुवर बाई तीन महिन्यामागें मरण पावली. त्यासंबंधांत चंद्रशिंग राजपुत्रावर फौजदारी खटला उत्पन्न झाला आहे.

मयत राजकुवरबाई हिच्या भावानें सरकारांत अर्ज केला कीं माझी बहीण चंद्रशिंग यानें हाल यातना करून ठार मारिली त्याची चौकशी व्हावी. पोलिटिकल एजंटानीं जूज चौकशी करून मुंबई सरकारास लिहिलें व उदेपुरच्या राजानेंही सरकारास लिहिलें कीं माझ्या पुत्रावर हा अगदीं खोटा आरोप आहे. त्यावरून मुं० सरकारानें ठाण्याचे जडज मि. वर्डउड साहेब यांस कमिशन देऊन या गोष्टीची साक्षी पुराव्यानें चौकशी करून गोष्ट खरी आहे किंवा खोटी आहे या जविषयीं रिपार्ट करावा ह्मणून त्यांस तिकडे पाठविलें त्यांनीं पावागड पंचमहालांत गोदरा एथें तारीख ३० सप्तंबरपासून चौकशी चालू केली. राजपुत्राचे तर्फे मुंबईहून मि० ब्रानसन साहेब बारिस्टर गेले होते व सरकार तर्फे नरभेराम रघुनाथदास वकील काम चालवीत होते. १४ दिवसांच्या चौकशीची हकीकत ह्मणजे सविस्तर जबान्या टाइम्स आफ इंडिया पत्राचे स्पेशियल रिपोर्टर तिकडे गेले होते त्यांनीं पाठविलेल्या त्या पत्रांत प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांवरून समजतें कीं, प्रासिक्युशन तर्फेचा पुरावा झाला, राजपुत्र चंद्रशिंग याची जबानी झाली व मि. ब्रान्सन साहेब बारिस्टर यांचा डिफेन्स झाला, व काम आटपलें. आतां रिपोर्ट होईल.

प्रासिक्युटर यानीं आरोपाविषयीं प्रथम भाषण केलें त्यांतील सारांश असा कीं, मयत राजकुवर बाई खिडकींतून खालीं उतरून आपल्या माराकडे जात होती हें चंद्रशिंग यास कळतांच तो खालीं गेला व तिला धरून येरले बायकोचे खोलींत घेऊन आला व तेथें त्यानें तिला काठीनें अतिशय मारिलें

व तरवारीनेंही कांहीं वार केले. नंतर तिला कांहीं तास उलटी टांगून ठेविली. दुसरे दिवशींही तिला असेंच पुष्कळ मारिलें व यामुळें तिसरे दिवशीं सकाळीं ती मरण पावली. असें असतां तिचे प्रेताचें तावडतोब दहन केलें. आणि राजानें डाक्टराचे बुकांत लिहून ठेवविलें कीं, ती सर्पदंशानें मेली. व डाक्टराचें ह्मणणें आहे कीं आपणास या विषयीं कांहीं माहीत नाहीं व मयत इला मी जाऊन पाहिलें नाहीं.

या मुकद्दम्यांत सरकार तर्फे साक्षीदार पुष्कळ झाले. राजकुवर बाईचा भाऊ व आई यांच्या प्रथम साक्षी झाल्या. नंतर चपा, जिवी, नाथी, पुनी, अमृती, बिजली, कस्तुरी वगैरे दासींच्या साक्षी झाल्या. कालापांड्या ब्राह्मण याचे घरांत राजकुवर बाई सापडली यासाठीं त्याची. त्याच्या बायकोची व मुलाची साक्ष झाली. मुसलमान छोकरा सादत ज्याच्याशीं ती लागू होती त्याची व त्याच्या बापाची साक्ष झाली. वडील राजपुत्र, राजाचे खासगी कारभारी, फ्यामिली डाक्टर, डिस्पेन्सरी डाक्टर, व गोंधऱ्याचे मुनसफ वगैरेच्या साक्षी झाल्या. सादतचीं तीन पत्रें सापडलीं त्यांचें अक्षर ओळखण्याकरितां मुनसफाची साक्ष झाली, सादत यानें सांगितलें आहे कीं मी राजकुवरबाईला कधीं पाहिलें नव्हतें. तिची माझी ओळख नाहीं, व मी तिला पत्रें लिहिलीं नाहींत. राजकुवरबाईला कोणी ह्मणतात लिहितां वाचतां येत होतें, कोणी ह्मणतात येत नव्हतें. शिवाय इतर गोष्टींतही बहुत साक्षीदारांचे भाषणांत बहुत फरक आहेत. कोणी पुष्कळ वेळां जबर मारल्याचें सांगितलें, कोणी तरवारीचा उपयोग केल्याचें सांगितलें. कोणी उलटी टांगून मारल्याचें सांगितलें, अंगावर वळ असल्याचें व जखमेवर पट्टी असल्याचेंही कोणी सांगितलें. शेवटीं राजपुत्र चंद्रसिंग यानें जबानीचे बदला लेखी हकीकत दिली तीः—

चंद्रशिंगाची जबानी- मो माडीवर थोरल्या बायकोजवळ बोलत बसलों होतों. जिवीनें धाकटी बायको दोरावरून उतरून गेल्याचें मला कळविलें. तेव्हां आह्मी तिघे जण राजकुवरच्या खोलींत आलों. ती तेथें नव्हती व खिडकी उघडी होती. व तींतून दोर सोडलेला होता. मी खालीं जाऊं लागलों. तेव्हां माझी बायको ह्मणाली जाऊं नका. दंगा होईल. मी ह्मणालों काय आहे तें जाऊन पाहिलें पाहिजे. मी गडबड करणार नाहीं. काठी वगैरे कांहीं न घेतां जातो. व तसाच गेलों. जिवी मजबरोबर खालीं आली. कालापांड्याच्या दाराशीं गेलो, तें लावलेलें होतें. जिवीनें उघडविलें. राजकुवर आंत होती. मी जिवीला दिवा लावून आंत दुसरें कोण आहे तें पाहण्यास सांगितलें. इतक्यांत वरच्या बाजूस कांहीं चळवळ झाली त्यावरून दुसरा मनुष्य निघून गेला असावा अशी माझी कल्पना झाली. व दिवा लावल्यावर तीच खरी ठरली. जिवी राजकुवरला ह्मणाली तूं हें काय केलें? ती ह्मणाली वाईट गोष्ट झाली. बोभाट करूं नका. मी अफू खाईन किंवा दुसऱ्या तऱ्हेनें मरून जाईन. मी ह्मटलें तूं असें वाईट कर्म करून आणखी जीव देण्याचें योगानें मला कलंक लावणार? नंतर जिवी मागील जिन्यानें तिला वर घेऊन गेली. मी त्या ठिकाणीं किंवा वाटेंत तिला मारलें नाहीं. पुढील जिन्यानें मी वर गेलों. तिला मधल्या खोलींत नेलें. वडील बायको बरोबर आली. मी पुन्हा तिला विचारिलें व खालच्या प्रमाणेंच तिनें जबाब दिला. मी विचारिलें. कोणाकरितां तूं खालीं गेली होतीस? तिनें सादत शिपायाचें नाव सांगितलें. मला राग आला व मी वेताच्या लहानशा छडीनें खांद्यावर तिला दोन तीन फटके मारिले तेव्हां थोरल्या बायकोनें मध्यें येऊन माझे हातची छडी घेतली नंतर मी राजकुवरला ह्मणालों तूं तोंडाला काळें लावून घेतलेस या उपर मी तुझें तोंड पाहणार नाहीं. पुढें मी तिला अगदीं मारिलें नाहीं. साक्षीदारांनीं काठ्यांनीं दोनदां मारिल्याचें, तरवारीनें मारल्याचें, दोरानें टांगल्याचे वगैरे मजकूर सांगितलेले सर्व खोटे आहेत, ही गोष्ट झाल्याच्या पुढल्या मंगळवारीं ती मेली. तोंपर्यंत मी तिला पुन्हा पाहिलें नाहीं. प्रेत पाहिलें. रविवारीं व सोमवारीं मी तिला मारल्याची साक्षीदारांची गोष्ट अगदीं खोटी आहे. त्या रात्रीं सदरील कृत्य झाल्यावर मी सादतचा बाप अलादाद यास आमचे एथून निघून जाण्यास सांगितलें. व त्याप्रमाणें ते दोघेही गेले. मग मी जाऊन निजलों. राजकुवर अत्यावस्थ आजारी असल्याचें वर्तमान मला मंगळवारीं शाळेंत समजलें. मी घरीं आलों. घरच्या व बाहेरच्या स्त्रिया तिच्या जवळ होत्या. आमच्या रीतीप्रमाणें मी तिच्या जवळ जाऊं नये असें होतें ह्मणून गेलो नाहीं. तिला काय झालें ह्मणून मी शोध केला. दासी ह्मणाल्या कारण ठाऊक नाहीं. सर्पदंश झाला असेल. मी घाबरून गेलों. घरांत एकच गडबड होऊन गेली होती. वडिलांनां पत्र लिहिण्याविषयीं मी मूळशंकर यांस सांगितलें. पत्र रवाना होत आहे इतक्यांत ती मरण पावली असें कळलें. मग मेल्याविषयींचें दुसरें पत्र लिहिण्यास सांगितलें. माझी बायको शारीर व्यथेनें मेली, कांहीं खाऊन मेली, काळजाला दुःखाचा धक्का बसून मेली, किंवा कांहीं जिवाणू चावून मेली हें मला ठाऊक नाहीं. राजकुवर मेल्यावर मी आईला व बहिणीला बरोबर घेऊन तिची पेटी उघडून पाहिली तींत अफू व कांचेच्या पुडासारखी बुकणी सापडली. तिला जबरदस्त मार द्यावा किंवा मारून टाकावें असा माझा अगदीं इरादा नव्हता व मी तिचा जीव घेतला नाहीं. सर्पदंशाची गोष्ट खोटी आहे. व मी ती मूळ काढिली नाहीं. तशी बातमी गावांत पसरावी व तसा खोटा पुरावा बनला जावा व मजवरील संशय दूर व्हावा असा माझा कांहीं हेतु नव्हता. ही गोष्ट मरणाच्या वेळेपासून निघाली. चौकशीच्या वेळेपासून निघाली नाहीं. सामवारीं रात्रीं मी वैद्याला बोलाविलें नव्हतें. मजविषयीं त्यानें जें सांगितलें तें सर्व खोटें आहे. माझ्या वर्तानें कोणी त्याला अशी खोटी साक्ष देण्यास सांगितल्याचें मला ठाऊक नाहीं. व मी सांगितलें नाहीं. कांहीं अशा गोष्टी सांगितल्यानें माझा उपयोग होईल असें त्यास वाटल्यावरून कदाचित त्यानें सांगितल्या असाव्या. पण त्या खोट्या आहेत व मला त्यांविषयीं कांहीं माहित नाहीं. डा. खंडेराव यानें बुकांत लबाडी लिहावी अथवा खोटी साक्ष द्यावी असें मी त्यास सांगितलें नाहीं व माझ्या समक्ष दुसरे कोणी सांगितलें नाहीं, त्याला कोणी शिकविलें तें मला ठाऊक नाहीं. सर्पदंशाचे उताऱ्यावर मराठ्या डाक्टराला बोलवा असें मी कोणास सांगितलें नाहीं व कोणी डाक्तर आला होता किंवा नव्हता हेंही मला ठाऊक नाहीं.

( सही ) चंद्रशिंग-

नंतर मि० ब्रानसन साहेब यानीं डिफेन्स दिला तो फार मोठा आहे व त्यांतील मतलब राजपुत्रावर आरोप शाबीद झाला नाहीं व त्यानें कांहीं गुन्हा केला नाहीं असा आहे. तो राजपूत राजा असतां व प्रत्येक त्याचे बायकोनें नीच शिपायाशी व्यभिचार केलेला असतां मोठ्या विचारानें व शांततेनें तो वागला याची ही ब्रान्सन साहेबांनीं तारीफ केली आहे व मुंबई सरकारास या राजपुत्राचा चौकशी करण्यास कांहीं अधिकार नव्हता असें ह्मटलें आहे.

इतकें होऊन ही चौकशी पुरी झाली मि० वर्डउड साहेबांस त्यांचा अभिप्राय प्रसिद्ध होईल काय ह्मणून विचारिलें असतां त्यांनीं सांगितलें कीं तो प्रसिद्ध न होतां मुंबई सरकाराकडे पाठविला जाईल. आतां सरकार त्यास निर्दोषी ठरवितें किंवा पुन्हा शिरस्तेप्रमाणे चौकशी करवितें, पाहावें!

---

## आ॰ मुरारजी गोकुळदास.

आह्मांस लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं आनरबल मुरारजी गोकुळदास नावाचे मुंबईचे प्रसिद्ध भाटे गृहस्थ तारीख १६ शनिवार रोजीं एकाएकी मरण पावले. आठ दिवसांमागे पुण्यास असतां ते टांग्यावरून पडले होते व त्यांचे पायास इजा झाली होती, पण तिजविषयीं विशेष कांहीं न होतां ते मुंबईस आपले घरीं आले. व मंडळीशीं बोलत चालत असतां एकदम पोटांत गोळा आला व मूर्छा येऊन मरण पावले. यांचें वय ४७ वर्षांचें होतें मुंबईस, सोलापुरास, जळगावास यांच्या गिरण्या आहेत. हे कायदे कौन्सलांत मेंबर होते, सी. आय. ई. होते दुष्काळ प्रसंगांत यानीं रयतेचे बचावासाठीं अतोनात श्रम केले, व एकंदरींत लहान पेशापासून हे आपले कर्तबगारीनें मोठ्या महत्वास चढले होते. सबब देशांतून असा मोहरा गेल्याबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें. परमेश्वराची मर्जी!

---

The following speech was deliverd by Mr. Laxmipati Nayu du at the opening serimony of the new Rest House on the 13th instant.

In this country, the idea of biography is very little known, though its usefulness is appreciated This is generally assigned as the cause, for the noble deeds of noble hearts, soon becoming more visionary than otherwise, but a careful examination of the charitable acts of several gentlemen, whether Hindus, Musalmans, Parsis or Christians cannot fail to inspire an outsider with the admiration of the benevolent intentions of men whose names by their princely liberality have become a household word in this country.

There are many who despise pomp and show, and acting on this principle, they take every precaution, to have their names concealed, even in cases where prominence would be quite justifiable.

Gentlemen, you will all agree with me that Mr. Bymonji Dustoor has proved himself to be a member of that class, for in the paper just read to you, you will not see a trace of his connection with this building which he will presently request our chairman and his long trusted and beloved friend Colonel Bell, to declare it open, though it is patent to all here present, that he is the real founder. We also know that if it is not for his untiring exertions this building will never have come into existence.

This is neither the place, nor the occasion for me to speak of Mr. Bymonji Dustoor's, long, varied and useful career as a trusted servant of Government; but I shall ask your permission to announce on this occasion, what very few of his friends know, that his whole life is spent in doing good to his countrymen. Without reference to color, creed or caste, and there is nothing that conduces to his happiness, so mnch as getting an opportunity of doing what little he can, for the advancement of his fellow creatures either in a social, moral, or material point of view.

I have no doubt that I only echo the voice of the Public, when I express my deep regret at finding this charitable institution, to be almost the very last of Mr. Bymonji's noble work, as from the reports I gather, that his connection with this commission is soon to be severed, but this sorrow is partially mitigated by the consolation, that his bright antecedents while in office justify us, in entertaining a hope, that his future career will be brighter, when out of office, since he could command more leisure, and attention to the pursuit of benevolent acts, which chiefly characterised his eminently successful career.

While it cannot but be a special gratification to Mr. Bymonji, to find at this present moment his old and beloved friend Colonel Bell, with whom he has worked in this Commission for well nigh over a quarter of a century, at the head of this administration and as such has kindly graced this auspicious occasion with his presence, to crown and consummate the charitable act of his friend, it is a great consolation to the public to find him ever ready and willing to assist in all their laudable undertakings, which is significant as showing that by his long residence amongst, and intimate connection with most of them, he has identified his interests with theirs, and I entertain not the least doubt, that he will regret more than any one, the approching severance of Mr. Bymonji's connection with him in this commission, for

the simple reason, that no one knows Mr. Bymonji more intimately than Colonel Bell our esteemed Chairman.

Gentlemen, the need for Rest-Houses in this country is beyond question, as from the poverty of many of the lower orders of men, they are obliged to travel on foot for miles together without finding any place where they can rest themselves for a few hours if not days, and a splendid accommodation like the present building cannot but be an inestimable boon to them.

Time will no doubt pronounce its judgment on the utility and necessity of this building. Mr. Bymonji Saheb may not be here, to enjoy the fruits of his labors and many of us may be scattered over the world, but the present generation, I have no doubt and I hope many succeeding ones, will even recall to their mind, the generous heart which has striven hard to find an asylum to those whose lot must at least for a time be thrown under the wide canopy of heaven. It is impossible to over-estimate the kind feelings which actuated Mr. Bymonji Sahib in the construction of this building.

The paper just read to you shows the saving which Mr. Bymonji was able to effect to the municipality in the construction of this building, and this cannot fail to operate as an additional impetus, to that corporate body apart from the usefulness of the institution, to bestow their close attention in the management of this serai, and their unqualified approval of the benevolent intentions of Mr. Bymonji Saheb, is sufficient to guarantee, their careful management of this Rest House.

I have one propsition to place before the Municipal Board, and that is, that though Mr. Bymonji takes a decided objection to the Rest House being called after his name, yet the committee will be pleased to inscribe his name on the stone, about to be put up, as having been instrumental in establishing this Charitable Institution, and also the name of our esteemed friend Rao Bahadoor Narayen Bhai Dandekar Director of Public Instruction to mark his auspicious hand, as according to the Hindoo idias, the successful completion of a building is chiefly attributed to the gentleman who lays the first foundation stone of the building. In asking this concession, I am sure I ask nothing that is novel in such cases and if Major Fitz Gerald tne President of the municipal Board, agrees with me, I request the favor of his supporting my proposal.

---

The fall of rain during the week was very opportune, as the Kharif sowings were in some parts getting stunted. It has moreover changed the appearance of the grass crop, which a few days ago was in a decaying condition. The water supply is still very scany in wells, and it is feared that the want of good potable water will be keenly felt in the next hot season. Already a scramble is made to the few wells which supply drinking water and the few wells owned by private individuals are invaded at night by Bhisties. We are aware that the nnmber of wells in Akola are numerous, bnt the main part of them fail in the hot season. It would be advisable to deepen all existing wells. The Akola river has been dammed to secure drinking water but at the best of times river water is never wholesome and the damming process impounds a volume of water which in course of time becomes stagnant, putrid and unwholesome and is therefore not so desirable when the want of water is felt all over the land. The market prices of edible grain have run down rapidly aud farmers are preparing for the Rabi cultivation. The out-turn of Kharif crop will be a very variable one from a four anna one to a one Rupe crop.

---

Brigadier General Wright is expected at Akola during the week and will remain here to witness the coming races. A batch of sowars will also arrive who will engage in a game of Polo. It is believed the Volunteers and the detachment of Infantry will be inspected. It is hoped they will show a better front this year than they displayed at the last inspection.

---

The Coming races are anxiously awaited. Preparations are progressing on a grand scale. The race week will be one of continual excitement; for besides the races there will be games of Cricket, billiards lawn-tennis, banquets &c. &c. During the intermediate days. Lively stable keepers will fill their pockets with the fabulous prices they will set on their hacks during the week. A fortnight ago vehicles had been engaged by parties for the coming races and pleasure seekers and sight seers are contemplating on the sad disappointment they will feel if deprived of carriage at the last minute.

---

Mr. Krishnaji Dinkar 1st class supervisor in the P. W. D., has been we are glad to announce promoted to the rank of a Sub-Engineer of the 3rd grade. His promotion has been very deservedly won, and we congratulate this gentleman on his accession to the new office, and it is our earnest desire tnat he will continue his career in the same unswerving path of rectitude as he had hitherto followed in his office as a supervisor.

---

The annual examination of Assistant Commissioners and Thasildars has begun this day the 25th. The number of candidates is swelliing annually, and this year a large gathering has taken place. We are assured that a separate exami natinn for Pleaders will be held some time about the beginning of next year but no probable date is yet decided upon; Meanwhile candidates for Pleadership are permitted to pass the higher standard and to plead. It is surmised that they will be required to nndergo the crncial test ef a second examinatofn with the bulk of the pieaders when the regular examination for Pleaders in Berar will have been established.

## वऱ्हाड

पर्जन्यानें या आठवड्यांत सर्वांस संतुष्ट केलें. सोमवार रात्रीं, मंगळवार सकाळीं व काल सायंकाळीं एथें चांगला पर्जन्य पडला

---

आफिसर लोकांच्या परीक्षेस आज ११ वाजतां सुरुवात झाली. ३२ गृहस्थ परीक्षेस आहेत. त्यांत हायरकरितां १२ लोअर करितां १६ व मराठी भाषेकरितां ४ आहेत बुलढाण्याचे डेपुटी कमिशनराचे ऐवजी इलिचपुरचे डि. क. मे मेकंजी साहेब परिक्षेक आहेत. आज फौजदारी सवाल १८ दिले आहेत

परीक्षेस आलेल्या गृहस्थांचीं नावें:— हायर करितां— मि० यासिनखा असि० कमिशनर. मि० एदलजी बहिमनजी असि० कमिशनर, रा रा. सी. भीमराव अळ्याची, रा. रा. वामन नारायण तहशिलदार, रा. रा. कृष्णराव हरी क्लार्क आफ धि कोर्ट. मि एदलजी जमशेटजी संजाणा क्लार्क०, रा रा. वासुदेव सदाशीव क्लार्क, मि० शेख इस्मायल क्लार्क, रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर मा. बि. ए., रा. रा. विश्वनाथ नारायण दांडेकर क्लार्क, रा. रा. एकनाथ मोरेश्वर क्ला० व रा. रा. गणेश बापुजी डि. क्लार्क आफ धि कोर्ट

लोअरकरितां— रा. रा. टी रं राव अळ्याची, मि. फौलर साहेब, मि. शापुरजी बिरजी तहशिलदार, रा रा. काशीराव शंकर-पेशकार, रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ चीफ कानस्टेबल, मि. शेख हैदर कोर्ट इन्स्पेक्टर, रा. रा. नागोराव पांडुरंग ची. का., रा. रा गणेश पांडुरंग डि. क्ला०, रा. रा. बाळजी राजाराम डि क्ला०, रा रा. कृष्णराव अनंत कारकून, रा. रा. आत्माराम अनंत डि. क्ला., रा. रा. गोविंद गंगाधर पेशकार, रा. रा. त्रिंबक गणेश पेशकार, रा. रा पांडुरंग शिवराम नाझर, रा रा. हरी काशिनाथ नाझर, व मि. नारायण बाळकृष्ण क्लार्क.

मराठी भाषेंत हायरकरितां मि. बदरोदीन तहशिलदार व लोअरकरितां मि. फिटजपात्रीक साहेब, मि. शाबासखान तहशिलदार व मि. सिराजुद्दीन पेशकार.

येणेंप्रमाणें मंडळी आहे. व मराठी भाषेचे परीक्षक रा. ब. नारायणभाई साहेब डायरेक्टर हे आहेत.

---

दक्षिण वऱ्हाड इंजिनियरचें आफिस आजवर वाशिमास होतें तें यवतमाळास नेण्याचा ठराव झाल्याप्रमाणें या आठवड्यांत तिकडे गेलें.

---

सेशनांत एका स्त्रीवर आपले मूल विहिरींत टाकल्याचा आरोप होता तो मुकद्दमा चालविण्यासारखा पुरावा नसल्यामुळें आरोपीस सोडून दिलें.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी यांस दर्यापुरास पोलिस इन्स्पेक्टरची कायमची जागा मिळाली.

---

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, रा. रा. कृष्णाजी दिनकर सहस्रबुद्धे एथील सुपरवायझर हे थर्ड ग्रेड सब इंजिनियर झाले. आतां त्यांनां २५० रुपये पगार मिळेल. रा. रा. विष्णु रामचंद्र भट सेकंड ग्रेड ओव्हरसियर यांस ही फर्स्ट ग्रेड केलें. त्यानां आतां १०० रुपये मिळूं लागतील.

---

एथें उद्या शर्यती होतील. बुधवारीं चेंडू फळी होईल. गुरुवारीं शर्यती होतील. त्यांत युरोपियन स्त्रियांची घोड्याची शर्यत होईल. शुक्रवारीं क्रिकेटचा खेळ व रात्रीं नाटक होईल. व शनिवारींही नाटक आणि शर्यती होतील. शर्यती सकाळ संध्याकाळ दुवक्तां होणार आहेत. युरोपियन मंडळी पुष्कळ आलेली आहे. व परीक्षेकरितां नेटिव गृहस्थ ही बेरच आलेले आहेत.

---

मे० दस्तुर बहिमनजी साहेब सी. आय. ई. खामगावाहून परत आले.

---

मि० शाबासखान वाशिमचे तहशिलदार यांस बाळापूरास व बाळापुरचे मि० सफदर अली यांत वाशिमास नेमिल्याविषयीं १५ वे तारखेचें रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झालें आहे.

---

रा. रा. हणमंतराव रामचंद्र रजेवर असलेले तहशिलदार यांची रजा १५ नोवेंबर पर्यंत वाढविली आहे. व त्यांची एकंदर सर्व रजा फर्लो रजेंत दाखल केली आहे.

---

मि० जोन्स साहेब कमिशनर यांचे रजेंत कर्नल बेल साहेब व कर्नल बुशबी साहेब यस बढती मिळाली त्याशिवाय बर्गावर्गी झाली ती अशी:—

मे० एच सी ए स्प्यानस्की साहेब सेकंड क्लास डिपुटि कमिशनर यांस आफिशियेटिंग फर्स्ट क्लास केले व मि० के जे एल मेकंजी साहेब थर्ड क्लास डिपुटी कमिशनर यांस आफिशियेटिंग सेकंड क्लास केलें.

---

रा. रा. कृष्णाजी काशिनाथ देशमुख मुंबई इलाख्यांतील वकील उमरावतीस काम करण्यास येऊन राहिले होते ते आजारीं पडून मुंबई मुक्कामीं त्यास देवाज्ञा झाली.

---

उमरावतीस क्लाक टावरचे सभोवार बगीचा होत आहे त्यावर म्युनिसिपल सेक्रटरी मि० हेक्स्टर साहेब यांची देखरेख आहे. म्युनिसिप्यालिटीनें मोटेकरितां ५०० रुपये व नोकर मजूरी वगैरे करितां ४७० रुपये देण्याचें सांगशन केलें आहे. व गावांत बगीचेही जपत आहे. सेक्रटरीनीं एक बैलावर दोन मोठा चालविण्याचें यंत्र तयार केलें आहे असें प्र. सि. वरून समजतें.

---

उमरावतीच्या मिडल क्लास स्कुलांत १५० मुलें झालीं आहेत. प्र. सि.

## वर्तमानसार.

पोलिस आफिसरांची परिक्षा मुंबईस डिसेंबरचे १४ वे तारखेस होणार.

विमली पट्टण एथें वादळ झालें

नेपाळचे महाराज व्हाइसराय साहेबास भेटण्याकरितां व कांहीं धर्मकार्याकरितां हिंदुस्थानांत येणार आहेत

भावलपुरचे नबाबास पुत्र झाला.

टेलिफोनचा शोध करणारे प्रोफेसर बेल साहेब यानीं अमेरिकेंत व्याख्यान दिलें. त्यांत त्यानीं असें सांगितलें कीं तारायंत्रानें जें काम होतें तें तारा लाविल्यावांचून नुसत्या प्रकाशानें करितां येईल. व तारायंत्रानें खुणा कळतात त्यांचे बदला या नवीन प्रकारानें मनुष्याचे साक्षात् ध्वनी ऐकूं येतील व याजविषयींचा चमत्कारही त्यांनीं अर्ध मैलाच्या अंतरावरून प्रत्यक्ष करून दाखविला.

आन. मुरारजी गोकुळदास यानीं उत्तम चंदनाचे सुबक कोरलेलें नामी टेबल तयार करून प्रदर्शनात पाठविलें होतें व तें चक्रवर्तिनी साहेबास नजर दिलें. त्यानीं संतोषानें ग्रहण केलें.

काबुलाकडून शांततेच्या खबरा येत आहेत पण त्यावर विशेष अवलंबून राहतां येत नाहीं. आतां पर्जन्यकाळचा हपता भरण्याचा हंगाम आला आहे त्यावेळीं अमीर अबदुल रहमान यांची कर्तबगारी कशी चालते ती पाहिली पाहिजे

कांहीं पत्रांत अशी बातमी आहे कीं सरकारानें अमीर अबदुल रहमान यास कंदाहारचा बंदोबस्त ठेवण्यास सांगितलें, त्यावरून त्यानीं २ पलटणी तिकडे पाठविल्या व महमद अजीजखान आपला पुतण्या यास तिकडे पाठविलें. व त्याचे मदतीस सरदार उमरखान यास पाठविलें. काबुलचे लोकांचा तर्क आहे कीं अबदुल रहमानानें कंदाहाराकडे पलटणी पाठविल्या तरी महमद अयूबखान येऊन तें शहर हस्तगत करील.

म्याडम ब्लावास्की यांचा चमत्कार— ही बाई सिमल्यास असतां तेथें तारीख २ आक्टोबर रोजीं मि० ह्युम यांच्या बंगल्यांत कित्येक मंडळी समक्ष तिनें असा चमत्कार दाखविला कीं, मि० ह्युम यांच्या पत्नीचा पुष्कळ वर्षांपूर्वीं एक दागिना नाहीसा झालेला होता व त्याची तिला आठवण सुद्धां नव्हती तो त्यांच्या बागेंत आहे असें सांगून त्या प्रमाणें त्या मंडळीस बागेंत नेऊन एका षुडींत असलेला दाखविला हा चमत्कार आपण प्रत्यक्ष पाहिला असा आपल्या सहीचा लेख तेथें हजर असलेल्या कित्येक गृहस्थानीं प्रसिद्ध केला आहे. सिमला येथें घडलेल्या सदरील गोष्टीच्या संबंधानें एका पत्रकर्त्याचें असें ह्मणणें आहे कीं, थिओसाफिकल सोसायटीच्या स्थापक मंडळीनें या पतित आर्यावर्त देशांत येऊन त्यास शोभा आणल्यावर थोड्याच दिवसांनीं म्याडम ब्लावास्की बाईची कांहीं सोन्याची बिर्डीं (बटन्स ) गमावली व त्याजविषयींची योग्य तक्रार मुंबईच्या पोलिसकडे करण्यांत आली होती. ते बटन्स एका गरीब बाईनें चोरले असावेत असा बाईनीं संशय ही घेतला. पोलिसानें तपास केला परंतु कांहीं शोध लागला नाहीं. म्याडाम ब्लावास्की बाईनें ते सोन्याचे बटन कोठें गुप्त ठेविले आहेत ते एकदम दाखवून सिमल्या प्रमाणें सर्व प्रकरणाचा निकाल न करितां पोलिसास चौकशी करण्यास लाविलें व शोधाचे हरएक त्रास दायक परीश्रम व्यर्थ केले हें कसें! कदाचित पायोनियर पत्रकर्ते याचा खुलासा करतील असें वाटतें. ज्ञा. प्र.

प्रसिद्ध नाटकप्रिय बंधुद्वय नानाभाई गणपतराव व बाळाजी गणपतराव धैर्यवान यांजवर नानाभाईचे श्वशुर मि. जनार्दन वासुदेवजी यांचे घरून दागिन्यांची चोरी केल्याचा खटला शाबीत होऊन प्रत्येकास दोन दोन वर्षें सक्तमजुरीची शिक्षा झाली. याजवर हायकोर्टाकडे अपील होणार आहे ह्मणून बातमी आहे. एकंदर चोरी ३२,२५० रू. ची झाली होती. पैकीं पोलिसास सुमारें २५,००० रू किमतीच्या दागिन्यांचा पत्ता लागला होता, व तेवढे दागिने माजिस्ट्रेटांनीं जनार्दन वासुदेवजी यांस परत देवविले.

रा. ब. नाना मोरोजी यांत नोकरी सोडून घरीं बसण्याची पाळी आली याबद्दल त्यांचे कोर्टांतील वकील लोकांस अत्यंत दुःख झालें असून ते त्यांस मानपत्र देणार आहेत.

पेशावर येथें बरेच आफगाणलोक येऊन राहिले असून ते वारंवार खून करतात असें लाहोरच्या एका पत्रावरून समजतें.

कंदाहार येथें अशी बातमी आहे कीं, टर्कोमान लोकांकडून अयुबखानास घोडेस्वारांची मदत मिळावयाची असून इराणकडून त्यास पैशाचीही मदत व्हावयाची आहे, व यामुळे तेथें अस्वस्थता उत्पन्न होत आहे. बराकझीज लोकांच्या एका सरदारानें आपल्या ताब्यांतील लोकांस अयुबखान लवकरच कंदाहारास येणार या करितां तुह्मी धीर सोडूं नका असें सांगून इंग्लिशांच्या विरूद्ध उठविण्याचा यत्न चालविला आहे; व यावरून आफगाणिस्तानच्या दक्षिण भागांतील लोकांचा अयुबखानावर मोठा भरंवसा असून ते त्यास मदत देतील असें वाटतें.

जयपूर येथें एक आफगाणलोकांची टोळी आली असून त्यांनीं एका हिंदु मनुष्यास शस्त्रानें भोंसकून ठार मारल्याचें समजतें.

कंदाहारपर्यंत रेलो लवकरच पोंचवून तें शहर हिंदुस्थानच्या सरहद्दीस जोडावें असें जनरल रॉबर्ट्स यांचें ह्मणणें आहे. कारण ते असें ह्मणतात कीं, खोजकमधून इकडून तिकडे जातां येत असल्याकारणानें तें सरहद्द करण्याच्या उपयोगी नाहीं, व जरी हल्लीं केलेले रस्ते मोडले तरी कंदाहार येथील सैन्यास सामानाचा पुरवठा करण्याकरितां रेलवे अवश्य पाहिजे.

लक्ष देतो कोण?— मद्रासेतील हिंदु नांवाच्या एका नेटिव वर्तमानपत्रानें अशी सूचना केली आहे कीं, प्रत्येक गव्हरनरास एक नेटिव असिस्टंट प्रायव्हेट सेक्रेटरी असणे अगदीं जरूर आहे. कारण असें केलें ह्मणजे सरकारास इकडील रीतिभाती व सांप्रदायांची माहिती नसल्या कारणानें जे अन्याय होतात, ते न होऊन अनेक वेळीं नेटिव राजेरजवाड्यांचा योग्य मानमरातब ठेवण्यांत चुका होतात त्या न होऊन नेटिव कामगारांचीं वर्तनेंही सरकारास चांगल्या रीतीनें कळण्यास मार्ग होईल. ही सूचना अगदीं यथायोग्य आहे. व हिच्या योगानें रयतेचीं दुःखें व तिची स्थितिही सरकारास कळेल, परंतु अशा सूचनेकडेस लक्ष देतो कोण?

गोवें येथें मिठाच्या अति महर्घतेमुळें रयतेवर कहरच झाला आहे. इंग्लिश सरकारापासून मीठ आपण स्वतः विकत घेऊन गोवें सरकार तें पुष्कळ फायदा ठेवून विकित असल्यामुळें बिच्याऱ्या गोरगरीबांस तो जीवनावश्यक पदार्थ मिळण्याची मारामार पडत आहे.

जोधपूर स्टेशनाजवळच्या सुजात नांवाच्या ठिकाणापर्यंत राजपुताना रेलवे येत्या बिसाव्या तारखेस व्यापारास मोकळी होणार; व बाकीची सुजातपासून पालनपूरपर्यंतची ही लाइन अगदी पुरी होत आली असून, येत्या जानेवारीच्या प्रारंभापासून मुंबई व बाबव्येकडील प्रांताचा इलाखा यांच्या मध्ये जाण्या येण्यास सोय होईल असा अनुमास आहे.

इराणच्या शहांनीं तुर्कस्थानच्या सुलतानांस कुर्द लोक इराणच्या राज्यांत पुंडावे करतात त्यांचा बंदोबस्त करावा अशी विनंती केली आहे. इं. प्र.

## धर्मशाळेची वर्गणी

| | रूपये |
|---|---|
| अकोले म्युनिसिप्यालिटी | २०० |
| भगुलाल ताराचंद. | १४० |
| मुकुंदलाल नन्हामल. | १२५ |
| बिलनखा वल्लद हबिबखा. | १४० |
| भागिर्थी बाई बोरगाव | १८५ |
| गब्रुसिंग जमादार | १११ |
| कुंजीलाल रामलाल | १०८ |
| भगवान वल्लद पैकाजी | १०१ |
| गोविंदगीर मयागीर भंडार्जे | १२६ |
| बळवंतराव कान्होजी देशमख | १०१ |
| मारोती पाटिल सेगावकर | १०१ |
| बनसिलाल मुकुंदलाल साहु | ११५ |
| नसरवानजी कामा बारिस्टर | १०१ |
| आकाजी वल्लद दर्गाजी पाटिल | १०० |
| तुकाराम वल्लद दानाजी पाटिल | १०० |
| बापुजी सखाराम देशमुख मैसांग | ९१ |
| शंकर साकलाल वाडेगावकर | ९१ |
| जानराव वल्लद अमलसिंग पाटिल | ७५ |
| लालसा व मोहनलाल मक्तेदार | ७५ |
| फ्लेमिंग साहेब अकोले | ७५ |
| हारवी आणि सभापती | ७५ |
| रामचंद्र कृष्णराव देशमुख | ७५ |
| रामुलाल गणपती पंचगव्हान्कर | ६१ |
| रामचंद्र यशवंत जलगाव | ६१ |
| मातादीन सेवकराम | ५१ |
| सखाराम मोरेश्वर खजिनदार | ५१ |
| सदाशीव बाळाजी बुटी | ५० |
| अकोले येथची तेली मंडळी | ५० |
| सखाराम भगवंत सिल्लोडकर | ५० |
| महमद हासम सेख कच्छी | ५० |
| गोविंदराव देशमुख उगवेकर | ६५ |
| मोतीराम कुवरसिंग | ५० |
| परशराम दर्याजी हातेकर | ४० |
| माहादाजी यादोजी केतकर | ४० |
| अबदुलहुसेन अल्लाबखस | ३५ |
| गणेशदास भिवराज | ३४ |
| गुलाम फकरोदिनखा | ३० |
| गुलाम सुजात आलिखा | ३० |
| उदेभान वल्लद गंभीरजी | ३० |
| गंगाधर जोरावरमल साहु | २५ |
| सिलिमखा वल्लद दाउदखा | २५ |
| रंगराव विठ्ठल जाहागिरदार | २५ |
| बाबाजी बोराखडीकर | २५ |
| लक्ष्मीबाई | २५ |
| बापु वल्लद हसाजी बावनबीर | २५ |
| रंगराव लक्ष्मण जाहागिरदार | २५ |
| बाळकृष्ण परशराम मलकापुर | २५ |
| हरजी लड्ढा अकोले | २५ |
| दुलजी वल्लद देवाजी | २५ |
| नथमल मारवाडी निमकर्दा | २५ |
| रामबखत जोशिराम | २८१३८६ |
| लखुलाल वल्लद भवानीदास | २१ |
| भैवजी सिवदेव | २१ |
| मिरजा अबासबेग इनामदार | २० |
| गुलाबराय गोविंदराय | २० |
| जोवनराम रामलाल | २० |
| रामचंद्र नवलाजी पाटिल | २० |
| पुरणमल वल्लद सुखदेव | २० |
| केशवराव महिपत | १७ |
| सिवराम इरभान पाटील अणवीकर | १५ |
| महंमदहानिफ वल्लद लालमहंमद | १५ |
| श्रावण वल्लद माहादाजी पाटिल | १५ |
| मोहनलाल वल्लद मानकचंद | १५ |
| मौंजी टोकरसा भाट मुंबईकर | १५ |
| काजा बदोउदीन मलकापु | १५ |
| भावनसिंग देशमुख मलकापुर | १५ |
| नारायणसा वल्लद नेमासा वाडेगावकर | १५ |
| सांवरराम रामप्रसाद | १५ |
| गोंडी गिरमाजी झाडेगावकर | १५ |
| श्रीराम शालीग्राम | १५ |
| टिकमदास ताराचंद | १५ |
| कादरभाई वोहरी अकोले | १५ |
| रामराव देशपांडे मलकापुर | १५ |
| दवलतराव देशमुख | १५ |
| सिवाजी जोद्राजी वैं मेराळ | १३ |
| | १३ |
| सुंदरलाल देवलाल | ११ |
| यशवंतराव दर्याजी | ११ |
| भवानसा वल्लद तुकासा बाळापुर | ११ |
| ईश्वरदास हुकुमचंद | ११ |
| रामुलाल आगरवाल | १० |
| रामप्रताप दानमल | १० |
| ओंकारदास बगडीया | १० |
| जार्थीराम नरसिंगदास | १० |
| हुकमचंद रतनचंद | १० |
| बापु जगन्नाथ | १० |
| पैकाजी वल्लद सोनाजी | १० |
| जेठमल किसनदास | १० |
| बाळासा रतनसा कल्याल | १० |
| सिताराम दलाल | १५ |
| रतनचंद बिरीराम | १० |
| रामराव कृष्ण देशपांडे | १० |
| मोतीलाल गुलाबचंद | १० |
| महंमद अभिद पुनोतीकर | १० |
| माधवराव रामचंद्र वकील | १० |
| दिनानाथ गोपाळ साहू जळगाव | १० |
| भगवानदास तुकाराम | १० |
| सोनाजी सखाराम पाटील | १० |
| गुलाबचंद ईश्वरदास | १० |
| मुकुटराव देशमुख | १० |
| पांडुरंग बापुजी राजंदकर | १० |
| रावजी सोनाजी डोंगरगाव | १० |
| रामप्रताप रामसुक | १० |
| गुलाम रहिमुदीनखा | १० |
| खाजे लुतफोदिनखा | १० |

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.